Downloaded from https:// www.studiestoday.com

# राज्यशास्त्र

## इयत्ता ११वी







Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-2116/(प्र.क्र.43/16) एसडी-4 दिनांक 25.4.2016 अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक 20.6.2019 रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन 2019-20 या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# राज्यशास्त्र

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

A8V4A7

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रथमावृत्ती : २०१९

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**राज्यशास्त्र विषय समिती**

डॉ.श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
डॉ.प्रकाश पवार, सदस्य
डॉ.मोहन खडसे, सदस्य
डॉ.अभय दातार, सदस्य
प्रा.संगीता आहेर, सदस्य
प्रा.अजिंक्य गायकवाड, सदस्य
डॉ.नीता बोकील, सदस्य
श्री.मोगल जाधव, सदस्य
वर्षा सरोदे, सदस्य-सचिव

**राज्यशास्त्र अभ्यासगट समिती**

डॉ.प्रविण भागडीकर
प्रा.संगिता दीक्षित
प्रा.राजेंद्र इंगळे
प्रा.वीणा केंची
डॉ.रोहिदास मुंढे
डॉ.व्यंकटलक्ष्मी पुरणशेट्टीवार
प्रा.अरुणा खामकर
प्रा.पीतांबर उरकुडे
प्रा.दिलीप कडू
डॉ.नंदकिशोर बोकाडे
डॉ.रामदास ढगे
डॉ.बालाजी कतूरवार
डॉ.प्रभाकर लोंढे
श्री.रविंद्र जिंदे
श्री.सुभाष राठोड
श्रीमती मुग्धा महाबळ

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
साहाय्यक विशेषाधिकारी,
इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**मुख्य समन्वयक**

सौ.प्राची रवींद्र साठे

**लेखक**

डॉ.श्रीकांत परांजपे
डॉ.प्रकाश पवार
डॉ.अभय दातार
डॉ.संहिता जोशी

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री.मुकीम शेख

**नकाशाकार**

श्री.रविकिरण जाधव

**भाषांतरकार**

प्रा.संगिता दीक्षित
श्रीमती मुग्धा महाबळ
प्रा.वीणा केंची

**अक्षरजुळणी** : मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे
**कागद** : ७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह
**मुद्रणादेश** : N/PB/2019-20/QTY.- 30,000
**मुद्रक :** M/s. Neat Prints, Ahmednagar

**निर्मिती**

**श्री. सच्चितानंद आफळे,**
मुख्य निर्मिती अधिकारी

**श्री. प्रभाकर परब,**
निर्मिती अधिकारी

**श्री. शशांक कणिकदळे,**
साहाय्यक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

**श्री. विवेक उत्तम गोसावी,** नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी,
मुंबई-२५.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता नववी व दहावी या इयत्तांमध्ये तुम्हांला राज्यशास्त्र या विषयाची तोंडओळख झालेली आहे. पुनर्रचित अभ्यासक्रम २०१२ नुसार अभ्यासक्रम बदलातील उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून इयत्ता ११ वी च्या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता अकरावीचे पुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

इयत्ता अकरावीच्या पाठ्यपुस्तकात चार विभाग केले आहेत – राजकीय संकल्पना, तुलनात्मक शासनसंस्था, लोकप्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध. या प्रत्येक विभागाची सुरुवात त्या संबंधित विषयाच्या प्रस्तावनेने करण्यात आलेली आहे. या क्षेत्रांतील महत्त्वाच्या संकल्पनांची तोंडओळख करून देणे हा यामागील उद्देश आहे. या सर्व संकल्पना भारताच्या संदर्भात अभ्यासायच्या आहेत.

अध्ययन अधिक सुलभ, रंजक व कृतीयुक्त होण्यासाठी तुम्हांला माहितीपर चौकटी, विविध कृती, क्यू.आर.कोडवर देण्यात येणारे साहित्य याचा निश्चितच उपयोग होईल.

राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास का करावा? याचे उत्तर तुम्हांला या पाठ्यपुस्तकाच्या अध्ययनाने जरूर मिळेल. जगाकडे बघण्याचा एक दृष्टिकोन या विषयाच्या अभ्यासाने मिळेल. हा विषय भारताच्या अभ्यासाबरोबरच बाहेरच्या जगाशी देखील तुमची ओळख करून देईल. भारताची शासनसंस्था कसे काम करते, शासनसंस्थेच्या कामकाजात नागरिक म्हणून तुमची भूमिका काय असावी, तुमच्या आजूबाजूला विविध स्तरांवर घडणाऱ्या घटनांकडे पाहण्याचे, अनुभवण्याचे आणि त्या घटनांचे विश्लेषण करण्याचे साधन या विषयामुळे तुम्हांला प्राप्त होईल. हा विषय सक्षम नागरिक बनवेल ज्यामुळे तुम्ही देशासाठी चांगले काम करण्यास प्रेरित व्हाल. विद्यार्थ्यांना सक्षम होण्यासाठी पाठ्यपुस्तकातील आशय उपयुक्त आहे.

विषय समिती, अभ्यासगट, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

तुमच्या सूचना, अभिप्राय आम्हांस जरूर कळवा. चांगल्या सूचनांचे आम्ही निश्चितच स्वागत करू.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(डॉ.सुनिल मगर)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतिय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# – शिक्षकांसाठी –

### राज्यशास्त्र ११ वी विषयाच्या अध्यापनाचा दृष्टिकोन

इयत्ता ११वी आणि १२वी च्या अभ्यासक्रमाबाबतचा दृष्टिकोन सर्वव्यापी आणि एकात्म आहे. इयत्ता ११वी च्या विद्यार्थ्यांना राज्यशास्त्राच्या विविध उपघटकांची तोंडओळख करून देण्यात आलेली आहे. इयत्ता १२वी चे पुस्तक समकालीन राज्यशास्त्रातील घटनांशी संबंधित असेल.

राजकीय संकल्पना, तुलनात्मक शासन आणि राजकारण, लोकप्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध या उपघटकांचा ११वी च्या राज्यशास्त्राच्या पुस्तकात समावेश केला आहे. जरी हे सर्व उपघटक स्वतंत्र विषय असले तरी ते परस्परांशी जोडलेले आहेत. म्हणूनच हे उपघटक शिकवताना यातील परस्पर संबंध लक्षात घेऊन शिकवणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, पहिल्या भागातील समता आणि न्याय या संकल्पना तुलनात्मक शासनाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या ठरतात. तसेच या संकल्पना विकास प्रशासनाचा अभ्यास करतानाही महत्त्वाच्या ठरतात. याचप्रमाणे जेव्हा आपण शेवटच्या भागात आंतरराष्ट्रीय घटनांचा अभ्यास करतो तेव्हा तुलनात्मक शासन या भागातील विविध शासन प्रकारांच्या माहितीचा उपयोग होतो.

**पारंपरिक वर्ग अध्यापनाबाहेरील उपक्रम :**

- उपक्रम : राज्य ही संकल्पना अमूर्त आहे, परंतु शासन ही मूर्त संकल्पना आहे म्हणूनच या दोन्हीतील फरक समजून घेणे महत्त्वाचे ठरते. भारतांतर्गत राष्ट्रे ओळखा. ती राज्ये का नाहीत याचा शोध घ्या.
- वर्ग चर्चा : भारतातील विविधतेवर चर्चा घडवून आणा. ही विविधता धर्म, प्रदेश आणि भाषा इत्यादींच्या संदर्भात स्पष्ट करा.
- सादरीकरण : स्वातंत्र्य, हक्क, समता आणि न्याय यांपैकी कोणतीही संकल्पना घ्या. भारतीय संदर्भात त्याचा अर्थ आणि अंमलबजावणी यांवर तक्ता तयार करा.
- नकाशांचा वापर : तुलनात्मक शासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्ही विभागांसाठी नकाशे हे महत्त्वाचे उपयोगी साधन आहे हे लक्षात घेऊन त्यांचा उपयोग करा.
- तुलनात्मक तक्ते : विद्यार्थ्यांना तीन देशांबाबत तुलनात्मक तक्ते करायला सांगणे उपयुक्त ठरेल.
- क्षेत्र भेट : शासनाचे प्रशासकीय कार्य समजून घेण्यासाठी कोणत्याही शासकीय कार्यालयाला भेट देणे उपयुक्त ठरेल.
- सांघिक उपक्रम : एखाद्या विद्यार्थी गटाचे मंत्रिमंडळ तयार करून सद्यस्थितीतील विषयांवर धोरण निर्मिती करून घेणे.
- अभिरूप संयुक्त राष्ट्रे : कोणतीही आंतरराष्ट्रीय समस्या घ्या. मुलांना विविध देशांचे प्रतिनिधित्व करायला सांगून त्यानुसार समस्यांवर भूमिका मांडायला सांगा.
- काही महत्त्वाची संकेतस्थळे या पृष्ठावर तसेच प्रत्येक पाठाच्या शेवटी पूरक माहितीसाठी websites देण्यात आल्या आहेत.

| | |
|---|---|
| **भारतीय शासनसंस्था** | : https://www.india.gov.in/ |
| **अमेरिकन शासनसंस्था** | : https://www.usa.gov./ |
| **युनायटेड किंगडमची शासनसंस्था** | : https://www.gov.uk/ |
| **संयुक्त राष्ट्रे** | : https://www.un.org/en/index.html |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | राजकीय संकल्पना | • राज्य आणि आधुनिक राज्यसंस्थेचा उदय या संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• स्वातंत्र्य, समता, हक्क व न्याय या राजकीय संकल्पना जाणून घेणे.<br>• या राजकीय संकल्पनांचा भारतातील सामाजिक विकासावर होणारा परिणाम जाणून घेणे. |
| २. | तुलनात्मक शासन आणि राजकारण | • अमेरिका, इंग्लंड व भारताच्या राजकीय व्यवस्थेतील साम्य व फरकाचे मुद्दे स्पष्ट करता येणे.<br>• राजकीय पक्ष आणि दबाव गट यांची सामाजिक व राजकीय बदल आणि आर्थिक विकासातील भूमिका स्पष्ट करता येणे.<br>• भारतीय न्यायमंडळाची बदलती भूमिका स्पष्ट करता येणे. |
| ३. | लोकप्रशासन | • भारतीय प्रशासकीय सेवेची मूळ चौकट/संरचना स्पष्ट करता येणे.<br>• विकासाच्या प्रक्रियेत लोकप्रशासनाची भूमिका स्पष्ट करता येणे.<br>• लोकांचे प्रश्न आणि प्रशासनाची बदलती भूमिका यातील परस्परसंबंध सांगता येणे.<br>• इ-शासनाचे महत्त्व सांगता येणे. |
| ४. | आंतरराष्ट्रीय संबंध | • आतंरराष्ट्रीय सहकार्य आणि आंतरराष्ट्रवादाचे महत्त्व स्पष्ट करता येणे.<br>• समकालीन काळातील प्रादेशिक संघटनांच्या उदयामागची कारणमीमांसा करणे.<br>• भारताच्या अलिप्ततावादाच्या धोरणातील दृष्टिकोन स्पष्ट करता येणे. |



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# अनुक्रमणिका

जगाचा नकाशा

**भाग १ : राजकीय संकल्पना**

प्रस्तावना ........................................................................

१. राज्य ........................................................................ २

२. स्वातंत्र्य आणि हक्क ........................................................ ९

३. समता आणि न्याय ........................................................ १८

**भाग २ : तुलनात्मक शासन आणि राजकारण**

प्रस्तावना ........................................................................

४. संविधानिक शासन ........................................................ २८

५. प्रतिनिधित्वाची संकल्पना ................................................ ३६

६. न्यायमंडळाची भूमिका .................................................... ४४

**भाग ३ : लोकप्रशासन**

प्रस्तावना ........................................................................

७. लोकप्रशासन ................................................................ ५३

८. विकास प्रशासन ............................................................ ६२

**भाग ४ : आंतरराष्ट्रीय संबंध**

प्रस्तावना ........................................................................

९. १९४५ नंतरचे जग – I ...................................................... ७२

१०. १९४५ नंतरचे जग – II .................................................... ८२

• **S.O.I. Note :** The following foot notes are applicable : (1) © Government of India, Copyright : 2019. (2) The responsibility for the correctness of internal details rests with the publisher. (3) The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line. (4) The administrative headquarters of Chandigarh, Haryana and Punjab are at Chandigarh. (5) The interstate boundaries amongst Arunachal Pradesh, Assam and Meghalaya shown on this map are as interpreted from the "North-Eastern Areas (Reorganisation) Act. 1971," but have yet to be verified. (6) The external boundaries and coastlines of India agree with the Record/Master Copy certified by Survey of India. (7) The state boundaries between Uttarakhand & Uttar Pradesh, Bihar & Jharkhand and Chattisgarh & Madhya Pradesh have not been verified by the Governments concerned. (8) The spellings of names in this map, have been taken from various sources.

• **या पाठ्यपुस्तकातील राष्ट्रध्वजाचे रंग प्रमाणित रंगछटांप्रमाणे नसल्यास ते तांत्रिक मर्यादांमुळे झाले आहेत.**



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**विषय प्रवेश...**

यावर्षी, प्रथमच आपण राज्यशास्त्र हा एक स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासणार आहोत. शाळेत तुम्ही हा विषय 'इतिहास आणि नागरिकशास्त्र' आणि 'इतिहास आणि राज्यशास्त्र' म्हणून अभ्यासला होता. नागरिकशास्त्र या विषयात तुम्ही व्यक्तीचे हक्क आणि कर्तव्य याविषयी माहिती करून घेतली आहे. राज्यशास्त्र या विषयात राजकीय व्यवस्था आणि संविधानाचा अभ्यास केला आहे.

आता आपण राज्यशास्त्राचा स्वतंत्र विषय म्हणून अभ्यास करताना त्यांच्या वेगवेगळ्या मिती समजून घेण्याची गरज आहे. अकरावी आणि बारावीत याचा प्रामुख्याने विचार करायचा आहे. अकरावीच्या अभ्यासक्रमात राज्यशास्त्राच्या या घटकांचा अभ्यास केला जाईल : (i) राज्यशास्त्रातील महत्त्वाच्या संकल्पनांची ओळख, (ii) तुलनात्मक शासन आणि राजकारण, (iii) लोकप्रशासन, (iv) आंतरराष्ट्रीय संबंध. विषयाच्या व्याप्तीचा समग्र दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठीचा पाया या पुस्तकाद्‌वारे तयार केला जाणार आहे.

या पुस्तकात चार भाग आहेत. राज्यशास्त्राच्या पारंपरिक क्षेत्रांशी हे चार विभाग संबंधित आहेत. प्रत्येक विभागात स्वतंत्र प्रस्तावनेच्या मदतीने तुम्हांला त्या क्षेत्राची ओळख करून दिली आहे, ती जरूर अभ्यासा. यामुळे तुम्हांला विषय अधिक चांगल्या पद्धतीने समजण्यास मदत होईल. प्रत्येक पाठात तुम्हांला काही कृती करण्यास/शोध घेण्यास सुचवले आहे. या कृती जरूर करून पहा.

इयत्ता बारावीत, या क्षेत्रात घडून आलेले नवीन बदल आपण अभ्यासणार आहोत. उदा., जागतिकीकरण, मानवतावादाचे आस्थेचे विषय, पर्यावरण, दारिद्र्य इत्यादींसारख्या संकल्पना अभ्यासणार आहोत. शासन आणि लोकप्रशासन या क्षेत्रांत आपण सुशासन आणि राष्ट्रीय एकात्मता यांच्याशी संबंधित बाबी अभ्यासणार आहोत. आंतरराष्ट्रीय संबंध अभ्यासताना १९९१ नंतरचे जग प्रामुख्याने अभ्यासणार आहोत.


या दोन वर्षांत आपण विषयाच्या मिती व विषयाची प्राथमिक ओळख याच्याही पलीकडे जाणे अपेक्षित आहे. विषयातील काही संकल्पना तुम्ही दैनंदिन व्यवहारात वापरणे अपेक्षित आहे. यामुळे तुम्हांला उच्च शिक्षणासाठी कोणते क्षेत्र निवडावे, याचे मार्गदर्शन मिळेल. तुम्ही सेवाभावी कार्य वा सामाजिक कार्य करू इच्छिता किंवा स्पर्धा परीक्षांची तयारी करू इच्छिता, त्यासाठी तुम्हांला राज्यशास्त्राचा अभ्यास निश्चितच फायद्याचा ठरेल. तुम्ही आयुष्यात पुढे काय करू इच्छिता, हे ठरवण्यासाठी नियोजन करण्यात तुम्हांला राज्यशास्त्र विषयाची निश्चितच मदत होईल.

या अभ्यासाकडे जगाला सामोरे जाण्याच्या मार्गातील एक पायरी म्हणून बघा. खूप शुभेच्छा !



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# विभाग १ : राजकीय संकल्पना

## प्रस्तावना



आपण आपले कुटुंब, समाज, प्रदेश, देश इत्यादींबाबत बोलत असतो. त्यांतील काही सामाजिक, तर काही राजकीय स्वरूपाच्या संस्था आहेत. राजकीय संस्था या शासनाशी संबंधित असतात. त्यात संसद, मंत्रिमंडळ, न्यायमंडळ इत्यादींचा समावेश होतो. आपण एका देशाचे नागरिक म्हणून आपल्याला काही हक्क असतात आणि आपली काही कर्तव्येदेखील असतात. ती संविधानात आणि कायद्यात नमूद केलेली असतात. आपण हे नियम पाळणे अपेक्षित असते. एखाद्या परदेशी व्यक्तीलादेखील तो ज्या देशात राहतो, तेथील नियम पाळावे लागतात.

एक नागरिक म्हणून आपण काही प्रश्नांना सामोरे जात असतो. मी राज्याच्या नियमांचे पालन का करावे? वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कोणत्या मर्यादा असतात ? मला न्याय कुठे मिळू शकतो? अनेक विचारवंतांनी यांसारख्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला आहे. व्यक्ती आणि राज्यसंस्था (शासन) यांच्यातील संबंध समजून घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

समाजात आणि राज्यसंस्थेत व्यक्तीचे कार्य काय असावे हे समजण्यासाठी विचारवंतांनी आपले विचार मांडले आहेत. आपण भारतीय विचारवंत पाहिले तर 'कौटिल्य' यांचे राज्यसंबंधांबाबत, महात्मा गांधींचे स्वराज या विचाराबाबत किंवा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्याय यांची उदाहरणे देऊ शकतो. तसेच पाश्चिमात्य विचारवंतांमध्ये नागरिकत्वाबाबत ॲरिस्टॉटल, लॉक यांचा हक्कांबाबतचा सिद्धान्त, स्वातंत्र्याबाबतचे मिलचे विचार, कम्युनिझमबाबत मार्क्स यांची मांडणी किंवा जॉन रॉल्स यांचे न्यायाच्या सिद्धान्तावरील विश्लेषण ही उदाहरणे घेता येतील. या व इतर विचारवंतांच्या योगदानाच्या आधारेच आपण स्वातंत्र्य, समता, न्याय, लोकशाही इत्यादी संकल्पनांचा अर्थ समजू शकतो. राजकीय विचारांच्या विश्लेषणांच्या आधारेच आपल्याला राजकीय सिद्धान्तांचा आणि संकल्पनांचा अभ्यास करता येतो.

या विभागामध्ये आपण काही महत्त्वाच्या राजकीय संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. त्यात स्वातंत्र्य, समता, हक्क आणि न्याय तसेच राष्ट्र व राष्ट्रवाद या संकल्पना आहेत.

या भागातील तीन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत :

**प्रकरण १. राज्य :** राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासन या संकल्पनांवर या प्रकरणात चर्चा केली आहे. या संकल्पनांदरम्यानचे संबंध समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण २. स्वातंत्र्य आणि हक्क :** या प्रकरणात स्वातंत्र्य आणि हक्क या संकल्पना सांगितल्या आहेत. या संकल्पना समाजातील व्यक्तीच्या स्थानाबाबत आहेत.

**प्रकरण ३. समता आणि न्याय :** हे प्रकरण समता आणि न्याय यांवर लक्ष केंद्रित करते. या संकल्पनांचा संबंध सामाजिक व्यवस्थेशी येतो.

या सर्व संकल्पनांची चर्चा भारताच्या संदर्भात देखील केली गेली आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १. राज्य

आपण शाळेत नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्राचा अभ्यास केला आहे. नागरिकशास्त्राचा रोख हा नागरिकांवर होता, तर राज्यशास्त्राचा राज्य, सरकार आणि प्रशासन इत्यादींवर होता. या प्रकरणात आपण राज्यशास्त्राच्या काही मूलभूत संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. या संकल्पना म्हणजे राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासनसंस्था.

**खालील वाक्ये वाचा.**

(१) माझा एक मित्र पंजाबी तर दुसरा मणिपुरी आहे.

(२) माझे दोन वर्गबंधू इराणी आहेत.

(३) आम्ही रोज राष्ट्रगीत म्हणतो. मला आपल्या राष्ट्रगीताचा अभिमान आहे.

(४) मला शासकीय कार्यालयात जाऊन माझा जन्मदाखला घ्यायचा आहे.

वरील प्रत्येक वाक्य कोणत्यातरी निश्चित घटकाशी संबंधित आहे. पहिले वाक्य त्या व्यक्तीची ओळख सांगते. ही ओळख म्हणजे एखादी व्यक्ती ही पंजाबी, तमिळ, मराठी, तेलुगु इत्यादी असल्याची ओळख आहे. ही त्या व्यक्तीची प्रादेशिक पातळीवरची ओळख आहे. दुसरे वाक्य ती व्यक्ती कोणत्या देशाची आहे हे दाखवते. ती व्यक्ती इराणी, श्रीलंकन, अमेरिकन इत्यादी असू शकते. त्या व्यक्तीचे ते राष्ट्रीयत्व असते. राष्ट्रगीताबाबतचे वाक्य हे त्या राज्याच्या संदर्भातील आहे. आपल्याला राष्ट्रगीताबाबत अभिमान आहे हे राष्ट्रवादाच्या भावनेचे प्रतीक आहे. जन्माचा दाखला घेणे ही शासनसंस्थेच्या संदर्भातील बाब आहे. या सर्व संकल्पनांचा आपण या प्रकरणात अभ्यास करणार आहोत.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

आपण भारत, पाकिस्तान, चीन इत्यादींचा उल्लेख करताना 'देश' हा शब्द वापरतो. कधी कधी आपण त्यांना 'राष्ट्र' किंवा 'राज्य' म्हणून देखील संबोधित करतो. या सगळ्या शब्दांचा अर्थ जरी सारखा असला तरी तांत्रिकदृष्ट्या या शब्दांमध्ये फरक आहे. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक, भाषिक, ऐतिहासिक पातळीवर समानता असेल तर मानसिक पातळीवर ऐक्याची भावना तयार होते. अशा वेळी त्याला 'राष्ट्र' म्हणून संबोधले जाते. एखाद्या राष्ट्राला राज्य होण्यासाठी पुढील घटकांची आवश्यकता असते : सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनसंस्था, निश्चित भूप्रदेश आणि लोकसंख्या. प्रत्यक्षात रोजच्या व्यवहारात आपण सार्वभौम शासनसंस्था असलेल्या स्वतंत्र देशाचे वर्णन करताना 'राज्य' या शब्दाऐवजी 'राष्ट्र' हा शब्दप्रयोग करतो. राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करताना मात्र आपण सार्वभौम शासनसंस्था असलेल्या देशाला 'राज्य' असे संबोधतो.

## राष्ट्र

राष्ट्र म्हणजे काय? सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पातळीवर स्वतःची समान ओळख असणारे लोक आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्याला 'राष्ट्र' असे म्हणतात. सांस्कृतिक, वांशिक, धार्मिक, भाषिक, ऐतिहासिक इत्यादी पातळींवर इथे एक भावनिक एकात्मतेची जाणीव असते. हे लोक एका निश्चित भौगोलिक प्रदेशात राहत असतीलच असे नाही.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**माहीत आहे का तुम्हांला ?**

राष्ट्र या शब्दाला इंग्रजीत Nation असे म्हणतात. Nation या शब्दाचे मूळ लॅटिनमधील Nasci या शब्दात आहे. Nasci चा अर्थ 'जन्माला येणे' असा आहे. म्हणूनच असे मानले जाते की एखाद्या राष्ट्राच्या लोकांमध्ये वांशिक आणि सांस्कृतिक संबंध आहेत.

**अर्नेस्ट बार्कर यांनी राष्ट्राची केलेली व्याख्या पुढीलप्रमाणे :**

एका निश्चित प्रदेशात, जरी वेगवेगळ्या वंशांचे लोक असले तरी ऐतिहासिक परंपरेद्वारे समान विचार आणि भावना, समान धर्म आणि भाषा असलेले लोक म्हणजे राष्ट्र.

**राष्ट्राची वैशिष्ट्ये काय आहेत ?**

(i) **लोकसंख्या :** राष्ट्राला लोकसंख्या असणे आवश्यक आहे. या लोकांमध्ये आपापसात काही साम्य असते. हे साम्य भाषिक, वांशिक, धार्मिक तसेच समान ऐतिहासिक किंवा सांस्कृतिक पातळीवरील अनुभवातून येऊ शकते. या वांशिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ऐक्याच्या दृष्टिकोनातून आपण एक राष्ट्र आहोत, हा समज निर्माण होतो.

(ii) **सामुदायिक ऐक्याची भावना :** लोकांमधील सांस्कृतिक समानतेतून, आपण एक असल्याची मानसिकता निर्माण होते. हा भावनिक पातळीवरचा विचार आहे. त्या समुदायाचा हा दृष्टिकोन आहे.

(iii) **राजकीय वेगळेपण :** सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक किंवा भाषिक समानता असलेले लोक जेव्हा एका निश्चित भूप्रदेशात राहतात तेव्हा त्यांच्यात आपण राजकीय पातळीवर वेगळे व्हावे ही भावना निर्माण होते. स्वयंनिर्णयाच्या जाणिवेतून हे विचार पुढे येतात. यातूनच राजकीय पातळीवरील स्वशासनाची मागणी निर्माण होऊ शकते.

**राष्ट्रवाद**

भारताला ब्रिटिश वसाहतवादापासून स्वातंत्र्य हवे होते. हा राजकीय स्वयंनिर्णयाचा लढा होता. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातून भारतीय राष्ट्रवादाची भावना व्यक्त होत होती.

राष्ट्रवाद ही एक प्रकारची राजकीय अस्मिता असते. ते आपल्या राष्ट्रावरचे प्रेम असते. लोक आपल्या राष्ट्राशी भावनिक पातळीवर जोडलेले असतात. या बंधनातून त्यांच्यात स्वत:ची ओळख आणि अभिमान निर्माण होतो आणि आपल्या राष्ट्रासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा निर्माण होते. या भावनांचे प्रदर्शन आपल्याला अनेक प्रसंगांतून दिसून येते. उदा., आपल्या राष्ट्राच्या क्रिकेट टीमचा जयजयकार करताना, राष्ट्रगीताच्या वेळी उभे राहताना किंवा युद्धादरम्यान आपल्या सेनादलाला पाठिंबा देताना. राष्ट्रवाद हा लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती आहे.



राष्ट्रवाद

**राष्ट्रवादाची काही वैशिष्ट्ये :**

(i) राष्ट्रवाद ही एक अशी शक्ती आहे की जी एकता निर्माण करू शकते. तसेच ती एखाद्या गोष्टीचा नाश देखील करू शकते. त्याचे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

प्रागतिक राष्ट्रवाद आणि आक्रमक राष्ट्रवाद असे वर्णन केले जाते. समाजाला एकत्रित करून विकास साध्य करण्याची क्षमता प्रागतिक राष्ट्रवादामध्ये असते, तर आक्रमक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ व दुरावा निर्माण करतो.

(ii) राष्ट्रवाद हा साम्राज्यवाद किंवा वसाहतवादविरोधी असतो. कोणत्याही क्षेत्रावर परकीय ताबा असण्याच्या तो विरोधात असतो. जगातील स्वातंत्र्याचे लढे या संकल्पनेतून निर्माण होताना दिसून येतात. राष्ट्रवाद हा स्वयंनिर्णयाच्या हक्काचा पुरस्कार करतो.

(iii) राष्ट्रवाद विविधतेला प्रोत्साहन देऊ शकतो. भारतात धार्मिक, वांशिक, भाषिक, प्रादेशिक इत्यादींची विविधता दिसून येते. तरीही आपण भारतीय राष्ट्रवादाबाबत बोलतो. 'विविधतेत एकता' हा भारताच्या राष्ट्रवादाचा गाभा आहे.

**चर्चा करा.**

जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकातील 'भारतमाता' आणि 'भारतातील विविधता आणि एकता' ही प्रकरणे वाचा. नेहरूंच्या लिखाणाच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादावर चर्चा करा.

राष्ट्रवादाकडे जेव्हा आपण राजकीय दृष्टिकोनातून बघतो तेव्हा त्याचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात.

(i) **उदारमतवादी राष्ट्रवाद :** उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा फ्रेंच राज्यक्रांतीत झाला. राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांच्या 'चौदा मुद्द्यां'मध्ये देखील हा दिसून येतो. राष्ट्र आणि सार्वभौमत्वाची सांगड राष्ट्रवाद घालून देतो. प्रत्येक राष्ट्राला स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचा अधिकार आहे, हे उदारमतवादी राष्ट्रवाद मानतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पहिल्या महायुद्धानंतर युरोप, अमेरिका आणि जगात चिरकालीन शांतता आणि स्थैर्य निर्माण व्हावे यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वूड्रो विल्सन यांनी चौदा मुद्द्यांची मांडणी केली.

(ii) **परंपरावादी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद समाजाला अंतर्मुख करणारा आहे. राष्ट्र आणि समाज यांचे संबंध अतिशय जवळचे आहेत असे तो मानतो. स्वदेशाभिमानाला हा राष्ट्रवाद खूप महत्त्व देतो.

(iii) **प्रसारवादी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद आक्रमक स्वरूपाचा असतो. 'राष्ट्रीय गौरवा'साठी राष्ट्रे आक्रमक होतात आणि साम्राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. वसाहतवाद हे प्रसारवादी राष्ट्रवादाचे एक उदाहरण आहे.

(iv) **वसाहतवादविरोधी राष्ट्रवाद :** हा राष्ट्रवाद राष्ट्राच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात बघितला जातो. भारताच्या स्वातंत्र्यादरम्यान भारताने या राष्ट्रवादाचा अनुभव घेतला आहे.

### राज्य

भारताच्या संविधानाच्या सरनाम्यात 'सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक' असे शब्दप्रयोग आहेत. इथे सार्वभौमत्व म्हणजे राष्ट्राला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार आहे, हे अभिप्रेत आहे. म्हणजेच, हे राष्ट्र कोणत्याही इतर राष्ट्रांवर निर्णय घेण्याबाबत अवलंबून नाही. हे राष्ट्र स्वतःचे निर्णय स्वतंत्रपणे घेऊ शकते तसेच त्याला आपले कायदे करण्याचा आणि राज्य करण्याचा अधिकार आहे. जेव्हा एखादे राष्ट्र सार्वभौम होण्याची इच्छा दर्शवते तेव्हा ते स्वयंनिर्णयाच्या हक्काची मागणी करत असते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**राज्याच्या काही व्याख्या**

**ॲरिस्टॉटल :** राज्य हा परिपूर्ण आणि स्वावलंबी आयुष्य असलेल्या कुटुंबांचा आणि खेड्यांचा संघ असतो. यात आनंदी आणि प्रतिष्ठित आयुष्य असणे अपेक्षित आहे.

**जाँ बोडीन :** राज्य हे कुटुंबांचे असे संघटन आहे, की ज्यात कुटुंबे आणि त्यांच्या मालकीची साधने सर्वोच्च शक्तीने तसेच तर्काने शासित असते.

**वूड्रो विल्सन :** एका विशिष्ट भूप्रदेशात कायद्यासाठी सुसंघटित केलेले लोक म्हणजे राज्य होय.

**हॅरॉल्ड लास्की :** वाटून दिलेल्या भौतिक क्षेत्रात, सर्व संस्थांवर श्रेष्ठत्वाचा दावा करणारे लोक आणि शासन यांत विभागलेला भूप्रदेशात्मक समाज म्हणजे राज्य होय.



ॲरिस्टॉटल
(३८४ BCE-३२२ BCE)
प्राचीन ग्रीक तत्वज्ञ, अभ्यासक



जाँ बोडीन
(१५३०-१५९६)
फ्रेंच कायदेपंडित आणि विचारवंत



वूड्रो विल्सन
(१८५६-१९२४)
अमेरिकन मुत्सद्दी आणि अभ्यासक तसेच अमेरिकेचे अठ्ठाविसावे राष्ट्राध्यक्ष



हॅरॉल्ड लास्की
(१८९३-१९५०)
ब्रिटिश राजकीय विचारवंत

राजकीय स्वयंनिर्णयाच्या हक्काचा आग्रह हा एखाद्या राष्ट्राला राज्याच्या दिशेने घेऊन जातो. एखादे राष्ट्र, राज्य केव्हा होते? राष्ट्राला राज्याचा दर्जा प्राप्त होण्यासाठी सार्वभौमत्व, स्वतंत्र शासनव्यवस्था, भूप्रदेश आणि लोकसंख्या हे घटक आवश्यक असतात.

राज्याला राजकीय समुदाय म्हणून संबोधित केले जाते. राज्याचे अस्तित्व आपल्याला सातत्याने जाणवत असते. शिक्षण, समाजकल्याण, संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था यांसारखी कार्ये राज्य करत असते. त्याचबरोबर जन्म-मृत्यूची नोंदणी, पॅन कार्ड किंवा आधार कार्ड मिळवणे, लग्नाची नोंदणी यांसारखी वैयक्तिक कार्येदेखील राज्यातर्फे केली जातात. राज्य हे हक्क प्रदान करते, न्याय देते, समानता ठेवते आणि स्वातंत्र्याची हमी देते.

**राज्याचे घटक**

(i) **सार्वभौमत्व :** कधी कधी सार्वभौमत्व हा स्वातंत्र्य या शब्दाऐवजी देखील वापरला जातो. सार्वभौमत्व हा कायद्याच्या चौकटीतील शब्द आहे, तर स्वातंत्र्य या शब्दाचे स्वरूप राजकीय आहे. राज्य हे कायदेशीरदृष्ट्या सार्वभौम असते आणि त्याला स्वतःचे संविधान असते. उदा., भारत १९४७ साली राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला आणि १९५० साली संविधान अमलात आणल्यानंतर सार्वभौम राज्य झाले.

(ii) **शासनसंस्था :** प्रत्येक सार्वभौम राज्याला स्वतःची शासनसंस्था असणे आवश्यक असते. शासन हे सार्वभौम आणि स्वतंत्र असणे गरजेचे आहे. उदा., ब्रिटिश राजवटीत भारतात शासनव्यवस्था होती, परंतु ती स्वतंत्र व सार्वभौम नव्हती. म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीच्या आधी भारत हे राज्य नव्हते.

राज्याच्या संस्था या सार्वजनिक स्वरूपाच्या असतात. या सार्वजनिक संस्थांमध्ये कार्यकारी मंडळ,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कायदेमंडळ व न्यायमंडळ, नोकरशाही इत्यादी शासनव्यवस्थेच्या घटकांचा समावेश होतो. धोरणनिर्मिती, कायदे करणे, निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी ही जबाबदारी सार्वजनिक संस्थांची असते. आपण सार्वजनिक संस्था आणि खासगी संस्था यांत फरक करतो. खासगी संस्था या नागरी समाजाचा भाग असतात. उदा., खासगी व्यवसाय, मंडळ इत्यादी. त्यात सार्वजनिक संस्थांनाच राज्याच्या नावे कार्य करण्याची अधिमान्यता असते.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

सर्व नागरिक हे राज्याचे सभासद असतात. राज्याचे निर्णय जनहिताच्या दृष्टीने होत असतात. निर्णय घेण्याच्या अधिकाराला अधिमान्यता असे म्हणतात. राज्याला जनहितासाठी निर्णय घेण्याची अधिमान्यता असते.

(iii) **भूप्रदेश :** राज्याच्या सीमेअंतर्गत असलेला भौगोलिक प्रदेश म्हणजेच भूप्रदेश होय. राज्याला निश्चित भूप्रदेश असणे आवश्यक आहे. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे त्याला त्याचे अधिकार क्षेत्र म्हणतात. अधिकार क्षेत्राबाबत राज्याला निर्णय घेण्याचा कायदेशीर अधिकार असतो.

**भूप्रदेश म्हणजे काय?**

भूप्रदेशाचे तीन घटक असतात : (i) राष्ट्रीय सीमांतर्गत असलेली प्रत्यक्ष भूमी (ii) किनारपट्टीलगतचा सागरी प्रदेश हा किनारपट्टीपासून 12 नॉटिकल मैल (22.2 किमी किंवा 13.8 मैल) असतो. (iii) आपल्या भूप्रदेशावरील आकाशाचा भाग. (आकाशात किती उंचीपर्यंत आपला प्रदेश असेल याबाबत आंतरराष्ट्रीय कायद्यात उल्लेख नाही.)

(iv) **लोकसंख्या :** राज्याच्या अस्तित्वासाठी लोक आवश्यक असतात. लोकांमध्ये कोणत्याही प्रकारची विविधता असू शकते. ती भाषिक, धार्मिक, सांस्कृतिक, वांशिक इत्यादी स्वरूपाची असू शकते. म्हणजेच एखाद्या राज्यात अनेक 'राष्ट्रांचा' समावेश असू शकतो. उदाहरणार्थ, सोव्हिएट रशियात अनेक राष्ट्रीय लोकांचा समावेश आहे. उदाहरणार्थ, रशियन लिथुआनियन, लाटवियन, इस्टोनियन, युक्रेनियन इत्यादी. तसेच युनायटेड किंग्डममध्ये इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड या राष्ट्रांचा समावेश होतो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पॅलेस्टाईन :** पॅलेस्टाईनच्या जनतेचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून पॅलेस्टाईन मुक्ती संघटनेला (PLO) मान्यता आहे. त्यांनी गाझा आणि वेस्ट बँक हा प्रदेश पॅलेस्टाईनचा भूप्रदेश म्हणून जाहीर केला आहे. परंतु पॅलेस्टाईनचे सार्वभौम सरकार नाही. परंतु २०१२ सालापासून पॅलेस्टाईनला संयुक्त राष्ट्रांत 'सभासद नसलेला निरीक्षक' दर्जा देण्यात आला आहे. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या शंभरहून अधिक राष्ट्रांनी पॅलेस्टाईनला राज्याचा दर्जा दिला आहे.

**करून पहा :** राष्ट्र आणि राज्याच्या वैशिष्ट्यांमधील समानता आणि फरक दाखवणारा तक्ता तयार करा.

## राज्य आणि शासनसंस्था

आपण साधारणत: राज्य आणि सरकार या शब्दांचा प्रयोग करताना त्यांतील फरक लक्षात घेतोच असे नाही. या दोन्ही वेगवेगळ्या संकल्पना आहेत. सर्वसामान्य जनतेच्या गरजा भागवण्यासाठी निर्माण केलेल्या राजकीय संस्था म्हणजे राज्य होय. राज्याचा जो काही संकल्प आहे त्याला आकार देणे, तो व्यक्त करणे आणि तो प्रत्यक्षात आणण्याचे कार्य त्या राज्याचा प्रतिनिधी म्हणून शासन करत असते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शासनसंस्था हा राज्याचा एक मुख्य घटक आहे. त्याचे मुख्य स्वरूप हे प्रशासकीय असते. कायदा आणि सुव्यवस्था राखणे, जनकल्याण इत्यादी राज्याची महत्त्वाची कार्ये असतात. ही कार्ये शासनामार्फत केली जातात. शासनसंस्थांची तीन अंग असतात. कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ आणि न्यायमंडळ. शासनसंस्था या संकल्पनेबाबत अधिक विस्तृत माहिती या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दिली आहे.

**राज्य आणि शासनसंस्था यांच्यातील काही फरक**

| राज्य | शासनसंस्था |
|---|---|
| राज्य ही अमूर्त स्वरूपाची संकल्पना आहे. | शासनसंस्था मूर्त स्वरूपाची असते. |
| शासनसंस्थेपेक्षा राज्याचे स्वरूप अधिक व्यापक आहे. त्यात सर्व सार्वजनिक संस्था तसेच समाजातील सर्वांचाच नागरिक म्हणून समावेश होतो. | शासनसंस्था हा राज्याचा एक भाग आहे. |
| राज्य हे कायमस्वरूपी असते. | शासनसंस्था ही निश्चित कालावधीसाठी असते. शासनव्यवस्थेत बदल होऊ शकतो. सरकार बदलू शकते. |
| राज्य हे व्यक्तिनिरपेक्ष असते. ते राजकीयदृष्ट्या तटस्थ असते. | शासनसंस्थेला विचारप्रणालीवर आधारित अजेंडा असतो. त्यानुसार त्यांना धोरणांची अंमलबजावणी करायची असते. |
| राज्य हे सार्वभौम असते. | शासनाला राज्याकडून अधिकार प्राप्त होतात. राज्याच्या अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी शासनसंस्था करते. |

आपण या प्रकरणात राष्ट्र, राष्ट्रवाद, राज्य आणि शासनसंस्था या संकल्पनांचा अभ्यास केला. पुढील दोन प्रकरणात आपण स्वातंत्र्य, हक्क, समानता आणि न्याय या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत. या संकल्पना राज्याच्या कार्याशी निगडित आहेत.

**Please see the following websites for further information:**

**The Discovery of India**
Jawaharlal Nehru *The Discovery of India* (Delhi : Oxford University Press, 1985 )
Chapter: 'Bharat Mata' Page: 59
Chapter: The Variety and Unity of India Page: 61
https://archive.org/stream/TheDiscoveryOfIndia-Eng-JawaharlalNehru/discovery-of-india_djvu.txt



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. इंग्रजीतील Nation हा शब्द लॅटिन शब्द ......... पासून निर्माण झाला आहे.
(Nasci, Natio, Natalis, Nauta)

२. उदारमतवादी राष्ट्रवादाचा उगम हा .......... राज्यक्रांतीत झाला.
(अमेरिकन, रशियन, फ्रेंच, ब्रिटिश)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) ॲरिस्टॉटल - जर्मन विचारवंत
(ii) जाँ बोडीन - फ्रेंच विचारवंत
(iii) वूड्रो विल्सन - अमेरिकन विचारवंत
(iv) हॅरॉल्ड लास्की - ब्रिटिश विचारवंत

**(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. लोकांना देशाशी राजकीय पातळीवर एकनिष्ठ करणारी शक्ती -

२. ज्या भूप्रदेशावर राज्याला शासन करण्याचा अधिकार आहे -

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. प्रागतिक राष्ट्रवाद लोकांमध्ये तेढ निर्माण करू शकतो.

२. सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार

३. पॅलेस्टाईन हे राज्य आहे.

४. प्रसारवादी राष्ट्रवाद हा आक्रमक राष्ट्रवादाचा प्रकार आहे.

**प्र.३ आपले मत नोंदवा.**

भारत एक राज्य आहे.

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. राष्ट्राची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

२. राष्ट्रवाद म्हणजे काय हे सांगून त्याचे विविध प्रकार स्पष्ट करा.

**प्र.५ खालील प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

राज्याचे खालील घटक स्पष्ट करा.
(अ) सार्वभौमत्व (ब) शासनसंस्था
(क) लोकसंख्या (ड) भूप्रदेश

**उपक्रम**

सर्वांत लहान भूप्रदेश व सर्वांत मोठा भूप्रदेश असलेली राज्ये जगाच्या नकाशा आराखड्यात दर्शवा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# २. स्वातंत्र्य आणि हक्क

लोकशाहीमध्ये नागरिकांना काही हक्क आणि कर्तव्ये असतात. जेव्हा या हक्कांचे आणि कर्तव्यांचे रक्षण केले जाते तेव्हा लोकांना स्वातंत्र्य मिळते, असे मानले जाते. हक्क म्हणजे लोकांना शासनामार्फत मिळालेले विशेषाधिकार होय. स्वातंत्र्य हे लोकशाहीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

## स्वातंत्र्य

स्वातंत्र्य आणि हक्क या पाठात आपण बंधनांचा अभाव, निवडीचे स्वातंत्र्य, अनुकूल परिस्थितीची उपलब्धता आणि सुखप्राप्ती या संदर्भात स्वातंत्र्याचा अर्थ समजून घेणार आहोत. तसेच स्वातंत्र्याचे नकारात्मक आणि सकारात्मक हे दोन पैलू आणि भारतीय संविधानानुसार स्वातंत्र्य आणि हक्क या संकल्पना समजून घेऊ.


स्वातंत्र्य या संकल्पनेचे मुक्तता किंवा स्वराज्य असेही अर्थ असू शकतात. स्वतंत्र असणे म्हणजे मुक्त असणे. गुलामगिरीतून मुक्तता, जुलमी राजवटीपासून सुटका, परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्तता म्हणजे स्वातंत्र्य होय. स्वातंत्र्य हे व्यक्तीचे, समाजाचे व राष्ट्राचे असते. व्यक्ती विकासासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्कांनाही स्वातंत्र्य असे म्हटले जाते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

परकीय सत्तेपासून समाज मुक्त असणे म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य होय. आपला सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी व्यक्तीला आवश्यक असलेले स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य होय. हा राष्ट्रीय स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्यातील फरक आहे.


**स्वातंत्र्याचे स्वरूप :** 'स्वातंत्र्य' या संकल्पनेचे स्वरूप समजून घेताना पुढील विचारवंतांची मते अभ्यासावी लागतील.

**थॉमस हॉब्ज :** यांच्या मते 'स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक अधिकार आहे'. एखादी कृती करण्यासाठी व्यक्तीवर कोणतेही बंधन नसणे म्हणजे स्वातंत्र्य होय. ते म्हणतात की मनुष्याला स्वातंत्र्यप्राप्तीसाठी भीती आणि गरज या गोष्टी प्रेरणा देतात. त्यांनी बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य असा अर्थ सांगितला आहे.



थॉमस हॉब्ज (१५८८-१६७९)
एक ब्रिटिश तत्त्वज्ञ

**जॉन लॉक :** लॉक यांच्या मते, स्वातंत्र्य हा मनुष्याचा नैसर्गिक अधिकार आहे. त्यांनी नैतिकतेच्या आधारे स्वातंत्र्याची संकल्पना मांडली. नैतिकदृष्ट्या व्यक्तीने इतरांच्या जीवित व स्वातंत्र्याच्या हक्कास हानी पोहचवू नये. प्रत्येकाने समतेच्या तत्त्वाचे उल्लंघन न करता स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावा. स्वातंत्र्य हे मनुष्य जीवनाचे अभिन्न अंग आहे. लॉक यांनी स्वातंत्र्याला जास्त महत्त्व दिले. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती विवेकी आहे. म्हणून त्यांनी सदसद्‌विवेकबुद्‌धीने स्वातंत्र्य उपभोगण्याचे समर्थन केले. मात्र त्यांना अमर्याद स्वातंत्र्याची संकल्पना मान्य नव्हती. त्यांच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेत बंधनांचा अभाव आणि निवडीचे स्वातंत्र्य या दोन तत्त्वांचा समावेश आहे.




जॉन लॉक (१६३२-१७०४)
एक ब्रिटिश तत्त्वज्ञ



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**जाँ जॅकवेस रुसो :** रुसो यांनी स्वातंत्र्याचा सामूहिक दृष्टिकोनातून विचार केला आहे. त्यांच्या मते, व्यक्तीने संपूर्ण समाजाच्या हितासाठी स्वतःचा स्वार्थ बाजूला ठेवला पाहिजे. त्यांची स्वातंत्र्याची संकल्पना समाजातील व्यक्तीला वर्गव्यवस्था आणि विषमतेपासून स्वातंत्र्य देणारी आहे. त्यांच्या मते, विषमता हा स्वातंत्र्यप्राप्तीतील अडथळा आहे. तसेच, नागरी आणि राजकीय समाजाच्या उदयामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यातून व्यक्तीला मुक्तता मिळणे म्हणजे स्वातंत्र्य होय. हे अडथळे पुढील दोन प्रकारांत मांडले आहेत. (i) व्यक्तीला सार्वजनिक हिताचा विचार करण्यास रोखणारे अडथळे. (ii) समाजातील विषमतेमुळे निर्माण होणारे अडथळे.



जाँ जॅकवेस रुसो
(१७१२-१७७८)
एक जिनीव्हन तत्वज्ञ

**रुसो**

"मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र आहे. परंतु तो सर्वत्र शृंखलांमध्ये बंदिस्त आहे." असे रुसो यांचे मत आहे. रुसो यांचा जन्म जिनीव्हामध्ये झाला. त्यांना फ्रेंच राज्यक्रांतीचा जनक मानतात.

रुसो यांनी हॉब्ज आणि लॉकप्रमाणे स्वातंत्र्याला नैसर्गिक अधिकार मानले नाही. समाज एकत्रित येऊन नागरिकांच्या जीविताचे व हिताचे संरक्षण करतो. रुसो यांनी सामाजिक विषमतेपासून मुक्ततेच्या स्वातंत्र्याचा विचार मांडला. त्यांच्या मते स्वातंत्र्याच्या संकल्पनेत पर्याय निवडण्याचे स्वातंत्र्य आणि अनुकूल परिस्थितीची उपलब्धता महत्वाची आहे.


**जेरेमी बेंथॅम :** जेरेमी बेंथॅम यांनी सुखप्राप्तीच्या दृष्टिकोनातून स्वातंत्र्याचा अर्थ स्पष्ट केला. त्यांनी स्वातंत्र्य आणि सुख यांचा परस्परांशी संबंध जोडला. सुख प्राप्त होण्यासाठी आणि दुःख टाळण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे, असा विचार त्यांनी मांडला.



जेरेमी बेंथॅम (१७४८ -१८३२)
एक ब्रिटिश तत्वज्ञ

जेरिमी बेंथॅमच्या विचारात 'अधिकतम लोकांचे अधिकतम सुख' हा मूलमंत्र होता. यास नकारात्मक स्वातंत्र्य असे म्हटले जाते.


**जॉन स्टूअर्ट मिल :** मिल यांनी स्वातंत्र्याच्या संकल्पनेत व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे समर्थन केले आणि राज्याच्या अमर्यादित अंकुशाचा विरोध केला. त्यांनी दिलेली स्वातंत्र्याची संकल्पना म्हणजे 'स्वतःवर (व्यक्तिशः), स्वतःच्या शरीरावर आणि बुद्धीवर (मन) व्यक्तीचा पूर्ण अधिकार आहे.' मिलचे स्वातंत्र्यावरचे मुद्दे आजही समर्पक आहेत. त्यांचा स्वातंत्र्यविषयक विचार 'ऑन लिबर्टी' (On Liberty) या ग्रंथात पाहायला मिळतो.



जॉन स्टूअर्ट मिल
(१८०६-१८७३)
एक ब्रिटिश तत्वज्ञ

## स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना

इसाया बर्लिन यांनी १९५८ मध्ये प्रकाशित केलेल्या 'स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना' (Two Concepts of Liberty) या निबंधामध्ये नकारात्मक व सकारात्मक स्वातंत्र्य



इसाया बर्लिन (१९०९-१९९७)
रशियन-ब्रिटिश तत्वज्ञ आणि इतिहासतज्ज्ञ



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

या दोन संकल्पना मांडल्या आहेत. सकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना आधुनिक उदारमतवादी विचारप्रणालींमधून घडलेली आहे, तर नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना अभिजात उदारमतवाद आणि नवउदारमतवाद या दोन विचारप्रणालींच्या प्रभावातून घडलेली आहे. इसाया बर्लिन यांच्या मते, स्वातंत्र्य बंधनविरहित असते.



**माहीत आहे का तुम्हांला?**

**काही संकल्पनांचे थोडक्यात वर्णन :**

- उदारमतवाद ही एक राजकीय विचारधारा आहे. व्यक्तिवाद हा या विचारधारेच्या गाभ्याशी आहे. व्यक्तिवाद, विवेकवाद, स्वातंत्र्य, न्याय आणि सहिष्णुता ही उदारमतवादाची मूलभूत मूल्ये आहेत.
- अभिजात उदारमतवाद हा 'किमान शासन' या कल्पनेवर आधारलेला आहे. यात सरकारी हस्तक्षेप हा अनावश्यक आणि नुकसानकारक असल्याचे मानले जाते.
- आधुनिक उदारमतवाद म्हणजे राज्याला व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास दिलेली मान्यता होय. राज्यसंस्था कल्याणकारी धोरणांद्वारे सामाजिक विषमता दूर करून आणि त्याद्वारे व्यक्तीचे स्वातंत्र्य राखण्यासाठी व त्याचा विस्तार करण्यासाठी योगदान देऊ शकते.
- नवउदारमतवाद मुक्त बाजारपेठ व मुक्त व्यापाराचा पुरस्कर्ता आहे. खासगीकरण, कल्याणकारी योजनांवरच्या खर्चात कपात, खासगी कार्पोरेट कंपन्यांना करात विशेष सवलत इत्यादींना नवउदारमतवादी धोरणात महत्त्वाचे स्थान असते.

**नकारात्मक स्वातंत्र्य :** नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना अभिजात उदारमतवाद आणि नवउदारमतवाद या दोन विचारप्रणालींमधून उदयास आली आहे. जे.एस.मिल, इसाया बर्लिन, फ्रेडरिक हायेक, रॉबर्ट नॉझिक या विचारवंतांच्या लेखनामध्ये नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. स्वातंत्र्यावरील सर्व बंधनांना नकारात्मक स्वातंत्र्य नाकारते. राज्यसंस्थेने व्यक्तीच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास नकारात्मक स्वातंत्र्य विरोध करते. राज्यसंस्था सामाजिक, आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप करत नाही हे नकारात्मक स्वातंत्र्याचे वैशिष्ट्य ठरते. व्यक्तिस्वातंत्र्य बंधनांमुळे धोक्यात येते. यासाठीच धाक, दहशत, जबरदस्ती, राज्यसंस्थेचा हस्तक्षेप यांना ही संकल्पना विरोध करते.

विचाराचे स्वातंत्र्य हे नकारात्मक स्वातंत्र्याचा आधार आहे. जेरेमी बेंथॅम यांनी नकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. व्यक्तीला आपले हित चांगले समजते. त्यामुळे राज्याने त्यामध्ये अडथळे आणू नयेत, असे तत्त्व बेंथॅम यांनी मांडले. 'मॅन्युअल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी' या ग्रंथात त्यांनी मुक्त आर्थिक व्यवहार हे तत्त्व मांडले. त्याचप्रमाणे जे.एस.मिल यांनी 'ऑन लिबर्टी' या ग्रंथात नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे. मिलने सामाजिक, राजकीय व्यवस्थेच्या हस्तक्षेपापासून स्वातंत्र्याच्या संरक्षणाचा पुरस्कार केला. याशिवाय मिल यांनी विचारस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य यांतील आंतरसंबंध स्पष्ट केले. व्यक्तीच्या विकासासाठी मिलने व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार नकारात्मक स्वातंत्र्य म्हणून केला, परंतु त्यांनी स्वातंत्र्याच्या परिणामाचे मोजमाप केले. त्यांच्या मते कोणत्याही कृतीचा व्यक्तीपेक्षा समाजावर गुणात्मक परिणाम अधिक होतो. अशा परिस्थितीत मिलने नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना नाकारली. म्हणून मिलची नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना इसाया बर्लिनपेक्षा वेगळी आहे.

इसाया बर्लिन यांच्या मते कृती करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य होय. या तत्त्वानुसार कृती दुय्यम ठरते आणि कृती करण्याची संधी जास्त महत्त्वाची ठरते. या तत्त्वानुसार कृतीचा परिणाम महत्त्वाचा ठरत नाही; त्यामुळे त्याचे मोजमापही केले जात नाही. यामुळे ही संकल्पना गुणवत्तेला महत्त्व देत नाही. उदा., ही संकल्पना



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com


स्वत:च्या आवडीनुसार शिक्षण घेणे, नोकरी करणे, उपासमार सहन करणे या तीन गोष्टींमध्ये गुणात्मक फरक करत नाही. थोडक्यात, त्यांच्या मते कृतीच्या परिणामापेक्षा कृतीची संधी मिळणे जास्त महत्वाचे आहे.

इसाया बर्लिन यांनी नकारात्मक स्वातंत्र्याची पुढील वैशिष्ट्ये नोंदवली आहेत.


(i) व्यक्तीला पर्याय निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. पर्याय निवडीवर बंधन असू नये. अशा अडथळ्यांस विरोध हे नकारात्मक स्वातंत्र्याचे वैशिष्ट्य आहे.

(ii) नकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना नवउदारमतवादी विचारांवर आधारित आहे.

फ्रेडरिक हायेक, रॉबर्ट नॉझिक यांनी नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना स्पष्ट केली आहे. फ्रेडरिक हायेक हे नवउदारमतवादी विचारवंत होते. ते व्यक्तिवादी विचारांचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वातंत्र्य म्हणजे कोणत्याही स्वरूपाचा अडथळा नसल्याची स्थिती असे वर्णन केले आहे. आर्थिक व्यक्तिस्वातंत्र्याचा त्यांनी पुरस्कार केला. त्याचबरोबर व्यक्तिजीवनातील राज्याचा हस्तक्षेप अमान्य केला. त्यांच्या मते, आर्थिक स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य आहे. खऱ्या स्वातंत्र्यावर नियंत्रण किंवा बंधन नसावे.



फ्रेडरिक हायेक (१८९९-१९९२)
अँग्लो-ऑस्ट्रियन तत्वज्ञ



रॉबर्ट नॉझिक (१९३८-२००२)
अमेरिकन तत्वज्ञ

रॉबर्ट नॉझिक हे नवउदारमतवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांच्या मते व्यक्तीला मान्य नसलेली बंधने त्याच्यावर लादली गेली की व्यक्तीचे स्वातंत्र्य अडचणीत येते. यामुळे स्वातंत्र्य बंधनांपासून सुरक्षित ठेवले पाहिजे. राज्य, समाज आणि आर्थिक बंधनापासून व्यक्ती स्वतंत्र असावी, अशी त्यांची भूमिका होती.

> **इसाया बर्लिन यांचे नकारात्मक स्वातंत्र्याविषयीचे विधान :** 'मी कोणत्याही व्यक्तीचा गुलाम नाही.' **इसाया बर्लिन यांचे सकारात्मक स्वातंत्र्याविषयीचे विधान :** 'मीच माझा मालक आहे'.

**सकारात्मक स्वातंत्र्य :** सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार मुख्यत्वेकरून रुसो आणि हर्बट मार्क्युझ यांनी केला. सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना आधुनिक उदारमतवादातून उदयाला आली आहे. नकारात्मक स्वातंत्र्य संकल्पनेतून स्वातंत्र्याची संकल्पना परिपूर्ण होत नाही. आधुनिक उदारमतवाद्यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभाव आणि सामूहिक हित या संकल्पनांमध्ये सहसंबंध असल्याचा विचार मांडला. ते असेही म्हणतात, की स्वातंत्र्याचा परिणाम समता आणि न्यायावर होतो.

सकारात्मक स्वातंत्र्यानुसार कायदा व्यक्तीला मार्गदर्शन करतो. कायद्याच्या मदतीने व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होते. रुसो यांनी सकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना मांडली आहे कारण त्यांच्या मते, नैतिक कायद्याच्या पालनातून व्यक्तीला अधिक स्वातंत्र्य मिळू शकते. त्यांनी समाजाच्या विवेकपूर्ण 'सामूहिक इच्छांचा'ही स्वीकार केला. राज्य ही एक सार्वभौम सत्ता आहे जिचे प्रतिनिधित्व शासनसंस्था करते, म्हणूनच ते व्यक्तीवरील राज्याचे नियंत्रण मान्य करतात. म्हणून राज्याने व्यक्तीवर बंधने घालावीत या विचारांचे रुसो समर्थन करतात.

हर्बट मार्क्युझ हे नवमार्क्सवादी विचारवंत होते. त्यांनी सकारात्मक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांच्या मते कामगार वर्गाला त्यांचे ध्येय आणि



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

गरजांची जाणीव नसते. म्हणूनच त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीसाठी क्रांतिकारी श्रेष्ठीजनांकडून मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. 'One Dimensional Man' व 'Eros and Civilisation' या पुस्तकांतून मार्क्युझ यांनी सकारात्मक स्वातंत्र्याबद्दलची त्यांची मते मांडली.



हर्बट मार्क्युझ
(१८९८-१९७९)
जर्मन-अमेरिकन तत्त्वज्ञ

ते म्हणतात, की विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे लोकांचे राहणीमान तर सुधारले परंतु विषमता कमी झाली नाही. यामुळे समाजाच्या सांस्कृतिक विकासात अडथळा आला. मार्क्युझ यांच्या मते, अमेरिकन समाजातील व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वत्व हरवले आहे. सकारात्मक स्वातंत्र्याबद्दल युक्तिवाद करताना ते असे म्हणतात, की मनुष्य सोन्याच्या पिंजऱ्यातील पक्ष्याप्रमाणे आहे जो मोकळ्या आकाशात झेप घेण्याची क्षमता हरवून बसला आहे. त्याला निखळ स्वातंत्र्याचा अनुभव नसल्यामुळे तो क्रांतीचा विचार देखील करू शकत नाही. सामूहिक जीवनात सामूहिक नियंत्रण आवश्यक असते, हे सकारात्मक स्वातंत्र्याचे तत्त्व आहे असे त्यांनी मांडले आणि म्हणूनच त्यांनी राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाला मान्यता दिली. उदाहरणार्थ, प्रदूषणमुक्त वातावरण कायम राखण्यासाठी सर्वांनी मिळून सामूहिक हितासाठी प्रयत्न करावा. त्यासाठी सक्ती करावी लागली तरी ती समूहाच्या हितासाठी उचित असते.

### स्वातंत्र्य विषयाची भारतीय संकल्पना

भारतात स्वातंत्र्याच्या संकल्पनेला मुक्ती ही संकल्पना वापरली जाते. परंपरागत अर्थाने मोक्ष किंवा पुनर्जन्माच्या चक्रातून सुटका म्हणजे मुक्ती असा आध्यात्मिक अर्थ आहे, म्हणून मुक्ती ही आध्यात्मिक संकल्पना आहे; मात्र आधुनिक काळात, सामाजिक बंधनातून मुक्ती असा स्वातंत्र्याचा अर्थ घेतला जातो.

ब्रिटिशकालीन भारतात स्वातंत्र्याची संकल्पना तीन पद्धतींनी आकाराला आली.

(i) ब्रिटिशांनी व्यक्तीचे अधिकार व स्वातंत्र्य सुरक्षित राखण्यासाठी काही कायदे केले. उदाहरणार्थ, सती बंदीचा कायदा. तसेच त्यांनी पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार व प्रचार केल्यामुळे स्वातंत्र्याचा पाश्चिमात्य विचार भारतात आला. परिणामतः, भारतीय स्वातंत्र्याची चळवळ आणि समाज सुधारणा या विचारांनी प्रभावित झाली.

(ii) महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाच्या संदर्भाने स्वातंत्र्याच्या अर्थाचे विविध पैलू सांगितले. पहिला अर्थ म्हणजे, जातीय विषमतेतून मुक्ती म्हणजेच स्वातंत्र्य होय. याचबरोबर, सामाजिक बंधनापासूनचे स्वातंत्र्य हा पैलू देखील त्यांनी महत्त्वाचा मानला. याशिवाय काही व्यक्तींना समाज जीवनात दुय्यमत्वाला सामोरे जावे लागत होते, या दुय्यमत्वाचा अंत हाही स्वातंत्र्याचा पैलू होय असेही त्यांनी मांडले. उदाहरणार्थ, अपमान आणि अवहेलनेचा अंत, स्त्री-पुरुष विषमतेचा अंत आणि उच्च-नीचतेचा अंत, जातीय वर्चस्वापासून निम्न जातींची मुक्ती असा स्वातंत्र्याचा अर्थ त्यांनी सांगितला.



महात्मा जोतीराव फुले
(१८२७-१८९०)
भारतीय समाजसुधारक
आणि विचारवंत



डॉ.बाबासाहेब आंबेडकर
(१८९१-१९५६)
भारतीय न्यायशास्त्रज्ञ,
अर्थशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक


(iii) महात्मा गांधींनी स्वातंत्र्यासाठी 'स्वराज' ही संकल्पना स्वीकारली. ही संकल्पना त्यांनी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

'हिंद स्वराज' या पुस्तकातून मांडली. स्वराज या संकल्पनेत 'स्व' आणि 'राज' अशा दोन संकल्पनांचा समावेश केला आहे. स्वतःवर राज्य म्हणजे स्वराज. त्यांची 'स्वराज' ही संकल्पना व्यापक होती. त्यांना केवळ ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य अपेक्षित नव्हते, तर पाश्चिमात्य सांस्कृतिक वर्चस्वापासून मुक्ती असाही स्वातंत्र्याचा अर्थ अपेक्षित होता. स्वराज म्हणजे मानवी मूल्ये पायदळी तुडवणाऱ्यांपासून स्वप्रतिष्ठा परत मिळवणे होय. या संकल्पनेत स्वयंशासन, स्वयंशिस्त, मानवी मूल्य या गोष्टींना अधिक महत्त्व होते.



महात्मा गांधी
(१८६९-१९४८)
भारतीय स्वातंत्र्यचळवळीचे नेते

### हक्क

मनुष्याला जगण्यासाठी काही हक्कांची आवश्यकता असते. तसेच, उच्चतम व्यक्तिमत्त्व विकासासाठी काही विशिष्ट हक्क आवश्यक असतात. हॅरॉल्ड लास्की यांच्या मते, 'हक्क म्हणजे, सामाजिक जीवनातील अशी परिस्थिती, की ज्याच्याशिवाय कोणतीही व्यक्ती स्वतःचे जीवन उत्तम प्रकारे जगू शकणार नाही.'

हक्कांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल.

(i) **नैसर्गिक हक्क :** नैसर्गिक हक्क हे मानवी स्वभावाचे आणि विवेकाचे अभिन्न अंग आहे. त्यांचे स्वरूप सार्वत्रिक आहे. जीविताचा हक्क आणि स्वातंत्र्याचा हक्क ही नैसर्गिक हक्कांची उदाहरणे आहेत.

(ii) **नैतिक हक्क :** नैतिक हक्क व्यक्ती आणि समाजाच्या सदसद्विवेकबुद्धीवर आधारलेले असतात. उदाहरणार्थ, शिक्षक आणि वडीलधाऱ्या व्यक्तींना आदर मिळणे हा त्यांचा नैतिक हक्क आहे.

(iii) **वैधानिक हक्क :** वैधानिक हक्क राज्याकडून लोकांना दिले जातात. साधारणतः त्या हक्कांचे कायद्याच्या भाषेत संहितीकरण केलेले असते. या हक्कांचे स्वरूप सार्वत्रिक नसते. वेगवेगळ्या देशांतील वेगवेगळे शासन त्यांच्या जनतेला कोणते हक्क द्यायचे ते ठरवतात. वैधानिक हक्कांची अंमलबजावणी कायद्याद्वारे केली जाते.

वैधानिक हक्कांचे दोन प्रकार आहेत, ते खालीलप्रमाणे-

(अ) *नागरी हक्क* : नागरी हक्क व्यक्ती आणि व्यक्तींची मालमत्ता यांच्याशी संबंधित असतात. नागरी हक्कांमध्ये जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क आणि मालमत्तेचा हक्क यांचा समावेश होतो. राज्यांकडून नागरी हक्कांचे संरक्षण केले जाते.

(ब) *राजकीय हक्क* : राजकीय हक्क व्यक्तींना राजकीय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची संधी देतात. मतदानाचा हक्क, निवडणूक लढवण्याचा हक्क, सार्वजनिक पदग्रहण करण्याचा हक्क, शासनावर टीका आणि विरोध करण्याचा हक्क इत्यादींचा समावेश राजकीय हक्कांमध्ये होतो. सामान्यतः लोकशाही राज्यांत नागरिकांना राजकीय हक्क मिळतात.

**अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहिरनाम्याचा सरनामा :** आम्ही हे स्वयंसिद्ध सत्य उचलून धरतो, की सर्व व्यक्ती जन्मतः समान आहेत. निर्मात्याने त्यांना हिरावून घेता न येणारे हक्क दिले आहेत. ज्यामध्ये जीविताचा हक्क, स्वातंत्र्य आणि सुखप्राप्तीचे हक्क यांचा समावेश होतो.

### मानवी हक्क

प्रत्येक व्यक्तीला मानव म्हणून काही मूलभूत हक्क मिळतात, यांना मानवी हक्क म्हणतात. हे हक्क आपल्याला जन्मतःच मिळतात. ते



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

आपल्यापासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. ते आपल्याला कोणा समाजाने अथवा राज्यकर्त्यांने दिलेले नसतात, म्हणजेच मानवी हक्क आपल्यापासून विलग करता येत नाहीत. मानवी हक्क हे नैसर्गिक असतात. ते न्यायावर आधारित असतात. मानवी हक्क सार्वत्रिक आहेत आणि सामाजिक भेदभाव न करता सर्व मानवांना हे हक्क दिले जातात. माणसातील मानवी गुणांचा, बुद्धिमत्तेचा व कौशल्यांचा विकास होण्यासाठी या हक्कांची गरज असते. तसेच माणसाची व मानवी आयुष्याची प्रतिष्ठा आणि मूल्य यांचे संवर्धन होण्यासाठी हे हक्क असणे आवश्यक मानले आहेत.

मानवी हक्कांमध्ये जीविताचा, उपजीविकेचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांबरोबरच संघटना स्थापनेचे स्वातंत्र्य यांचाही समावेश होतो. हे हक्क काळानुसार विकसित होणारे आहेत म्हणूनच आज आपण केवळ नागरी आणि राजकीय हक्कांचा विचार करत नाही तर माहितीचा अधिकार आणि प्रदूषणमुक्त पर्यावरणाचा अधिकार यांसारख्या हक्कांची चर्चा करतो.

१० डिसेंबर १९४८ रोजी, संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा घोषित केला. या जाहिरनाम्यात नैसर्गिक आणि नागरी हक्कांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय मानवाला आवश्यक असलेले स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव यांचा समावेश केला आहे.

**करून पहा.**

मानवी हक्कांच्या वैश्विक जाहिरनाम्यात समाविष्ट असलेल्या हक्कांची यादी करा.

मानवी हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थिती अनुकूल असणे गरजेचे असते. मानवी हक्कांची अंमलबजावणी करणे अवघड असते. म्हणून जगात अनेक देशांमध्ये मानवी हक्कांची पायमल्ली होताना दिसते. अमेरिकेत अजूनही कृष्णवर्णीय लोक समान दर्जा मिळवण्यासाठी लढत आहेत. भारतात अजूनही जातीच्या आधारावर भेदभाव केला जात असल्याचे दिसून येते. अनेक देशांत स्त्रिया आणि बालकांची स्थिती दयनीय आहे. त्यांना त्यांचे हक्क मानवी हक्क जाहिरनाम्याप्रमाणे मिळत नाहीत.

**करून पहा.**

मानवी हक्क उल्लंघनांच्या उदाहरणांची चर्चा करून उदाहरणे नोंदवा.

### भारतीय संविधानातील हक्क आणि स्वातंत्र्याची संकल्पना

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकार स्पष्ट केले आहेत. हे मूलभूत अधिकार खालीलप्रमाणे –

- समानतेचा हक्क
- स्वातंत्र्याचा हक्क
- शोषणाविरुद्धचा हक्क
- धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क
- सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क
- घटनात्मक उपाययोजना करण्याचा हक्क



**माहीत आहे का तुम्हांला?**

शिक्षणाच्या अधिकाराचा समावेश मूलभूत हक्कांच्या यादीत २००२ साली झालेल्या ८६व्या घटना दुरुस्तीने करण्यात आला. प्रत्यक्षात मात्र २००९ साली मान्यता देऊन एप्रिल २०१० पासून अंमलबजावणी सुरू झाली.



**माहीत आहे का तुम्हांला?**

भारताच्या मूळ संविधानात संपत्तीच्या हक्काचा समावेश होता. १९७८ साली झालेल्या ४४व्या घटना दुरुस्तीने संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांमधून वगळण्यात आला आहे. आता कलम ३०० (अ) नुसार त्याला वैधानिक हक्काचा दर्जा देण्यात आला आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

भारतीय संविधानात सकारात्मक आणि नकारात्मक या दोन्हीही स्वातंत्र्यांचा समन्वय साधला गेला आहे. संविधानाच्या १९व्या कलमात विविध स्वातंत्र्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. याचबरोबर २१व्या कलमात स्वातंत्र्यावरील मर्यादा स्पष्ट करण्यात आल्या आहेत. २१व्या कलमानुसार कायद्याने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीखेरीज कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेतले जाणार नाही असे स्पष्ट केले आहे. या कलमाने व्यक्तिस्वातंत्र्याला मानवी हक्कांचा दर्जा प्राप्त करून दिला आहे, कारण या कलमानुसार ते स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी कोणताही अपवाद किंवा पात्रता सांगण्यात आलेली नाही. त्यामुळे या कलमानुसार भारतीयांसोबतच परकीय नागरिकांनासुद्धा जीविताचे स्वातंत्र्य मिळू शकते.

भारतीय न्यायमंडळाने विविध खटल्यांचे निर्णय देताना हक्क आणि स्वातंत्र्य या संकल्पनेचा अन्वयार्थ लावला आहे. स्वातंत्र्य प्रत्यक्ष व्यवहारात उतरवताना न्यायव्यवस्थेने लावलेला अन्वयार्थ जास्त महत्त्वाचा ठरतो. उदाहरणार्थ :

- १९६३ साली 'खडकसिंग विरुद्ध उत्तरप्रदेश सरकार' खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले, की व्यक्तीला भारतभर संचार स्वातंत्र्य राहील.
- १९८१ साली 'फ्रान्सिस कोरॉली मुलिन विरोधी दिल्ली केंद्रशासित प्रदेश' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्वातंत्र्याचा अधिक व्यापक अर्थ स्पष्ट केला आहे. जीविताच्या अधिकाराचा अर्थ त्यांनी प्रतिष्ठित जीवनाच्या अधिकाराशी जोडला. पोषक आहार, वस्त्र, निवारा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संचार स्वातंत्र्य इत्यादींचा जीवनाच्या मूलभूत अधिकारांत समावेश करण्यात आला.
- १९८४ साली 'बंधुवा मुक्ती मोर्चा विरुद्ध भारत सरकार' खटल्याच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या संदर्भात २१व्या कलमाचा अर्थ स्पष्ट केला. न्यायालयाने प्रतिष्ठेने जगण्याच्या अधिकारात श्रमिकांच्या आरोग्याची देखभाल, बालकांची शारीरिक छळापासून मुक्ती, विकासाची संधी व सुविधा, उत्तम शैक्षणिक सुविधा, मातृत्वाची देखभाल आणि कामासाठी पोषक वातावरण निर्मिती या सर्वांचा समावेश स्वातंत्र्याच्या संकल्पनेत केला.
- १९८९ मध्ये 'रामशरण विरोधी भारत सरकार' या खटल्याचा निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने परत एकदा २१व्या कलमाची व्याप्ती वाढवली. मनुष्याच्या जीवनाला अर्थ प्राप्त करून देणाऱ्या परंपरा, संस्कृती, वारसा आणि त्यांचे पूर्ण संरक्षण या गोष्टी त्यांनी स्वातंत्र्याच्या कक्षेत समाविष्ट केल्या.
- २०१७ साली, 'पुट्टास्वामी विरुद्ध भारत सरकार' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने खासगीपणाचा हक्क (Right to Privacy) हा व्यक्तीचा मूलभूत हक्क असल्याचे नमूद केले.
- यानंतरच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त पाणी आणि हवा मिळण्याच्या अधिकाराला स्वातंत्र्याच्या संकल्पनेत समाविष्ट करावे असे स्पष्ट केले.

**चर्चा करा.**

आपण भारताच्या संदर्भात जेव्हा हक्कांचा विचार करतो तेव्हा खालीलपैकी कोणत्या हक्कांवर आपण जास्त महत्त्व देऊ? राजकीय आणि नागरी हक्क किंवा अन्न, निवारा, वस्त्र, आरोग्य आणि शिक्षण हे हक्क.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**चर्चा करा.**

खालील वाक्ये वाचा.

- मी माझ्या घराची रोज स्वच्छता करून कचरा रस्त्यावर टाकतो.
- मी परदेशी प्रवाशांचे त्यांना परवानगी विचारल्याशिवाय फोटो काढतो.
- काही प्रेक्षक चित्रपटगृहात धुम्रपान करतात.

वरील प्रत्येक वाक्यावर स्वातंत्र्याच्या हक्काच्या संदर्भात चर्चा करा.

**करून पहा :** भारतीयांचे हक्क आणि स्वातंत्र्य यांवर सर्वोच्च न्यायालयात झालेले वेगवेगळे खटले शोधा. त्यावर वर्गात चर्चा करा.

या प्रकरणात आपण स्वातंत्र्य आणि हक्क यांचा अर्थ बघितला तसेच भारताच्या संदर्भात त्यांचा अर्थ समजून घेतला. पुढच्या प्रकरणात आपण समता आणि न्याय या दोन संकल्पना अभ्यासणार आहोत.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. 'ऑन लिबर्टी' हा ग्रंथ ......... यांनी लिहिला.
(रॉबर्ट नॉझिक, थॉमस हॉब्ज, जे.एस.मिल, इसाया बर्लिन)

२. 'स्वराज' ही संकल्पना .......... यांनी मांडली आहे.
(महात्मा गांधी, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, डॉ.राजेंद्र प्रसाद)

**(ब) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**

राज्याने स्वातंत्र्यामध्ये अडथळे आणू नयेत असे तत्व जेरेमी बेंथॅम यांनी मांडले. कारण-


(अ) राज्य आपल्याला स्वातंत्र्य देत नाही.
(ब) व्यक्तीला आपले हित चांगले समजते.
(क) स्वातंत्र्य ही अडथळा नसल्याची स्थिती असते.

**(क) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. ८६ व्या घटना दुरुस्तीमार्फत भारताच्या संविधानात समाविष्ट करण्यात आलेला मूलभूत हक्क-

२. व्यक्ती आणि समाजाच्या सदसद्‌विवेकबुद्‌धीवर आधारलेले हक्क-

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधान चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

वैधानिक हक्क हे सार्वत्रिक नसतात.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. सकारात्मक स्वातंत्र्य आणि नकारात्मक स्वातंत्र्य.
२. नैसर्गिक हक्क आणि वैधानिक हक्क.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. महात्मा गांधींचा स्वातंत्र्याचा विचार स्पष्ट करा.
२. मानवी हक्क या संकल्पनेची चर्चा करा.
३. इसाया बर्लिन यांचा स्वातंत्र्याचा विचार विशद करा.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

हक्कांची संकल्पना विशद करा.
(अ) हक्कांचा अर्थ आणि वर्गीकरण (ब) वैधानिक हक्क (क) मानवी हक्क

**उपक्रम**

भारतातील नागरी हक्कांची यादी करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ३. समता व न्याय

या प्रकरणात आपण समता आणि न्याय या दोन संकल्पना समजून घेणार आहोत. कायद्यासमोर समानता, राजकीय समता, समान संधीचे तत्त्व हे समतेचे विविध अर्थ समजून घेणार आहोत. तसेच या प्रकरणात समतेचे प्रकार स्पष्ट केले आहेत. याशिवाय वैधानिक न्याय, नैसर्गिक न्याय व सामाजिक न्याय या न्यायाच्या संकल्पना देखील समजून घेणार आहोत.

**समता**

मानवी समाजाचे समता हे महत्वाचे मूल्य आहे. समता म्हणजे सारखेपणा नव्हे, परंतु सगळी माणसं समान आहेत, असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा सर्व माणसांना समान वागणूक मिळावी असा अर्थ अभिप्रेत असतो. प्राचीन काळात ॲरिस्टॉटलच्या विचारात समतेच्या संकल्पनेचा विचार मर्यादित अर्थाने आला आहे, मात्र आधुनिक काळात समतेचा अर्थ अधिक व्यापकपणे घेतला जातो. सुख-दुःख कळण्याची क्षमता, सहिष्णुतेची वागणूक, आत्मसन्मानाची इच्छा अशा संदर्भात समतेचा विचार मांडला जातो. म्हणजेच समतेला नैतिक आणि सामूहिक अशा बाजू आहेत. याशिवाय आधुनिक काळात समतेचा विचार एक राजकीय ध्येय म्हणून देखील केला जाऊ लागला.

जगात असंख्य प्रकारच्या असमानता आहेत. काही असमानता नैसर्गिक तर काही मानवनिर्मित आहेत. नैसर्गिक असमानता म्हणजे वर्ण, उंची, बुद्धिमत्ता, शारीरिक बळ, आनुवंशिकता इत्यादींमधील फरक होय. मानवनिर्मित असमानता जात, पैसा, धर्म इत्यादींच्या आधारावर निर्माण केलेल्या असतात. प्रत्येकाची योग्यता, क्षमता आणि दृष्टिकोन वेगळा असतो हे सर्वश्रुत आहे, मात्र त्यांना त्यांच्या कौशल्य आणि बुद्धिमत्तेनुसार विकासाची समान संधी दिली पाहिजे. समाजातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्थांमध्ये समता असणे आवश्यक आहे. न्याय, स्वातंत्र्य या संकल्पना समतेच्या कसोटीवर मांडल्या जातात. म्हणून समतेची संकल्पना बुद्धिप्रामाण्यवादी आहे.

**समतेचा इतिहास :** राजकीय तत्वज्ञानाच्या इतिहासात समता ही संकल्पना ग्रीकांच्या काळापासून अभ्यासली जाते. जुलूम, अनियंत्रित राजेशाही, असमान सामाजिक परिस्थिती अशा त्या वेळच्या संघर्षातून समतेच्या संकल्पनेचा विकास झाला. ॲरिस्टॉटल, हॉब्ज, रूसो, कार्ल मार्क्स, टॉकव्हिल या विचारवंतांनी समता या संकल्पनेचा विकास केला.

ॲरिस्टॉटल यांनी प्राचीन ग्रीस नगरराज्य पद्धतीमध्ये समतेची संकल्पना मांडली होती. ॲरिस्टॉटल यांची समतेची संकल्पना नगरराज्यांमधील नागरिकांपुरती मर्यादित होती. त्यांच्या समतेच्या संकल्पनेचा विकास शासक आणि शासित यांच्या संदर्भात झाला. त्यांनी बौद्धिक आणि प्रशासकीय क्षमतांमधील विषमता गृहीत धरून शासक आणि शासित हे नैसर्गिकरीत्या असमान आहेत असे प्रतिपादन केले. नागरिक या संकल्पनेतून अथेन्समधील परकीय, गुलाम आणि स्त्रिया यांना वगळले होते. त्यांनी राज्यघटनेमार्फत सामाजिक विषमता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी विशेष दर्जाच्या संकल्पनेचे निर्मूलन करून कायद्यापुढील समानता हा विचार मांडला. ॲरिस्टॉटल यांनी त्यांच्या 'द पॉलिटिक्स' या ग्रंथात न्याय आणि समता यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट केले.

थॉमस हॉब्ज यांनी 'लेव्हिएअथन' या ग्रंथात नैसर्गिक समतेचा विचार मांडला. शारीरिक आणि बौद्धिक विषमता असली तरी हॉब्ज यांच्या मते, व्यक्तींमध्ये समानता असावी. प्रत्येक व्यक्तीस मनुष्यप्राणी म्हणून काही हक्क असणे उचित आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शासनसंस्थेला हे हक्क व्यक्तीकडून काढून घेता येत नाहीत. हा नैसर्गिक समतेचा विचार हॉब्ज यांनी मांडला.

रूसो यांनी कृत्रिम आणि नैसर्गिक विषमतांचे विश्लेषण केले. समूहजीवनामध्ये सुखाची कल्पना बळावली त्यामुळे मनुष्य इतरांवर वर्चस्व निर्माण करू लागला. मनुष्याच्या स्वार्थी प्रवृत्तीतून खासगी मालमत्तेची संकल्पना उदयाला आली. तसेच समाजात श्रमविभाजन सुरू झाले. खासगी मालमत्ता आणि श्रमविभाजन यांमुळे गरिबांचे शोषण सुरू झाले. या प्रक्रियेतून श्रीमंत वर्गाने कृत्रिम विषमता निर्माण केली. तसेच रूसो यांच्या मते शरीररचना आणि क्षमता यांमुळे व्यक्ती-व्यक्तींमध्ये विषमता निर्माण होते. रूसो यांनी नैसर्गिक कायद्यामार्फत समता निर्माण करण्याचा विचार मांडला.

कार्ल मार्क्स यांनी उदारमतवादी समतेची संकल्पना नाकारून समाजवादी समतेची संकल्पना मांडून वर्गविहिन समाज निर्माण करणे म्हणजे समता निर्माण करणे होय असा विचार मांडला. कामगारांची शोषणातून मुक्ती, उत्पादन साधनांचे समान वितरण या संकल्पनांना त्यांनी महत्त्व दिले. यामुळे प्रस्थापित होणारी समता उदारमतवादी समतेपेक्षा वेगळी असेल असा विचार कार्ल मार्क्स यांनी मांडला.

टॉकव्हिल यांनी अमेरिकन राज्यक्रांतीच्या अभ्यासावर आधारित समतेची संकल्पना मांडली. सरंजामशाही व्यवस्था जाऊन लोकशाही व्यवस्था येणे या प्रक्रियेत सामाजिक समतेची संकल्पना विकसित होते असा विचार त्यांनी मांडला. परावलंबीत्व आणि गुलामगिरीतून मुक्ती मिळवण्यासाठी टॉकव्हिल समतेचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते, लोकशाहीत लोक स्वातंत्र्यापेक्षा समतेला अधिक महत्त्व देतात; याचा अर्थ असा नव्हे की, स्वातंत्र्याची गळचेपी करून समतेचा पुरस्कार करणे योग्य आहे.

**समतेचे महत्त्व :** विषमता कमी करणे हे समतेचे मुख्य उद्दिष्ट असते. आपल्याला समतेची गरज पुढील कारणांसाठी आहे.

(i) न्याय्य स्थिती निर्माण होण्यासाठी समता आवश्यक आहे. समाजातील मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी संसाधनांचे न्याय्य वितरण हे तत्त्व स्वीकारण्याची गरज आहे.

(ii) जेव्हा समाज, सामाजिक आणि भौतिकदृष्ट्या विषम असतो तेव्हा व्यक्तीला आत्मसन्मान मिळत नाही म्हणून व्यक्तीच्या आत्मसन्मानासाठी समतेचे तत्त्व आवश्यक आहे.

(iii) समाजात परस्परांप्रति सन्मान राखण्यासाठी समतेची गरज असते. व्यक्तीला विकासाची समान संधी मिळण्यासाठी परस्परांचा आदर करणे महत्त्वाचे आहे.

(iv) सामाजिक समतेमुळे बंधुभाव निर्माण होतो. स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही संकल्पना बंधुभावामुळे प्रत्यक्ष अस्तित्वात येतात.

**समतेचे महत्त्वाचे पैलू :** समतेचे पैलू खालीलप्रमाणे आहेत.

(i) **कायद्यापुढील समता आणि कायद्याचे समान संरक्षण :** सर्व नागरिकांना कायदा समान मानतो व त्यामुळे तो सर्वांना एकाच प्रकारे लागू करण्यात येतो. श्रीमंत व गरीब किंवा समाजातील बलिष्ठ व कमकुवत गटांतील व्यक्तींना हे तत्त्व प्रत्यक्षात आणण्याची समान ताकद असते, असे मानता येणार नाही. न्यायालयात श्रीमंत-गरीब यांबद्दल समान वागणुकीचा एकच मापदंड असावा असा दावा केला जातो. न्यायदानाच्या प्रक्रियेत काळा-गोरा, गरीब-श्रीमंत असा भेदभाव होता कामा नये म्हणून कायद्यापुढे सर्वांना समानता असावी आणि कायद्याचे समान संरक्षण असावे असा दावा केला जातो.

(ii) **समान संधीचे तत्त्व :** सर्व नागरिकांना त्यांच्या अंगभूत गुणांचा विकास करण्यास व पात्रता संपादन करण्यास समान संधी असावी, परंतु



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शैक्षणिक आणि सामाजिक कल्याणाची व्यवस्था असली तरच मागास गटातील व्यक्तींना प्रगत गटातील व्यक्तींशी खऱ्या अर्थाने समान पातळीवर स्पर्धा करता येते. म्हणून समान संधीचे तत्त्व हा समतेचा आधार मानला जातो.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

समता संकल्पना कशी असावी हा राजकीय तत्त्वज्ञानातील मध्यवर्ती विषय आहे. या संदर्भात समतेचे तीन मापदंड आहेत.

- कल्याणकारी समता : व्यक्तीला किती साधने मिळाली यापेक्षा व्यक्तीच्या गरजा पूर्ण होणे अभिप्रेत आहे.
- साधनांची समता : साधनांची समता म्हणजे साधनांचे समाजात न्याय्य पद्धतीने वितरण व्हावे.
- कार्यक्षमतांची समता : लोकांकडे किती साधने आहेत, यापेक्षा लोक त्या साधनांचा कसा उपयोग करतात हे येथे महत्त्वाचे आहे.

**करून पहा.**

अमर्त्य सेन यांनी समतेबाबत मांडलेला दृष्टिकोन वाचून चर्चा करा.

**समतेचे प्रकार :** समता या संकल्पनेचे पाच प्रकार आहेत.

(i) **नैसर्गिक समता :** नैसर्गिक समतेनुसार निसर्गतः सर्व माणसे समान आहेत. नैसर्गिक समतेच्या तत्त्वाचा अर्थ निसर्गाने सर्व माणसांना सारखीच क्षमता व गुणवत्ता बहाल केली आहे असा नव्हे, मात्र उपजत कमी-जास्त क्षमतांच्या आधारे भेदभाव केला जाऊ नये व सर्वांना अधिकाधिक आत्मविकासाची संधी समाजात उपलब्ध व्हावी हे अभिप्रेत आहे.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांना नैसर्गिक समतेची संकल्पना अमान्य होती, मात्र पाश्चिमात्य ख्रिश्चन विचारवंतांनी सर्व माणसे एकाच ईश्वराची लेकरे आहेत असे मानले. आधुनिक काळात, हॉब्ज, लॉक, रूसो या विचारवंतांनी राज्यपूर्व (State of Nature) अवस्थेतील माणसांमधील नैसर्गिक समतेची संकल्पना मांडली.

(ii) **नागरी समता :** नागरी हक्क सर्व लोकांसाठी समान असावेत. सर्व लोक कायद्यापुढे समान आहेत. वंश, वर्ण, जात, धर्म, लिंग या आधारे लोकांमध्ये भेदभाव केला जाऊ नये. सर्वांना समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा, सर्वांना कायद्याचे समान संरक्षण, विशिष्ट समाज घटकाला झुकते माप देणारा कायदा न करणे म्हणजे नागरी समता होय. यामध्ये स्त्रिया, मुले, मागास जाती-जमाती, दिव्यांग व्यक्ती यांना विशेष सवलती देणारा कायदा केला गेल्यास नागरी समतेच्या तत्त्वाला बाधा येत नाही; कारण या समाजघटकांची स्पर्धा शक्ती कमी असते.

(iii) **राजकीय समता :** प्रत्येक नागरिकाला शासनव्यवस्थेत सहभागी होण्याची समान संधी मिळणे म्हणजे राजकीय समता होय. केवळ लोकशाहीतच अशी राजकीय समता अनुभवता येते, मात्र राजकीय समता समाजात रुजवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. या समतेच्या अभावी समाजात असंतोष निर्माण होऊ शकतो. प्रौढ मताधिकार व प्रतिनिधित्वासंबंधीचे कायदे राजकीय समतेचे आधार आहेत.

(iv) **आर्थिक समता :** आर्थिक समता हा राजकीय समतेचा पाया असतो. आर्थिक विषमतेमुळे समाज दुभंगला जातो. आर्थिक समता म्हणजे स्वतःच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना समान संधी असणे, लोकांचे आर्थिक शोषण न होणे, संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रतिबंध करणे आणि सर्वांना अत्यावश्यक वस्तू व सेवांची उपलब्धता असणे होय. हॅरॉल्ड लास्की यांच्या मते, जीवनाच्या किमान अत्यावश्यक वस्तूंबाबत



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

आर्थिक समता असावी. अर्नेस्ट बार्कर यांच्या मते, राज्यसंस्था सर्वांना मालमत्तेचा समान हक्क देते म्हणजेच तिने सर्वांच्या वाट्याला समान मालमत्ता उपलब्ध करून द्यावी असे नव्हे, तर सर्वांना त्यांच्या पात्रतेनुसार मालमत्ता जमवण्याचा समान हक्क असणे होय.

**चर्चा करा.**

वेठबिगारी पद्धत विरोधी कायदा, १९७६ या कायद्याविषयी तपशील गोळा करा व वर्गात त्याबाबत परिसंवाद आयोजित करा.

(v) **सामाजिक समता :** जात, धर्म, वर्ण, व्यवसाय, लिंग इत्यादी आधारांवर लोकांमध्ये भेदभाव न करणे म्हणजे सामाजिक समता होय. प्रत्येक समाजघटकाकडून समाजाच्या हितासाठी श्रमसेवा अपेक्षित असते. समाजात श्रमाची प्रतिष्ठा कमी-जास्त नसते हे आपण मान्य केले पाहिजे. असे असूनही आजही भारतात जाती, धर्म, वंश, लिंग इत्यादी आधारावर भेदभाव केलेला दिसून येतो. तसेच दक्षिण आफ्रिकेत आणि अमेरिकेत वांशिक भेदभाव दिसून येतो.

भारतात महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेवर विशेष भर दिलेला दिसून येतो. दुर्बल, मागासलेल्या जातींतील समाज बांधवांची अस्मिता जागी करून त्यांना जीवनात प्रतिष्ठा मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सर्व समाजघटकांना समान सामाजिक दर्जा, समान सामाजिक हक्क उपलब्ध करून देणे हे राज्यसंस्थेचे कर्तव्य आहे. कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित केली जाते. उदाहरणार्थ, भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले.

### भारताच्या संदर्भात समता

भारतासारख्या वैविध्यपूर्ण समाजात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. जातिव्यवस्था सामाजिक समतेपुढील महत्त्वाचा अडथळा ठरली आहे. सामाजिक व आर्थिक समतेसाठी एकाच वेळी प्रयत्न करावे लागतात. त्याचप्रमाणे व्यक्तीचे स्वातंत्र्य प्रत्यक्षात साकारण्यासाठी समतेची स्थापना होणे आवश्यक असते.


भारतीय समाज हा वर्ण आणि जाती यांच्या उतरंडीमध्ये विभागलेला आहे. तसेच भारतात स्त्री-पुरुष असमानता आढळते. भारतातील पुरुषसत्ताक पद्धती ही स्त्री-पुरुषांमध्ये सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता निर्माण करते. याबरोबर भारतात आर्थिक साधनसंपत्तीचे वितरण देखील विषम झालेले आहे. त्यामुळे भारतात महात्मा फुले, ताराबाई शिंदे, न्या.रानडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी साधनसंपत्तीचे समान आणि न्याय्य वितरण झाले पाहिजे असा आग्रह धरला.

**भारतीय विचारवंतांच्या मते समतेचे काही पैलू**



**महात्मा जोतीराव फुले**
(१८२७-१८९०)
भारतीय समाजसुधारक आणि विचारवंत. जातीय भेदभाव आणि स्त्री-पुरुष भेदभाव दूर करण्यावर भर.

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे**
(१८४२-१९०१)
अभ्यासक व समाजसुधारक. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक सदस्य आणि समाजसुधारक. बालविवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे हक्क यासंबंधी कार्य.





Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



**ताराबाई शिंदे**
(१८५०-१९१०)
स्त्रीवादी सुधारक.
जातिव्यवस्थेच्या बंधनातून मुक्तता.



**महात्मा गांधी**
(१८६९-१९४८) : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि स्त्री-पुरुष समानतेवर भर.



**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
(१८९१-१९५६)
भारतीय कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आणि समाजसुधारक.

सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विषमतांच्या निर्मूलनावर भर आणि जाती अंताचा विचार.



**डॉ. राममनोहर लोहिया**
(१९१०-१९६७)
समाजवादी राजकीय नेते. इंग्रजी भाषा, जात आणि पुरुष यांच्या वर्चस्वाच्या निर्मूलनावर भर.

**डॉ. अमर्त्य सेन**
(१९३३-) अर्थतज्ज्ञ आणि तत्वज्ञ.
व्यक्तीच्या कार्यक्षमतांचा विकास घडवण्यावर भर.



**चर्चा करा.**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुला-मुलींच्या शिक्षणासाठी तुम्ही काय मदत कराल?

## न्याय

मानवासाठी सामाजिक व राजकीय जीवनात न्याय ही संकल्पना महत्वाची आहे. राज्यसंस्था एक सामाजिक-राजकीय संस्था आहे. न्याय ही संकल्पना प्राचीन आहे. सॉक्रेटिस यांनी न्याय हा राजकीय सद्‌गुण मानला. त्यांच्या मते, चांगला समाज व न्याय्य समाज या समानार्थी संकल्पना आहेत. प्लेटो यांच्या 'द रिपब्लिक' या ग्रंथामध्ये न्यायाची संकल्पना मांडली आहे. त्यांनी मनुष्याच्या गुणांपैकी न्याय हा एक गुण मानला. ॲरिस्टॉटल यांनी समाजात समता, प्रमाणबद्‌धता आणि संतुलन निर्माण केल्यास न्याय निर्माण होईल अशी व्याख्या केली. या न्यायाच्या व्याख्या ग्रीक काळातील आहेत. आधुनिक काळात न्यायाच्या व्याख्या नैसर्गिक न्याय, वैधानिक न्याय, सामाजिक न्याय आणि लिंगभावात्मक न्याय या पद्‌धतीने विकसित झाल्या आहेत.

रॉल्स यांच्या मते, कोणत्याही सामाजिक संस्थेचा 'न्याय' हा पहिला सद्‌गुण असला पाहिजे. साधनांची विपुलता नसल्यामुळे न्यायाची संकल्पना व्यक्तीच्या कृती आणि गरजांमधून निर्माण होते. साधनांचे वाटप करताना कोणाला काय व केव्हा मिळते हा न्यायातील महत्वाचा मुद्दा आहे.

### न्यायाचे प्रकार

(i) **नैसर्गिक न्याय :** मनुष्याच्या अस्तित्वाशी नैसर्गिक न्यायाची संकल्पना जोडली गेली आहे. मनुष्य निसर्गाचा घटक आहे म्हणून त्याला योग्य-अयोग्य, न्याय-अन्याय या संकल्पना समजू शकतात. नैसर्गिक न्यायाच्या तत्वावर करण्यात आलेला न्याय हे सर्व व्यवस्थांचे अंतिम उद्‌दिष्ट आहे असे जगभरात मानले जाते. प्राचीन ग्रीक आणि रोमन



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

तत्ववेत्यांनी नैसर्गिक न्यायाच्या संकल्पनेचा पुरस्कार केला. कोणत्या गोष्टी न्याय्य आहेत व कोणत्या अन्याय्य हे कोणत्याही मनुष्यास सहजपणे समजू शकते म्हणून मानवनिर्मित कायद्याची गरज भासत नाही, अशी नैसर्गिक न्यायाची संकल्पना आहे.

(ii) **वैधानिक न्याय :** न्यायाच्या अमूर्त संकल्पनेची व्यावहारिक पातळीवर कायद्याच्या रूपाने अंमलबजावणी होते तेव्हा त्याला वैधानिक न्याय असे म्हटले जाते. जॉन ऑस्टिन यांनी कायदा हे न्यायाचे व दुष्कृत्य दडपून टाकण्याचे साधन आहे, असा विचार मांडला. न्यायाच्या तत्वाखेरीज कायदा केवळ दडपणुकीचे साधन बनतो, म्हणून कायदा ही संकल्पना न्यायावर अवलंबून आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

वैधानिक न्यायात पुढील गोष्टींचा समावेश होतो.

(i) न्यायदान करणारी यंत्रणा निर्भीड, नि:पक्षपाती आणि स्वायत्त असणे.

(ii) न्यायदानाची प्रकिया तणावमुक्त वातावरणात पार पडणे.


(iii) न्यायदानासाठी निश्चित नियम आवश्यक असणे.

(iv) आरोपीला त्याच्यावर ठेवल्या गेलेल्या आरोपांची संपूर्ण माहिती असणे.

(v) आरोपांबाबत स्वत:ची बाजू मांडण्याचे स्वातंत्र्य आरोपीला असणे.

(iii) **सामाजिक न्याय :** सामाजिक न्याय म्हणजे वस्तू व सेवा यांचे रास्त व समतेच्या तत्वावर आधारित वाटप करणे. तसेच समाजातील कमकुवत गटांना त्यातील योग्य वाटा मिळणे आवश्यक असते. म्हणूनच सामाजिक न्यायाला वितरणात्मक न्याय असेही म्हणतात.

प्रक्रियात्मक न्याय आणि सामाजिक न्याय हे न्यायाचे दोन दृष्टिकोन आहेत. प्रक्रियात्मक न्यायाच्या संकल्पनेत कायदेविषयक प्रक्रियांचा समावेश होतो. कायद्याचा योग्य अर्थ लावून खटला चालवण्याची रास्त पद्धत अवलंबून एखाद्या प्रकारचा न्यायनिवाडा करणे व कायद्यासमोर सर्व समान आहेत असे मानणे हा प्रक्रियात्मक न्यायाचा अर्थ होतो. न्याय हा केवळ व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाशी संबंधित नसून समाजाशी संबंधित आहे. रॉबर्ट नॉझिक यांनी प्रक्रियात्मक न्यायाचे विवेचन केले तर कार्ल मार्क्स, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि जॉन रॉल्स यांनी सामाजिक न्यायाचे विवेचन केले.



कार्ल मार्क्स (१८१८-१८८३)
जर्मन तत्त्वज्ञ

मार्क्सवादी विचारानुसार राज्यसंस्था ही कामगारवर्गाचे शोषण करण्याचे साधन असते. हे साधन भांडवलदारांच्या हाती असते. राज्यच कायदे करून राबवत असल्यामुळे स्वाभाविकच ते कायदे भांडवलदारांचे हित साधणारे असतात. मार्क्स यांच्या मते, साधनसंपत्तीच्या न्याय्य वितरणाची खात्री असावी यासाठी भांडवलशाही व्यवस्थेचे समाजवादी व्यवस्थेत रूपांतरण होणे आवश्यक मानले गेले. समाजवादी व्यवस्था 'आहेरे' वर्गाच्या मालमत्तेच्या हक्कापेक्षा 'नाहीरे' वर्गाच्या समतेच्या व न्यायाच्या हक्कांना प्राधान्य देते. म्हणून समाजवादी कार्यक्रम राबवणे म्हणजे न्याय अशी भूमिका मार्क्स यांची होती. मार्क्सवादी दृष्टिकोनातून न्यायालय समाजवादाशी बांधिलकी मानणारे असावे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**


आहेरे वर्ग : आहेरे वर्ग म्हणजे असा वर्ग ज्याच्याकडे उत्पादन साधनांची मालकी आहे.

नाहीरे वर्ग : नाहीरे वर्ग म्हणजे असा वर्ग जो मुख्यत्वेकरून कामगार आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



जॉन रॉल्स
(१९२१-२००२)
अमेरिकन तत्त्वज्ञ

जॉन रॉल्स हे सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते, त्यांनी वितरणात्मक न्यायाचा सिद्धान्त मांडला. व्यक्तीला अनेक इच्छा असतात. त्यांपैकी कोणत्या इच्छा न्याय्य आहेत हे सांगणारा सामाजिक न्यायाचा सिद्धान्त रॉल्स मांडतात. 'अ थिअरी ऑफ जस्टिस' या पुस्तकात रॉल्स म्हणतात, की स्वातंत्र्य आणि समता यांना परस्परांपासून विलग करता येत नाही. न्याय खऱ्या अर्थाने न्याय्य होण्यासाठी, सर्वांना कायद्यांतर्गत समान हक्क मिळणे आवश्यक आहे, असे ते प्रतिपादन करतात. रॉल्स यांनी सामाजिक न्यायाची दोन तत्त्वे सांगितली आहेत : (अ) मूलभूत हक्क व कर्तव्ये समान असावीत. सर्वांत तळाशी असलेल्यांना फायदा होणार असलेली व्यवस्थाच न्याय्य मानली जावी. (ब) सर्व सार्वजनिक पदे सर्वांसाठी खुली असावीत. तसेच त्यांना प्राप्त करण्यासाठी सर्वांना समान संधी असावी हा रॉल्स यांचा वाजवी न्यायाचा सिद्धान्त आहे.

### न्यायाची भारतीय संकल्पना

भारतात विविध प्रकारच्या विषमता आहेत. उदाहरणार्थ, जातिव्यवस्था, पुरुषसत्ताक व्यवस्था इत्यादी. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील दोन्ही व्यवस्थांमधील संरचना आणि मूल्यव्यवस्थेमध्ये बदल म्हणजे न्याय अशी व्याख्या केली. तसेच त्यांनी सामाजिक विषमतांच्या निर्मूलनाबरोबर साधनसंपत्तीच्या वितरणाशीही सामाजिक न्यायाचा सिद्धान्त जोडला. भारतीय संविधानात न्याय प्रस्थापित करण्याचे प्रक्रियात्मक न्याय आणि सामाजिक न्याय असे दोन मार्ग आहेत. हे शैक्षणिक, आर्थिक विकास आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीयांचे आर्थिक सक्षमीकरण यांद्वारे साध्य केले जाते. याची अंमलबजावणी खालील बाबींद्वारे केली जाते.

(अ) आरक्षणाचे धोरण

(ब) दुर्बल वर्गासाठी शिष्यवृत्ती, अनुदान, कर्ज, आरोग्य सेवा इत्यादी उपलब्ध करून देणे.

(क) मागासवर्गीयांचे शोषण करणाऱ्या भेदभावपूर्ण सामाजिक व आर्थिक प्रथांचे निर्मूलन करणे.

भारतीय संविधानाच्या स्वीकृतीच्या वेळी झालेल्या चर्चेला उत्तर देताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेल्या विचारांची नोंद घेणे महत्त्वाचे ठरेल. ते म्हणाले, *'जर आपल्याला लोकशाही केवळ नावापुरती नाही तर खऱ्या अर्थाने सांभाळायची असेल तर आपण काय करण्याची गरज आहे? आपली सामाजिक व आर्थिक ध्येय साध्य करण्यासाठी आपण प्रथमतः संविधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे.'* ते पुढे असेही म्हणतात, *'आपण आपल्या राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाहीदेखील बनवले पाहिजे. सामाजिक लोकशाहीचा पाया असल्याशिवाय राजकीय लोकशाही उभी राहू शकत नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय? स्वातंत्र्य, समता व बंधुता जगण्याची तत्त्वे म्हणून असणे गरजेचे आहे.'*

थोडक्यात न्याय आणि समता ही मूल्ये राज्यसंस्थेचा आधार आहेत.

**चर्चा करा.**

खालीलपैकी कोणत्या घटना समता व न्याय या तत्त्वाला छेद देणाऱ्या आहेत ते स्पष्ट करा.

(i) बस आणि रेल्वेमधील महिलांच्या जागांचे आरक्षण.
(ii) बस आणि रेल्वेमधील दिव्यांग व्यक्तींच्या जागांचे आरक्षण.
(iii) उत्पन्नावरील कर भरणे.
(iv) स्वस्त धान्य दुकानांमधील सवलती.

**चर्चा करा.**

घर सोडून पळून गेलेल्या मुलांच्या समस्यांवर चर्चा करा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**करून पहा.**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या संकेतस्थळावर जाऊन दुर्बल वर्गांसाठी असलेल्या विविध धोरणांचा अभ्यास करा.



## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. राजकीय समतेचा ....... हा पाया असतो.
(लोकशाही, अधिकारशाही, लष्करी राजवट, राजेशाही)

२. जॉन रॉल्स हे ....... न्यायाचे पुरस्कर्ते होते.
(वितरणात्मक, राजकीय, आर्थिक, लिंगभावात्मक)

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासाकरिता प्रत्येकाला संधी मिळणे आवश्यक आहे असे मानणारे समतेचे तत्त्व –

२. प्रत्येक नागरिकास राज्यकारभारात सहभागी होण्याचा अधिकार आहे असा समतेचा प्रकार–

३. आर्थिक शोषणाचा अभाव –

**(क) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.**


१. भारतात अस्पृश्यता निवारणासाठी कायदे करण्यात आले. कारण.......

(अ) अस्पृश्यता ही राजकीय संकल्पना आहे.

(ब) अस्पृश्यता ही कायदेशीर संकल्पना आहे.

(क) कायद्याच्या माध्यमातून सामाजिक विषमता नियंत्रित केली जाते.

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. लोकशाहीमध्ये समता नाकारली जाते.

२. समानता हे राजकीय ध्येय आहे.

३. सामाजिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीचा पाया आहे.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. समता व न्याय

२. वैधानिक न्याय व सामाजिक न्याय

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

सामाजिक समतेमध्ये जातिभेद अडथळा ठरतो.

**प्र.६ पुढील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

न्यायाची भारतीय संकल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम**

महिलांना सुरक्षितपणे कामासाठी जाता येईल, यासाठी उपाय सुचवा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# विभाग २ : तुलनात्मक शासन आणि राजकारण

## प्रस्तावना

शासनाच्या तीन शाखा

| देश |  **कायदेमंडळ** कायदे तयार करते. |  **कार्यकारी मंडळ** कायद्याची अंमलबजावणी करते. (राजकीय कार्यकारी मंडळ आणि नोकरशाही) |  **न्यायमंडळ** कायद्याचा अर्थ लावते व न्यायदान करणे. |
|---|---|---|---|
| **भारत**  | **संसद**<br>लोकसभा<br>राज्यसभा | **राजकीय कार्यकारी मंडळ**<br>राष्ट्रपती (राज्याचा प्रमुख)<br>प्रधानमंत्री (शासनाचा प्रमुख) आणि मंत्रिमंडळ<br>**नोकरशाही**<br>प्रशासकीय यंत्रणा | सर्वोच्च न्यायालय<br>उच्च न्यायालय<br>दुय्यम व इतर न्यायालये |
| **युनायटेड किंग्डम**  | **संसद**<br>हाऊस ऑफ कॉमन्स<br>हाऊस ऑफ लार्ड्स | **राजकीय कार्यकारी मंडळ**<br>राजेशाही (राजा/राणी) (राज्याचा प्रमुख)<br>प्रधानमंत्री (शासनाचा प्रमुख)<br>**नोकरशाही**<br>प्रशासकीय यंत्रणा | सर्वोच्च न्यायालय व इतर न्यायालये |
| **अमेरिका (यू.एस.ए.)**  | **कॉंग्रेस**<br>हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्ह<br>सिनेट | **राजकीय कार्यकारी मंडळ**<br>अध्यक्ष (राज्याचा आणि शासनाचा प्रमुख) आणि सचिव<br>**नोकरशाही**<br>प्रशासकीय यंत्रणा | सर्वोच्च न्यायालय<br>राज्याचे सर्वोच्च न्यायालय व इतर न्यायालये |

तुलनात्मक शासनामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व नोकरशाही यांसारख्या औपचारिक राजकीय संस्थांचा अभ्यास केला जातो. तुलनात्मक राजकारणात या राजकीय संस्थांचे कामकाज प्रभावित करणाऱ्या इतर घटकांचाही विचार केला जातो. या संस्थांचे कार्य कसे चालते याचे विश्लेषणही यात केले जाते.

थोडक्यात, तुलनात्मक राजकारण व शासन यामध्ये संविधान, कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्यायमंडळ, प्रतिनिधित्वाची पद्धत, राजकीय पक्ष,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

दबावगट इत्यादी संस्थांचे परिक्षण केले जाते. या पाठातून विद्यार्थ्यांना खालील गोष्टी समजतील.

(i) महत्वाच्या शासकीय संस्था, त्यांची संरचना व कार्ये, या संस्थांची निर्मिती कशी झाली हे विद्यार्थ्यांना समजेल. जगातील इतर राजकीय पद्धतींचासुद्धा त्यांना परिचय होईल. उदा., भारतातील शासनपद्धती ही अमेरिका किंवा युनायटेड किंग्डम येथील शासनपद्धतीपेक्षा वेगळी आहे. या सर्वांमधील साम्य व फरक कोणते आहेत हेही समजेल.

(ii) शासनाची निर्मिती कशी होते? नेत्यांची निवड किंवा निवडणूक कशी होते? हितसंबंधी गट, राजकीय पक्ष, दबावगट यांचे शासनाच्या निर्मितीमध्ये काय महत्त्व आहे? हे समजेल.

या भागातील तीन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

**प्रकरण चार : संविधानिक शासन :** संविधान म्हणजे काय? संविधान म्हणजे अशी राजकीय तत्त्वे ज्यांच्या आधारे देशाचा कारभार चालतो. यामध्ये लोकांची व शासनाची कर्तव्ये आणि अधिकार सांगितलेले असतात. राज्याची संरचना, त्यातील विविध संस्था, या संस्थांचे परस्परांशी व नागरिकांशी असलेले संबंध संविधान निश्चित करते. यामध्ये केंद्र व राज्य यांमधील सत्ता विभाजनही नमूद केलेले असते.

**प्रकरण पाच : प्रतिनिधित्वाची संकल्पना :** तुम्ही भारतातील संसद वा विधिमंडळ सदस्य, महानगरपालिकेतील नगरसेवक किंवा ग्रामीण भागातील ग्रामपंचायत सदस्य कसे निवडले जातात हे पाहिले आहे. आपण त्यांना आपले प्रतिनिधी म्हणतो. आपण त्यांना आपल्या वतीने विधिमंडळ वा संसदेमध्ये बोलण्याचा अधिकार देतो. त्यांनी लोकहित जपावे अशी अपेक्षा असते. ते सत्तापक्षात किंवा विरोधीपक्षात असले तरीही त्यांनी लोकहित जपावे ही अपेक्षा असते. राजकीय पक्ष सरकार स्थापन करतात. त्यामुळे प्रतिनिधित्व मिळवण्यात राजकीय पक्षांचा महत्त्वाचा वाटा असतो. कधी कधी एखाद्या समाजघटकाच्या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी हितसंबंधी गट किंवा दबावगट स्थापन केले जातात. हे गट त्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहचवतात व शासनावर दबाव आणतात. ही सर्व प्रतिनिधित्वाची माध्यमे आपण या पाठात अभ्यासणार आहोत.

**प्रकरण सहा : न्यायमंडळाची भूमिका :** संविधानाचा अर्थ लावण्याचे काम न्यायमंडळ करते. कायदेशीर विवाद सोडवण्याचा अधिकार न्यायमंडळाला असतो. आधुनिक लोकशाहीमध्ये न्यायमंडळ हा स्वतंत्र व अराजकीय शासन विभाग आहे. न्यायमंडळाकडे न्यायालयीन पुनर्विलोकनासारखा महत्वाचा अधिकार असतो. या अधिकाराचा वापर करून सर्वोच्च न्यायालय हे संसद, कार्यकारी मंडळ अथवा व्यवस्थापनाकडून संविधानाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेते. या पाठात तुम्ही न्यायमंडळाच्या अधिकारांचा तसेच न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अभ्यास करणार आहात.



**माहीत आहे का तुम्हांला?**

युनायटेड किंग्डम हे चार भौगोलिक प्रांत मिळून बनले आहे : इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स आणि उत्तर आयर्लंड. भौगोलिकदृष्ट्या इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्स हे ग्रेट ब्रिटन या बेटाचे भाग आहेत. उत्तर आयर्लंड आणि आयर्लंडचे प्रजासत्ताक हे एका वेगळ्या बेटावर आहेत. यांतील उत्तर आयर्लंड हा युनायटेड किंग्डमचा भाग आहे, तर आयर्लंडचे प्रजासत्ताक हा एक वेगळा देश आहे. युनायटेड किंग्डम या नावाऐवजी ब्रिटन किंवा इंग्लंड हेही शब्द वापरले जातात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ४. संविधानिक शासन

राजकीय संकल्पना या विभागात तुम्ही राष्ट्र, राज्य या संकल्पना अभ्यासल्या आहेत. तसेच हक्क, स्वातंत्र्य, न्याय या संकल्पनाही अभ्यासल्या आहेत. हे हक्क प्रत्येक नागरिकाला दिलेले असतात. हे हक्क नागरिकांना कोण देते? देशाचे संविधान नागरिकांना हक्क देते व त्यांचे संरक्षण करते.

**संविधान म्हणजे काय?**

संविधान हा एक जिवंत दस्तऐवज आहे. देशाचा कारभार कसा चालवावा हे यात नमूद केलेले असते. संविधानामध्ये तीन महत्त्वाचे परस्परसंबंधी घटक असतात.

(i) **नियमांचा संच :** संविधानात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ या शासनाच्या तीन विभागांची संरचना, त्यांचे अधिकार, कार्ये व त्यांची कर्तव्ये यांसंबंधीचे नियम असतात. प्रत्येक शासन विभाग हा त्यांना नेमून दिलेल्या अधिकारकक्षेत काम करेल याची दक्षता संविधान घेते. याकरिता इतर दोन शासन विभागांना तिसऱ्या विभागावर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार दिलेले असतात. उदाहरणार्थ, अमेरिकेत अध्यक्ष वा त्यांचे अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन केल्यास त्यांना पदच्युत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच शासन काय करू शकते किंवा काय करू शकत नाही यावरही संविधान मर्यादा घालते.

(ii) **अधिकारांचा संच :** संविधान नागरिकांचे हक्क व कर्तव्ये नमूद करते. तसेच या हक्कांचे संरक्षण करते. प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र, सन्मानाने व प्रतिष्ठित आयुष्य जगता यावे यासाठी विविध अधिकार दिलेले असतात, मात्र या अधिकारांना मर्यादा असतात. त्यांवर काही बंधने घातलेली असतात. उदाहरणार्थ, भारतीय संविधानात नागरिकांना मूलभूत हक्क दिले आहेत, पण त्याचबरोबर त्यावर मर्यादाही घातल्या आहेत. केवळ अधिकार देणे पुरेसे नसते, तर त्यांच्या संरक्षणाची व्यवस्था करणेही गरजेचे असते.

भारतीय संविधानात लोकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी विविध मार्ग नमूद केले आहेत. नागरिकांच्या अधिकाराचे संरक्षण करण्याची जबाबदारी प्रामुख्याने न्यायमंडळाला दिली आहे. अशा पद्धतीने या दोन घटकांमुळे शासन, समाज व व्यक्ती यांचे परस्परसंबंध निश्चित करणारी एक चौकट तयार होते.

(iii) **उद्दिष्टे व मूल्यांचा संच :** संविधानात उद्दिष्टे व मूल्येही नमूद केलेली असतात. यावरून संविधान निर्मितीमागील उद्देश स्पष्ट होतो. उदाहरणार्थ, जगातील सर्वांत जुन्या संविधानांपैकी एक असलेल्या अमेरिकन संविधानात त्याच्या निर्मितीमागील उद्देश घोषित केला आहे. या संविधानाद्वारे 'न्याय प्रस्थापित करावा, देशांतर्गत शांतता आणि संरक्षण द्यावे, सार्वत्रिक लोककल्याण साध्य करावे, आम्हांला व आमच्या वंशजांना स्वातंत्र्याचे वरदान मिळावे' यासाठी हे संविधान अस्तित्वात आले आहे. अशाच प्रकारच्या उद्दिष्टांनी भारतीय संविधानाचाही पाया रचला आहे.

जगातील बहुतांश संविधान लिखित स्वरूपात आहेत. एकाच लिखित दस्तऐवजात वरील तीनही घटक समाविष्ट केलेले असतात. सामान्यतः संविधान निर्मितीसाठी स्थापन केलेल्या विशिष्ट गटातील दीर्घ आणि सखोल चर्चेअंती संविधानाची निर्मिती होते. उदाहरणार्थ, अमेरिकेतील संविधानिक परिषदेने त्यांचे



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

संविधान निर्माण केले. तसेच भारतातील घटना समितीने भारतीय संविधानाची निर्मिती केली आहे.

काही देशांमध्ये संविधान अलिखित असते. उदाहरणार्थ, युनायटेड किंग्डम. अलिखित संविधानातही काही भाग लिखित स्वरूपात असतात, तर इतर भाग हे संविधानिक पायंडे वा संकेतांनी पाळले जातात. अर्थात, ते एकाच दस्तऐवजात लिहिलेले नसतात. उदा., युनायटेड किंग्डमच्या राजा/राणीला प्रधानमंत्री नियुक्तीचा असलेला अधिकार. यासंबंधी कोणतेही लिखित नियम नाहीत, परंतु ज्या पक्षाला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बहुमत असेल त्या पक्षाच्या नेत्याची नियुक्ती प्रधानमंत्री म्हणून केली जाते.

### संविधानवाद

संविधानवाद म्हणजे शासनाचे अधिकार मर्यादित असणे. शासनावरील मर्यादा संविधानात नमूद केलेल्या असतात किंवा त्या परंपरेने चालत आलेल्या असतात.

संविधानवादाची सुरुवात सतराव्या शतकातील जॉन लॉक या ब्रिटिश विचारवंताच्या सामाजिक कराराच्या सिद्धान्तातून (social contract theory) झालेली आढळते. त्यांच्या विचारानुसार शासन चुकीच्या गोष्टी करू शकत नाही आणि जर त्या गोष्टी शासनाने केल्या तर लोकांना ते शासन बदलण्याचा अधिकार असतो.

जॉन लॉक यांच्यापूर्वी १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा व १६८९ मध्ये ब्रिटिश संसदेने संमत केलेल्या बिल ऑफ राईट्स मार्फत राज्यकर्त्यांवर बंधने घातलेली होती. या दोन्ही प्रयत्नांतून शासनाच्या नव्हे तर राजाच्या अधिकारांवर बंधने घातली गेली. कारण त्या काळात सत्ता ही प्रामुख्याने राजाच्या हातात होती. ज्या वेळेस सत्ता विभाजनातून शासनाचे तीन विभाग निर्माण झाले त्या वेळी शासनावर नियंत्रण आणण्याची कल्पना पुढे आली. हाच आधुनिक काळातील संविधानवाद होय.

आधुनिक संविधानवाद प्रथम अमेरिकन संविधानातून मांडला गेला. अमेरिकन संविधानाच्या प्रथम दहा दुरुस्त्यांना एकत्रितपणे बिल ऑफ राईट्स असे संबोधले जाते. यातूनच शासनावर नियंत्रण आणले गेले. उदा., प्रथम संविधान दुरुस्तीनुसार व्यक्तीच्या बोलण्याच्या स्वातंत्र्यावर आणि वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधने घालण्यास मज्जाव केला. भारतातही संविधानाने व्यक्तीच्या मूलभूत हक्कांवर बंधने घालण्यास शासनास मज्जाव केला आहे. शासनाच्या अधिकारांवर नियंत्रण आणल्याची ही काही उदाहरणे आहेत.

**शोधा पाहू !**

भारतीय संविधानाने नागरिकांना कोणते मूलभूत हक्क दिलेले आहेत?



भारतीय घटना समिती



अमेरिकन संविधानावर स्वाक्षऱ्या करताना

अलिखित संविधान असलेल्या देशामंध्ये काय होते? अलीकडच्या काळापर्यंत युनायटेड किंग्डममध्ये



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

संसदेच्या सार्वभौमत्वाचा सिद्धान्त अस्तित्वात होता. त्यामुळे तेथील संसदेला कोणताही कायदा बनवण्याचा अधिकार होता म्हणजेच शासनावर कोणतेही नियंत्रण नव्हते. तरीही जेव्हा संसदेने अन्यायकारक व अनियंत्रित कायदे बनवले तेव्हा ते सर्व कायदे सतर्क लोकमतापुढे टिकले नाहीत. पूर्वीसारखे आज तेथे संसदेला सार्वभौमत्व नाही. याचे एक कारण असे, की आज युनायटेड किंग्डम वेगवेगळ्या आतंरराष्ट्रीय संघटनांचा सदस्य आहे आणि त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय करार केले आहेत, ज्यामध्ये त्यांनी व्यक्तीच्या हक्कांची हमी दिली आहे. या हक्कांमुळे शासनाच्या अधिकारांवर नियंत्रण आले आहे.

ज्या संविधानाने शासनाचे अधिकार नियंत्रित केले त्या संविधानात दुरुस्त्या करून शासन ही नियंत्रणे काढू शकते. बऱ्याचशा संविधानात बदलांना वाव दिलेला असतो. मग शासनाने संविधान दुरुस्त्या करून ही सर्वच नियंत्रणे काढून टाकली तर? अशी परिस्थिती भारतात १९७० च्या दशकात उद्भवली. त्या वेळच्या शासनाला संविधानाने घातलेली बंधने म्हणजे देशाच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर वाटले आणि म्हणून त्यांनी संविधान दुरुस्तीची मागणी केली. परंतु केशवानंद भारती या प्रसिद्ध खटल्यात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने शासनाच्या संविधान दुरुस्तीच्या अधिकारावरच नियंत्रण आणले. न्यायालयाने असे स्पष्ट केले, की भारतीय संविधानाला एक मूळ संरचना (basic structure) आहे आणि ती कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही, शासन इतर कोणतेही बदल करू शकते. यालाच मूळ संरचना तत्व (basic structure doctrine) असे म्हणतात.

**शोधा पाहू !**

- आतापर्यंत भारतीय संविधानात किती वेळा दुरुस्त्या झाल्या आहेत ?
- सर्वांत अलीकडची घटनादुरुस्ती कोणती ?

लोकशाहीमध्ये संविधानवाद म्हणजे केवळ शासनाच्या अधिकारावर नियंत्रण एवढेच नव्हे तर संविधानाच्या भावनेचे (Spirit of Constitution) पालन करणे होय. जी तत्त्वे संविधानाची पायाभूत तत्त्वे आहेत ती सत्तेवर असणाऱ्यांनी पाळली पाहिजेत. यालाच 'संविधानिक नैतिकता' (Constitutional Morality) असे म्हणतात.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे घटना समितीतील भाषण :**

संविधानिक नैतिकता ही नैसर्गिक भावना नाही. ती रुजवावी लागेल. आपल्या लोकांना ती शिकावी लागेल.

## लोकशाही शासनाचे महत्त्वाचे प्रकार

लोकशाही ही अशी व्यवस्था आहे ज्यात लोक आपले राज्यकर्ते निवडतात, परंतु लोकशाहीमध्ये एकाच प्रकारची शासनव्यवस्था नसते. यातील दोन प्रमुख प्रकार म्हणजे 'संसदीय पद्धत' व 'अध्यक्षीय पद्धत'. भारत आणि युनायटेड किंग्डममध्ये संसदीय पद्धत आहे, तर अमेरिकेमध्ये अध्यक्षीय पद्धत आहे. या दोन्ही प्रकारांत कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांतील परस्परसंबंध भिन्न असतात. कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ यांतील परस्परसंबंधावरून हे दोन प्रकार पडतात.

**संसदीय पद्धत :** संसदीय पद्धतीत राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुख भिन्न असतात. राष्ट्रपती अथवा युनायटेड किंग्डममधील राजा किंवा राणी हे राष्ट्रप्रमुख असतात, तर प्रधानमंत्री हे शासनप्रमुख असतात. राष्ट्रपती वा राजा, प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचे मिळून कार्यकारी मंडळ बनते. राष्ट्रपती अथवा राजा हे नामधारी प्रमुख असतात, परंतु वास्तविक सत्ता ही प्रधानमंत्री व मंत्रिमंडळाकडे असते.

संसदीय पद्धतीत दोन कार्यकारी प्रमुख असतात. एक नामधारी प्रमुख व एक वास्तव प्रमुख. देशाचा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**भारतीय शासन व्यवस्था (संसदीय पद्‌धती)**

राष्ट्रपती (राज्याचा प्रमुख)



**कार्यकारी मंडळ**

(साऊथ ब्लॉक)



प्रधानमंत्री (शासनप्रमुख)
आणि मंत्रिमंडळ

**कायदेमंडळ**

(संसद भवन)



संसद
लोकसभा आणि राज्यसभा

**न्यायमंडळ**

(सर्वोच्च न्यायालय)



सर्वोच्च न्यायालय

**शासनव्यव्यस्था : युनायटेड किंग्डम (संसदीय पद्‌धती)**

राजेशाही (राजा/राणी) (राज्याचा प्रमुख)



**कार्यकारी मंडळ**

प्रधानमंत्री (शासनप्रमुख)
आणि मंत्रिमंडळ

**कायदेमंडळ**

(संसद भवन )



संसद
हाऊस ऑफ कॉमन्स
हाऊस ऑफ लॉर्ड्स

**न्यायमंडळ**

सर्वोच्च न्यायालय

कारभार हा नामधारी प्रमुखाच्या नावाने व आज्ञेने चालत असला तरी प्रत्यक्ष निर्णय हे वास्तव प्रमुख घेत असतात. नामधारी प्रमुखाचे अधिकार नावापुरतेच असतात. नामधारी प्रमुख कोण आहेत यावरून संसदीय पद्‌धतीचे दोन प्रकार पडतात.

(१) संविधानिक राजेशाही (२) प्रजासत्ताक

ज्या ठिकाणी नामधारी प्रमुख हा वंशपरंपरेने निवडला जातो त्याला संविधानिक राजेशाही असे म्हणतात, तर ज्या ठिकाणी नामधारी प्रमुख हा निवडून दिला जातो, त्या प्रकाराला प्रजासत्ताक असे म्हणतात. प्रजासत्ताकाच्या प्रमुखाला राष्ट्रपती असे म्हणतात. ते नामधारी प्रमुख असतात आणि ते देशाच्या राजकीय व्यवस्थेचे देखील प्रमुख असतात.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

मंत्रिमंडळाच्या प्रमुखाला प्रधानमंत्री म्हणतात. संसदेमध्ये बहुमत असलेल्या व्यक्तीला प्रधानमंत्री म्हणून नियुक्त करतात. प्रधानमंत्र्याची नियुक्ती राष्ट्रपती अथवा राजा करतो. प्रधानमंत्र्यांच्या इच्छेनुसार राष्ट्रपती अथवा राजा इतर मंत्र्यांची नियुक्ती करतात. मंत्र्यांच्या मदतीने प्रधानमंत्री शासनाचा कारभार चालवतात म्हणून त्यांना शासनप्रमुख असे म्हणतात. अध्यक्षीय पद्धतीत शासनाचा कारभार अध्यक्ष चालवतात म्हणून राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुख दोन्हीही तेच असतात.

संसदेमध्ये बहुमत असेपर्यंत प्रधानमंत्री व मंत्रिमंडळ सत्तेत असतात. बहुतांश संसदीय पद्धतीत संसदेची दोन सभागृहे असतात. उदा., युनायटेड किंग्डममध्ये संसदेची हाऊस ऑफ लॉर्ड्स आणि हाऊस ऑफ कॉमन्स ही दोन सभागृहे आहेत. भारतीय संसदेत लोकसभा व राज्यसभा ही दोन सभागृहे आहेत. हाऊस ऑफ कॉमन्स आणि लोकसभा ही लोकांनी निवडून दिलेली सभागृहे आहेत. याच सभागृहातील बहुमतामुळे कार्यकारी मंडळ सत्तेवर राहते.

**शोधा पाहू !**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या भारतातील सर्व प्रधानमंत्री व त्यांच्या कार्यकाळाचा तक्ता तयार करा.

**अध्यक्षीय पद्धत :** अध्यक्षीय पद्धतीत कार्यकारी प्रमुख हे मर्यादित काळासाठी लोकांकडून निवडले जातात. या कार्यकारी प्रमुखांना अध्यक्ष असे म्हणतात. म्हणून या पद्धतीला अध्यक्षीय पद्धत असे म्हणतात. राष्ट्रप्रमुख व शासनप्रमुख ही दोन्ही पदे अध्यक्ष भूषवतात. अध्यक्षांना संविधानाने अधिकार दिलेले असतात. कायदेमंडळाकडून बनवलेल्या कायद्यानुसार शासनाचा कारभार चालवणे हा त्यांचा प्रमुख अधिकार आहे. अध्यक्ष त्यांच्या इच्छेनुसार मंत्री अथवा राजदूत यांची अधिकारी म्हणून नियुक्ती करतात. या पद्धतीमध्ये कार्यकारी मंडळातील सदस्यांना कायदेमंडळाचे सदस्य होता येत नाही. उदा., मंत्री (अमेरिकेत त्यांना सचिव म्हणतात.) हे काँग्रेसचे सभासद नसतात.

**अमेरिकन शासनव्यवस्था (अध्यक्षीय पद्धत)**




(सत्ता विभाजनांतर्गत असलेले शासनाचे तीन घटक)

कायदेमंडळ




काँग्रेस
हाऊस ऑफ रेप्रेझेन्टेटिव्ह
सिनेट

कार्यकारी मंडळ



राष्ट्राध्यक्ष
उपराष्ट्राध्यक्ष
सचिव (मंत्रिमंडळ)

न्यायमंडळ



सर्वोच्च न्यायालय
इतर न्यायालये



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शोधा पाहू !**

अमेरिकेतील रिपब्लिकन पक्ष आणि डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रत्येकी चार अध्यक्षांची नावे लिहा.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

***अध्यक्षीय पद्‌धत असलेले देश :*** अमेरिका, मेक्सिको, ब्राझील, अर्जेंटिना, दक्षिण आफ्रिका इत्यादी.

***संसदीय पद्‌धत असलेले देश :*** भारत, युनायटेड किंग्डम, जर्मनी, इटली, जपान, कॅनडा, ऑस्ट्रेलिया इत्यादी.

कायदेमंडळ हे लोकांकडून निवडले जाते. संविधानाने त्यांना कायदे करण्याचा अधिकार दिला आहे, परंतु हा अधिकार मर्यादित आहे. कारण अध्यक्षांच्या मंजुरीनंतरच हे कायदे संमत होतात. कायदेमंडळाचे कायदे नाकारण्याचा अधिकार अध्यक्षांना असतो. याला नकाराधिकार (veto power) असे म्हणतात. एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी कार्यकारी मंडळाने प्रस्तावित केलेला कायदा मंजूर करण्याची विनंती ते कायदेमंडळाला करू शकतात. अध्यक्षांनी संविधानाचे उल्लंघन केले तर कायदेमंडळ त्यांना पदच्युत करू शकते. वस्तुतः लोकशाही व्यवस्थेमध्ये अशी वेळ अभावानेच येते. सत्तेवर राहण्यासाठी अध्यक्षांना कायदेमंडळातील बहुमताची गरज नसते. कायदेमंडळात बहुमत नाही म्हणून त्यांना राजीनामा देण्याची गरज नसते, परंतु त्यांना कायदेमंडळात बहुमत नसेल तर शासनाच्या कामकाजात अडथळे येऊ शकतात. कारण त्या परिस्थितीमध्ये कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ एकमेकांची सतत अडवणूक करू शकतात.

## संघराज्य पद्‌धत

काही देश आकाराने मोठे असतात व त्यात अनेक प्रदेश असतात. अशा देशांमध्ये एका शासनामार्फत संपूर्ण देशाचा कारभार चालवणे अवघड असते. म्हणून या देशांमध्ये शासनव्यवस्था द्‌विस्तरीय असते. एक शासन राष्ट्रीय स्तरावर व दुसरे शासन प्रादेशिक स्तरावर असते. या प्रदेशांना किंवा घटकांना 'राज्य' अथवा 'प्रांत' असे म्हणतात. सत्तेचे विभाजन या दोन शासनांमध्ये केले जाते. केंद्रीय स्तरावरील शासनाला राष्ट्रीय शासन, केंद्रशासन, संघीय शासन किंवा संघराज्य शासन असेही म्हटले जाते, तर प्रादेशिक स्तरावरील शासनाला राज्यशासन असे म्हणतात. ज्या देशात अशी द्‌विस्तरीय यंत्रणा असते त्यांना संघराज्य पद्‌धत किंवा संघराज्य व्यवस्था असे म्हणतात.

जे देश आकारमानाने लहान असतात त्या देशांत केंद्रस्थानी एकच शासन असते, या पद्‌धतीला एकात्मक पद्‌धत असे म्हणतात.

केंद्रशासन व राज्यशासन यांमधील सत्तेचे विभाजन हे औपचारिक असते. संविधानात सत्ताविभाजन स्पष्टपणे नमूद केलेले असते. उदा., अमेरिकन संविधानात केंद्रशासनाचे अधिकार स्पष्टपणे नमूद केलेले आहेत. भारतातही संविधानाच्या सातव्या परिशिष्टात केंद्रशासन व राज्यशासनाचे अधिकार सूचिबद्‌ध केले आहेत. या सत्ताविभाजनात बदल करायचे असल्यास दोन्ही शासनांची संमती आवश्यक असते.

मध्ययुगातील युरोपात संघराज्याचे ऐतिहासिक संदर्भ सापडतात. तेथे प्रबळ शत्रूचा सामना करण्यासाठी किंवा सामायिक समस्या सोडवण्यासाठी काही घटक एकत्र आले. या व्यवस्थेत अनेक शतके बदल होत गेले व अंतिमतः एक एकसंध राजकीय व्यवस्था तयार झाली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वित्झर्लंड. काही ठिकाणी परिपूर्ण संघराज्य पद्‌धती अल्पावधीत तयार झाली. उदा., अमेरिका. या ठिकाणी तेरा स्वतंत्र ब्रिटिश वसाहतींनी अठराव्या शतकात स्वातंत्र्यासाठी युनायटेड किंग्डमविरुद्‌ध लढा दिला व स्वातंत्र्य मिळवले. हे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे याची जाणीव त्यांना झाली म्हणून ते एकत्र आले व एक नवीन देश अस्तित्वात आला. तो देश म्हणजे अमेरिका. अशा प्रकारे अस्तित्वात आलेल्या संघराज्यांना 'एकत्रीकरणातून आलेले' (coming together) संघराज्य असे म्हटले जाते. कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया या देशांतील संघराज्य व्यवस्था अशाच प्रवृत्तीतून अस्तित्वात आली आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले त्या वेळेस अनेक संस्थाने व ब्रिटिश अमलाखाली अनेक प्रदेश अस्तित्वात होते. आज जी राज्ये आपण बघतो ती स्वातंत्र्यानंतर भाषेच्या आधारावर तयार केली गेली. म्हणजेच वसाहतींच्या एकत्रीकरणातून अमेरिकन संघराज्य तयार झाले, तर भारतात केंद्रीय सत्तेने नवीन राज्ये तयार केली. याविरुद्ध काही देशांत एककेंद्री पद्धत बदलून नवीन 'राज्ये' अथवा प्रांत तयार केल्याने संघराज्ये अस्तित्वात आली. यांना एकत्र धरून ठेवणारी संघराज्य पद्धती तयार केल्याने त्यांना संघराज्य पद्धती (holding together) म्हणतात. या पद्धतीत देशाची एकात्मता टिकवण्यासाठी केंद्रीय सत्तेचे विभाजन केले जाते. युनायटेड किंग्डममध्ये एककेंद्री शासनपद्धती आहे, परंतु आज तेथील स्कॉटलंड, वेल्स व उत्तर आयर्लंड यांना काही प्रमाणात स्वायत्तता दिली आहे आणि त्यामुळे त्यांची स्वतंत्र विधिमंडळे आहेत.

भारतात सत्ताविभाजनामध्ये केंद्रशासनाला अधिक अधिकार दिले आहेत. म्हणून भारतीय संघराज्याला संघराज्यसदृश संघराज्य (quasi-federation) अथवा एकात्मतेकडे झुकणारे संघराज्य असे म्हटले जाते. भारतीय संघराज्याचा प्रवास संमिश्र आहे. स्वातंत्र्यानंतर राज्यांना वाढीव अधिकार देण्यात आले, परंतु त्यानंतरच्या काळात आर्थिक व तंत्रज्ञानातील बदलांमुळे केंद्रशासनाच्या अधिकारात वाढ झाली आहे.

या पाठात आपण संविधानाचे महत्त्व व संविधानाच्या चौकटीत राहून शासन कसे काम करते ते पाहिले. आपण विविध प्रकारच्या शासनपद्धतीही अभ्यासल्या. पुढील पाठात आपण लोकशाही व्यवस्थेत शासन कसे बनते हे पाहणार आहोत.



**माहीत आहे का तुम्हांला?**

***भारतीय संविधानातील सातवे परिशिष्ट –*** सातव्या परिशिष्टात केंद्रसूची, राज्यसूची व समवर्ती सूची अशा तीन सूचींचा समावेश आहे. केंद्रसूचीतील विषयांवर केंद्रशासन, राज्यसूचीतील विषयांवर राज्यशासन व समवर्ती सूचीतील विषयांवर दोन्ही शासन कायदे करू शकतात. समवर्ती सूचीतील विषयांवर केंद्र व राज्य या दोहोंनी कायदा बनवल्यास केंद्राचा कायदा टिकून राहतो आणि राज्याचा रद्द होतो.

**करून पहा :** भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टातील खाली नमूद केलेल्या विषयांचे केंद्रसूची, राज्यसूची, समवर्ती सूचीमध्ये वर्गीकरण करा.(१) कायदा व सुव्यवस्था (२) अणुऊर्जा (३) बँकिंग क्षेत्र (४) कृषी (५) पोलीस (६) वीज (७) शिक्षण



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**Please see the following websites for further information:**

**(1) Constituent Assembly of India Debates** (Proceedings) - Volume XI, 25th Nov. 1949
The Constituent Assembly of India met in the Constitution Hall, New Delhi, at Ten of the Clock, Mr. President (The Honourable Dr.Rajendra Prasad) in the Chair. Reply to the Debate: Dr. B.R.Ambedkar

http://cadindia.clpr.org.in/constitution_assembly_debates/volume/11/1949-11-25

**(2) Former Presidents of India**
https://presidentofindia.nic.in/former-presidents.htm



## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. अलिखित संविधान ......... या देशात आहे. (युनायटेड किंग्डम, भारत, दक्षिण अफ्रिका, अमेरिका)

२. संसदीय पद्धतीमध्ये कायदेमंडळात व कार्यकारी मंडळात अधिकाराचे .......... आहे. (विभाजन, समन्वय, विलीनीकरण, केंद्रीकरण)

३. अमेरिकन संविधानाच्या प्रथम दहा दुरुस्त्यांना एकत्रितपणे ........... संबोधले जाते. (बिल ऑफ राईट्स, मॅग्नाकार्टा, मूळ तत्व, मूलभूत हक्क)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(i) मॅग्नाकार्टा - इंग्लंड
(ii) नकाराधिकार - युनायटेड किंग्डम
(iii) केशवानंद भारती खटला - मूळ संरचना

**(क) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. इंग्लंड, स्कॉटलंड, वेल्स, आयर्लंडचे प्रजासत्ताक

२. भारत, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अर्जेंटिना

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. भारतीय संघराज्याला संघराज्यसदृश संघराज्य म्हटले जाते.

२. अमेरिकेत संसदीय पद्धत अस्तित्वात आहे.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. संसदीय शासनप्रणालीतील कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ.

२. अध्यक्षीय पद्धतीत अध्यक्ष आणि कायदेमंडळ.

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. संविधानवाद व संविधानिक नैतिकता या दोन संकल्पना स्पष्ट करा.

२. भारतीय संघराज्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

संविधान व संविधानातील परस्परसंबंधी घटक स्पष्ट करा.

(अ) संविधान म्हणजे काय ?
(ब) नियमांचा संच
(क) अधिकारांचा संच
(ड) उद्दिष्टे व मूल्यांचा संच

**उपक्रम**

अमेरिकन संविधानातील बिल ऑफ राईट्समध्ये कोणते हक्क नमूद केले आहेत?

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ५. प्रतिनिधित्वाची संकल्पना

आपण 'प्रतिनिधी' हा शब्द संसदेचे सदस्य, विधिमंडळाचे सदस्य, महानगरपालिकेतील नगरसेवक, वा ग्रामपंचायतीतील सदस्यांसाठी वापरतो. प्रतिनिधित्वाची संकल्पना लोकशाहीत महत्त्वाची आहे. प्रतिनिधी म्हणजे काय? ते कोण असतात? ते प्रतिनिधी कसे होतात? या पाठात आपण लोकशाहीतील प्रतिनिधित्वाची संकल्पना अभ्यासणार आहोत.

## प्रतिनिधित्व म्हणजे काय?

आज लोकशाहीमध्ये लोक त्यांचा कारभार चालवण्यासाठी त्यांच्यातील काही जणांची निवड करतात, त्यांना प्रतिनिधी असे म्हणतात. अशा लोकशाहीला 'अप्रत्यक्ष लोकशाही' असे म्हणतात. कारण या ठिकाणी लोक स्वतःचा कारभार स्वतः न करता ती जबाबदारी त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे सोपवतात. पूर्वी लोक स्वतःचा कारभार स्वतः चालवत होते. त्या व्यवस्थेला 'प्रत्यक्ष लोकशाही' असे म्हणतात. प्राचीन ग्रीसमध्ये अथेन्स या नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही होती. अशाच प्रकारच्या व्यवस्थेची उदाहरणे प्राचीन भारतातही आढळतात. त्या व्यवस्थेत सत्तेत सहभागी होण्याचा अधिकार सर्वांना दिलेला नव्हता. सामान्यतः महिला व गरीब यांना वगळले जात होते.

भौगोलिकदृष्ट्या लहान व कमी लोकसंख्या असलेल्या राज्यांत प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात होती. त्या ठिकाणी सर्व लोकांना एकत्र येऊन त्यांचे निर्णय घेणे शक्य होते, परंतु आधुनिक काळात राज्याचा विस्तार व लोकसंख्येतील वाढ यांमुळे लोकांना स्वतःचा कारभार स्वतः पाहणे शक्य नसते. यातूनच 'अप्रत्यक्ष लोकशाही' उदयास आली. यात लोकांचा कारभार हा प्रतिनिधींमार्फत चालवला जातो म्हणून याला प्रातिनिधिक लोकशाही असेही म्हणतात. या शासन प्रकाराला 'जबाबदार शासन' असेही म्हणतात. कारण प्रतिनिधी हे लोकांना जबाबदार व उत्तरदायी असतात.

## राजाचा दैवी अधिकार

प्रातिनिधिक लोकशाहीची सुरुवात मध्ययुगातील युरोपात झाली. तज्ज्ञांच्या मते अशीच व्यवस्था भारतातही अस्तित्वात होती. मध्ययुगापर्यंत जगात सर्वत्र राजेशाही अस्तित्वात होती. राजाची लोकांवर निरंकुश सत्ता होती. काही ठिकाणी राजाला देवाचा पृथ्वीवरील प्रतिनिधी मानले जात होते. लोकांवर राज्य करण्याचा अधिकार त्याला देवाने दिला आहे असे राजा मानत असे. यालाच राजाचा दैवी अधिकार असे म्हणतात.

हळूहळू राज्य चालवणे खर्चिक होत गेल्याने राजांनी लोकांवर कर लावण्याचे ठरवले. लोकांची मान्यता मिळाल्यास कर जमा करणे सोपे झाले असते, परंतु याकरिता सर्व लोकांनी एकत्र येणे किंवा वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र जमून करांना मान्यता देणे शक्य नव्हते. म्हणून अनेक राजांनी राज्याच्या विविध भागांतून लोकांनी निवडून दिलेल्या व्यक्तींना राजधानीत सभेसाठी एकत्र बोलवले व या सभेमध्ये करांचे प्रस्ताव संमत करण्याचे ठरवले. या सभांना 'प्रतिनिधी सभा' असे संबोधले गेले. युनायटेड किंग्डममधील 'हाऊस ऑफ कॉमन्स' ही अशीच एक प्राचीन प्रतिनिधी सभा आहे.

## प्रतिनिधी सभा

प्रतिनिधी सभांनी निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग असावा अशी मागणी केली. याला राजांनी विरोध केला. दोघांमधील हा संघर्ष काही ठिकाणी अंतर्गत वादाला कारणीभूत ठरला. १६४० च्या दशकात



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

झालेले इंग्लिश यादवी युद्ध आणि १७८९ मधील फ्रेंच राज्यक्रांती ही याची दोन उत्तम उदाहरणे आहेत. यातील पहिल्या घटनेमुळे युनायटेड किंग्डम संविधानिक राजेशाहीच्या मार्गावर गेला, तर दुसऱ्या घटनेमुळे १९व्या शतकात फ्रान्स प्रजासत्ताक झाले. अशा संघर्षामध्ये राजेशाहीचा पराभव झाला आणि तेथे प्रतिनिधी सभांनी संपूर्ण कारभार आपल्या हाती घेतला. या प्रतिनिधी सभांमधील सदस्यांना 'राजकीय प्रतिनिधी' असे म्हटले गेले. त्यांनी सामूहिकरीत्या शासनाचा कारभार चालवला. यालाच 'राजकीय प्रतिनिधित्व' असे संबोधले गेले.

राजकीय प्रतिनिधित्व म्हणजे काय? प्रतिनिधित्व म्हणजे ज्या लोकांनी त्यांना प्रतिनिधी म्हणून निवडून दिले आहे त्यांच्या मागण्या व प्रश्न मांडणे व त्यांच्या हिताचे रक्षण करणे होय. राजकीय प्रतिनिधित्वाचे कार्य वर उल्लेख केलेल्या प्रतिनिधी सभांमध्ये चालते.

आधुनिक काळात १९व्या शतकानंतर 'राजकीय प्रतिनिधित्वाची' ही कल्पना युरोपसहित जगाच्या इतर भागांमध्ये पसरली. तोपर्यंत बऱ्याच युरोपीय देशांनी आशिया आणि आफ्रिका खंडात त्यांच्या वसाहती स्थापन केल्या होत्या. या सर्व घडामोडींनी प्रभावित झालेल्या आशिया आणि आफ्रिकेतील लोकांनी त्यांच्या देशातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढावा याची मागणी केली. अशी मागणी करणाऱ्या पहिल्या काही देशांमध्ये भारत होता.

### भारत

१८५७ च्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी भारतीयांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचे ठरवले. त्यानुसार १८६१ मध्ये काही भारतीयांना राष्ट्रीय स्तरावर तर काहींना प्रांतीय स्तरावर कायदे मंडळामध्ये नियुक्त केले. हे भारतीय निवडून दिलेले नव्हते तर त्यांच्या नियुक्त्या केल्या होत्या. त्यांची निवड लोकांच्या मर्जीने नव्हे तर ब्रिटिशांच्या इच्छेने झाली होती; परंतु तरीही त्यांना 'प्रतिनिधी' समजले गेले. यानंतर ज्या भारतीय लोकांचे प्रतिनिधित्व ते करतात त्यांची निवड भारतीय लोकांनी करावी अशी मागणी करण्यात आली.

ही मागणी कालांतराने पूर्ण करण्यात आली. '१९३५ चा भारतीय शासन कायदा' हा या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा होय. या कायद्यानुसार प्रांतीय स्तरावर लोकनियुक्त सदस्यांच्या प्रतिनिधी सभांची स्थापना करण्यात आली. प्रांतीय सरकारांमध्ये संसदीय शासनव्यवस्था प्रस्थापित करण्यात आली. ही प्रक्रिया १९५० ते १९५२ मध्ये पूर्ण झाली असे म्हणता येईल कारण १९५० मध्ये भारत संसदीय लोकशाही असलेला प्रजासत्ताक देश झाला, तर १९५१-५२ मध्ये भारतात संसदेच्या व विधिमंडळांच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.

**भारतातील प्रतिनिधी सभेसाठीचे महत्त्वाचे कायदे :**

**१८६१ :** Indian Councils Act 1861 – भारतात कायदेमंडळाची स्थापना व त्यावर भारतीयांच्या नेमणुका.

**१८९२ :** Indian Councils Act 1892 – कायदेमंडळाचा विस्तार व प्रतिनिधित्वाच्या निवडणुकांना सुरुवात.

**१९०८-०९ :** Morley-Minto reforms and the Indian Councils Act, 1909 – कायदेमंडळाचा आणखी विस्तार व प्रतिनिधींच्या प्रमाणात वाढ.

**१९१८-१९ :** Montagu-Chelmsford Reforms and Government of India Act, 1919 – कायदेमंडळाचा विस्तार आणि त्यात लोकनियुक्त सदस्यांचे बहुमत.

**१९३५ :** Government of India Act 1935 – प्रांतीय कायदेमंडळ हे लोकनियुक्त सदस्यांचे झाले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**प्रतिनिधित्वाच्या पद्धती**

प्रत्येक लोकशाही देशामध्ये देशाचा कारभार चालवणाऱ्या प्रतिनिधी निवडीच्या वेगवेगळ्या पद्धती असतात. या पद्धतींना प्रतिनिधित्वाच्या पद्धती म्हणतात. या पद्धती खालीलप्रमाणे :

(i) **निवडणूक :** लोकांना त्यांचे प्रतिनिधी ठरवण्याचा अधिकार असतो. निवडणुकीच्या माध्यमातून लोक प्रतिनिधी सभेमध्ये आपले प्रतिनिधी कोण असावेत हे ठरवतात. कारण या प्रतिनिधी सभांकडे निर्णय घेण्याचा सर्वोच्च अधिकार असतो. मात्र निवडणुकीची एकच पद्धत नसून त्याच्या अनेक पद्धती आहेत.

(ii) **नेमणूक :** या पद्धतीत वेगवेगळ्या पदांकरिता प्रतिनिधींची निवड, नियुक्ती अथवा नेमणूक केली जाते. या पद्धतीने विविध शासकीय अधिकारी व इतर शासकीय आस्थापनांमधील सदस्य कोण असावेत हे ठरवले जाते.

(iii) **बिगरशासकीय :** या पद्धतीत नागरी समाज लोकांचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करतो. हे प्रतिनिधित्व विविध हितसंबंधी गट व दबाव गटांच्या माध्यमातून केले जाते.

सामान्यतः प्रतिनिधी सभेसाठी निवडणूक ही भौगोलिक आधारावर घेतली जाते. देशाचे वेगवेगळे विभाग अथवा मतदार संघ तयार केले जातात. त्या त्या मतदार संघात राहणाऱ्या लोकांना त्यांच्या विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती निवडण्याचा अधिकार असतो. लोकांना मतदानाचा हक्क असतो. ज्या व्यक्ती निवडणूक लढवतात त्यांना उमेदवार असे म्हणतात. प्रत्येक मतदारसंघातून किती उमेदवार निवडायचे ती संख्या प्रत्येक देशात वेगवेगळी असते.

**निवडणूक पद्धतीचे वर्गीकरण दोन प्रकारांत होते.**

(i) एका मतदारसंघातून निवडलेल्या उमेदवारांची संख्या : या आधारावरून मतदारसंघाचे दोन प्रकार पडतात.

(अ) एक सदस्यीय मतदारसंघ : यात एका मतदारसंघातून एकच उमेदवार निवडला जातो.

(ब) बहुसदस्यीय मतदारसंघ : यामध्ये एका मतदारसंघातून एकापेक्षा अधिक उमेदवार निवडले जातात.

(ii) एका मतदारसंघातून निवडून येण्यासाठी मतांची असलेली आवश्यकता. याचे तीन प्रकार असतात. (अ) अनेकत्व (ब) बहुमत (क) प्रमाणशीर

सामान्यतः अनेकत्व व बहुमत पद्धती एकसदस्यीय मतदारसंघासाठी वापरली जाते. अनेकत्व पद्धतीत ज्या उमेदवाराला सर्वांत जास्त मते मिळतात तो निवडून येतो. या पद्धतीत उमेदवाराला बहुमत मिळवणे आवश्यक नसते. उदाहरणार्थ, धावण्याच्या शर्यतीत जो स्पर्धक प्रथम अंतिम रेषा पार करतो तो स्पर्धा जिंकतो, त्याला अंतिम रेषा पार करण्यासाठी किती वेळ लागला हे महत्त्वाचे नसते. म्हणूनच या पद्धतीला प्रथम पोहचणारा विजयी (First past the post) असे म्हणतात. भारतात लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका या पद्धतीने होतात.

बहुमत पद्धतीमध्ये उमेदवाराला बहुमत मिळवणे म्हणजेच ५०% पेक्षा जास्त मते मिळवणे आवश्यक असते. भारतात राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी ही पद्धत वापरली जाते.

प्रमाणशीर पद्धत सामान्यतः बहुसदस्यीय मतदारसंघांमध्ये वापरली जाते. या पद्धतीत राजकीय पक्ष त्यांना मिळालेल्या मतांच्या प्रमाणात त्यांचे उमेदवार पाठवतात. उदा., पाच सदस्यीय मतदारसंघात एका राजकीय पक्षाला ४०% मते मिळाली तर त्या पक्षाचे त्या मतदारसंघातून २ उमेदवार निवडून येतात. भारतात ही पद्धत अस्तित्वात नाही. प्रमाणशीर पद्धतीचा आणखी एक उपप्रकार आहे. त्याला



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

एकल संक्रमणीय मतदान पद्धत असे म्हणतात. या पद्धतीत मतदार मतदानाच्या वेळेस उमेदवारांना पसंतीक्रम देतात. ही पद्धत भारतात राज्यसभा व विधान परिषद निवडणुकीसाठी वापरली जाते.

### मतदानाचा हक्क

लोकशाहीत प्रौढ मताधिकार दिलेला असतो. म्हणजेच प्रत्येक प्रौढ नागरिकाला मताधिकार दिलेला असतो. हा अधिकार लिंग, वंश, आर्थिक वा सामाजिक दर्जा हा भेदभाव न करता दिला जातो. म्हणूनच प्रत्येक प्रौढ नागरिकाला त्यांचे प्रतिनिधी कोण असावेत हे ठरवण्याचे स्वातंत्र्य मिळते. प्रत्येक देशात मतदाराचे किमान वय वेगवेगळे असते. भारतात १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकाला मतदानाचा हक्क प्राप्त होतो.

मागील पाठात म्हटल्याप्रमाणे पूर्वी महिला व गरीब यांना मतदानाचा हक्क नव्हता पण जशी लोकशाही प्रगल्भ होत गेली तसेच बहुसंख्याकांना मताधिकारापासून वंचित ठेवणे अवघड होऊ लागले आणि मग सर्व पुरुषांना मतदानाचा हक्क मिळू लागला. महिलांना हा अधिकार मिळवण्यासाठी अधिक संघर्ष करावा लागला. २० व्या शतकाच्या मध्यात बहुतांश देशात महिलांना हा अधिकार प्राप्त झाला. भारतात मात्र १९५० पासूनच महिला व पुरुष यांना समान मताधिकार देण्यात आला.

### प्रतिनिधित्वाची माध्यमे आणि स्तर



भारतातील महिला मतदार




भारत निर्वाचन आयोग – पोस्टाचे तिकीट

**माहीत आहे का तुम्हांला?**

महिलांना मतदानाचा अधिकार कधी मिळाला?

| | | |
|---|---|---|
| अमेरिका | : | १९२० |
| युनायटेड किंग्डम | : | १९२८ |
| फ्रान्स | : | १९४५ |
| जपान | : | १९४५ |
| इस्राएल | : | १९४८ |
| भारत | : | १९५० |
| स्वित्झर्लंड | : | १९७१ |

**शोधा पाहू!**

तुमच्या मतदारसंघातील खासदार व आमदारांची नावे लिहून, ते कोणत्या राजकीय पक्षाचे आहेत ते लिहा.

राजकीय पक्ष हा राजकीय प्रतिनिधित्वाचे महत्त्वाचे आणि प्राथमिक माध्यम आहे, पण राजकीय पक्ष म्हणजे काय? समविचारी लोकांचा संघटित गट म्हणजे राजकीय पक्ष होय. आपल्या राजकीय विचार व योजनांची अंमलबजावणी व्हावी यासाठी त्यांना राजकीय सत्ता हवी असते.

लोकशाहीत राजकीय पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करतात. विविध पक्षांचे सदस्य त्यांच्या पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवतात. राजकीय पक्षाच्या विचारांना एकत्रितपणे त्या पक्षाची विचारसरणी असे म्हणतात. निवडणुकीच्या काळात राजकीय पक्ष त्यांच्या विचारसरणीनुसार



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

विविध कार्यक्रम मतदारांसमोर मांडतात आणि सत्तेवर आल्यास ते कार्यक्रम राबवण्याचे वचन देतात. ज्या पक्षाचे कार्यक्रम मतदारांना योग्य वाटतात त्या पक्षाच्या उमेदवाराला लोक मतदान करतात. अशा प्रकारे राजकीय पक्षाच्या माध्यमातून मतदारांच्या इच्छा व आकांक्षांचे प्रतिनिधित्व निर्णय प्रक्रियेत केले जाते.

निर्णय हे विविध स्तरांवर घेतले जात असतात. भारतासारख्या संघराज्य व्यवस्थेत निर्णय हे केंद्र व राज्य अशा दोन्ही स्तरांवर घेतले जातात. भारतात ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांसारख्या स्थानिक शासन संस्थांनाही संविधानिक दर्जा देण्यात आला आहे. त्यांना देण्यात आलेल्या जबाबदाऱ्या व अधिकार संविधानात नमूद केले आहेत. याचाच अर्थ निर्णय हे स्थानिक स्तरावरही घेतले जातात. या तीनही स्तरांवर प्रतिनिधी सभांच्या निवडणुकाही होतात आणि राजकीय पक्ष या निवडणुका लढवतात. म्हणूनच या तिन्ही स्तरांवर प्रतिनिधित्वाची माध्यमे म्हणून राजकीय पक्ष काम करतात.

### राजकीय पक्षांचे वर्गीकरण

भारतात राजकीय पक्षांचे वर्गीकरण राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्ष असे केले जाते. राष्ट्रीय आणि प्रादेशिक राजकीय पक्षांचे निकष निवडणूक आयोग ठरवतो.

### राजकीय पक्षांचा उगम

राजकीय पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवण्यासाठी निवडणूक आयोगाने खालील निकष ठरवले आहेत :

(i) त्या पक्षाला लोकसभा किंवा विधानसभेच्या निवडणुकीत चार किंवा जास्त राज्यात ६% पेक्षा जास्त मते मिळाली पाहिजेत.

(ii) कोणत्याही एका किंवा विविध राज्यांतून मिळून त्यांना लोकसभेमध्ये किमान ४ जागा मिळाल्या पाहिजेत.

किंवा

लोकसभेत किमात ३ राज्यांतून २% जागा म्हणजे (५४३ जागांपैकी किमान ११ जागा) मिळाल्या पाहिजेत.

**भारतातील राष्ट्रीय पक्ष**

- भारतीय राष्ट्रीय काँग्रेस
- भारतीय कम्युनिस्ट पक्ष
- भारतीय जनता पक्ष
- भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)
- बहुजन समाज पक्ष
- राष्ट्रवादी काँग्रेस
- तृणमूल काँग्रेस

(निवडणूक आयोग : नं.56/2018/PPS-III दिनांक : १३ एप्रिल २०१८)

**शोधा पाहू !**

महाराष्ट्रातील चार व इतर राज्यांतील सहा प्रादेशिक पक्षांची नावे लिहा.

राजकीय पक्ष कसे अस्तित्वात आले हे जाणून घेणे कुतूहलाचे आहे. प्रतिनिधी सभेच्या स्थापनेनंतर राजकीय पक्ष उदयास आले. या प्रतिनिधी सभांना देशाच्या निर्णय प्रक्रियेत महत्त्व होते. प्रतिनिधी



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सभेतील समविचारी सदस्यांचे गट तयार झाले व ते एकत्र येऊन धोरणांवर प्रभाव टाकू लागले. या गटांना राजकीय पक्ष असे म्हटले गेले.

प्रतिनिधी सभांच्या हातात सत्ता आल्यानंतर ज्यांना या प्रतिनिधी सभेत बहुमत असेल तेच कार्यकारी प्रमुख होणार हे निश्चित झाले. यातूनच संघटित गटांची गरज जाणवली. कारण या संघटित गटांमुळेच प्रतिनिधी सभेत मर्यादित काळासाठी बहुमत टिकवून ठेवणे व राज्याला स्थैर्य देणे शक्य झाले. ही प्रक्रिया युनायटेड किंग्डम आणि इतर अनेक देशांत १८व्या शतकात घडली. जसजसा मताधिकार अधिकाधिक लोकांना मिळाला तसतसे राजकीय पक्षांनी आपले सदस्य वाढवले व संघटना अधिक सुव्यवस्थित केली.

भारतात ब्रिटिश सत्तेविरुद्ध लढत असताना राजकीय पक्षांचा उदय झाला. १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस हा राजकीय पक्ष प्रथम अस्तित्वात आला. पुढे स्वातंत्र्य चळवळींनी वेग घेतला आणि मुस्लिम लीग, हिंदू महासभा, युनियनिस्ट पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, स्वतंत्र कामगार पक्ष यांसारख्या इतर अनेक पक्षांची स्थापना झाली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शेतकरी कामगार पक्ष, द्रविड मुनेत्र कळघम, जनसंघ, समाजवादी पक्ष, भारतीय रिपब्लिकन पक्ष, शिवसेना इत्यादी अनेक पक्ष अस्तित्वात आले. समाजातील काही घटकांना ज्या वेळी असे वाटते की अस्तित्वात असलेले राजकीय पक्ष आपल्या आकांक्षा पूर्ण करू शकत नाहीत त्या वेळी नवीन राजकीय पक्ष स्थापन केले जातात. भारतात आणि जगातील इतर देशांत नवीन राजकीय पक्ष असेच तयार झालेले आहेत.

### हितसंबंधी गट आणि दबाव गट

हितसंबंधी गट आणि दबाव गट ही लोकांचे प्रतिनिधित्व करणारी अनौपचारिक माध्यमे आहेत. शासकीय धोरणे आणि लोक यांना प्रभावित करण्यासाठी जेव्हा हितसंबंधी गट संघटित होतात तेव्हा त्यांना दबाव गट असे म्हणतात. हे गट प्रत्यक्ष निवडणूक लढवत नाहीत. त्यामुळे सरकार किंवा विरोधी पक्षात ते सहभागी नसतात. ते बाहेरून शासनावर दबाव टाकून शासकीय धोरणे प्रभावित करतात. अशा दबाव गटांना 'प्रचार गट' (लॉबी) असेही म्हणतात. कामगार संघटना, शेतकरी संघटना, विद्यार्थी संघटना ही दबाव गटांची उदाहरणे आहेत.

दबाव गट हे राजकीय पक्षापेक्षा भिन्न असतात.

(i) राजकीय पक्ष हे शासकीय प्रक्रियेचा एक घटक असतात. ते शासकीय धोरणांवर शासनांतर्गत प्रभाव टाकतात, तर दबाव गट शासनावर बाहेरून प्रभाव टाकतात. ते निवडणुका लढवत नाहीत म्हणून कायदेमंडळात त्यांचे प्रतिनिधी नसतात.

(ii) राजकीय पक्षांचा आवाका विस्तृत असतो. ते राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत लोकांचे प्रतिनिधित्व करतात. याउलट दबाव गटांचे उद्दिष्ट सीमित स्वरूपाचे असते. शासनावर प्रभाव टाकून विशिष्ट गोष्टी साध्य करून घेणे हे त्यांचे ध्येय असते.

दबावगट सामाजिक चळवळीपेक्षा भिन्न असतात. दबाव गटांची संरचना अधिक औपचारिक असते. सामान्यतः सामाजिक चळवळींची औपचारिक संरचना अथवा संघटना नसते. ते एखाद्या विशिष्ट विषयाचा पाठपुरावा करतात. उदा., चिपको आंदोलन. म्हणूनच दबाव गटांना 'संघटित हितसंबंधाचे प्रतिनिधी' असेही म्हणतात.

**भारतातील काही हितसंबंधी गट/दबाव गट :**

**(i) व्यावसायिक क्षेत्र :** फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (FICCI), कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) इत्यादी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**(ii) कामगार संघटना :** भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना (INTUC), ऑल इंडिया ट्रेंड युनियन काँग्रेस (AITUC), भारतीय मजदूर संघ (BMS), हिंद मजदूर संघ (HMS) इत्यादी.

**(iii) शेतकरी संघटना :** अखिल भारतीय किसान सभा, भारतीय किसान युनियन, शेतकरी संघटना इत्यादी.

**(iv) विद्यार्थी संघटना :** नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (NSUI), अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP), ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन (AISF), स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) इत्यादी.

**अमेरिकेतील काही दबाव गट :**

अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स, अमेरिकन सिव्हिल लिबर्टी युनियन, नॅशनल ऑर्गनायझेशन फॉर वुमेन, अमेरिकन मेडिकल असोसिएशन, अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर अँड काँग्रेस ऑफ इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन (AFL-CIO), नॅशनल असोसिएशन फॉर अ‍ॅडव्हान्समेंट ऑफ कलर्ड पिपल.

### अशासकीय संस्था (NGOs)

अशासकीय संस्था या प्रतिनिधित्वाचे आणखी एक माध्यम आहेत. या संस्था सामान्यतः खासगी व बिगरव्यापारी स्वरूपाच्या असतात. त्या अहिंसक मार्गाने उद्दिष्टपूर्ती करतात. विशिष्ट उद्दिष्ट रक्षणाकरिता त्यांचे कार्य चालते. त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती त्यांच्याशी जोडलेल्या असतात.

वर उल्लेख केलेली सर्व माध्यमे लोकांच्या आकांक्षांचे प्रतिनिधित्व करतात.

**शोधा पाहू !**

तुमच्या परिसरातील सामाजिक विकास, महिला, मुले अथवा पर्यावरण क्षेत्रांत कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांची नावे व त्यांच्या कार्याविषयी माहिती मिळवा व लिहा.

या पाठात लोकांचे प्रतिनिधित्व विविध माध्यमांतून कसे केले जाते ते आपण पाहिले. लोकशाहीच्या यशात या प्रतिनिधित्वाला महत्त्व असते. पुढील पाठात न्यायमंडळ या शासनाच्या आणखी एका महत्त्वाच्या भागाचा अभ्यास करणार आहोत.

**Please see the following websites for further information:**

**Representation**

Edmund Burke, Speech to the Electors of Bristol
Representation Vol. 1, Page 391, 3 Nov. 1774 *Works 1:446--48*
http://press-pubs.uchicago.edu/founders/print_documents/v1ch13s7.html



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. प्राचीन ग्रीसमध्ये ......... होती.
(हुकूमशाही, प्रत्यक्ष लोकशाही, अप्रत्यक्ष लोकशाही, राजेशाही)

२. जगातील सर्वांत प्राचीन प्रतिनिधिक सभा ......... आहे.
(हाऊस ऑफ कॉमन्स, हाऊस ऑफ लॉर्ड, सिनेट, हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह)


**(ब) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

राज्यकारभार चालवण्यासाठी लोक काही जणांची निवड करतात ती पद्धत म्हणजे.....

**(क) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

भारतीय राष्ट्रीय कामगार संघटना, अखिल भारतीय किसान सभा, नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया, इंडियन नॅशनल काँग्रेस

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

शासकीय आणि बिगरशासकीय संघटना

**प्र.४ आपले मत नोंदवा.**

दबाव गट हे राजकीय पक्षांपेक्षा भिन्न आहेत.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

प्रतिनिधित्वाचा अर्थ सांगून प्रतिनिधित्वाच्या पद्धती स्पष्ट करा.

(अ) प्रतिनिधित्वाचा अर्थ
(ब) निवडणूक
(क) नेमणूक
(ड) बिगर शासकीय

**प्र.६ मतदारांना मतदानासाठी कशा प्रकारे प्रोत्साहित करता येईल, यासाठी उपाय सुचवा.**

**प्र.७ दिलेल्या चित्राचे निरीक्षण करून त्याविषयी थोडक्यात लिहा.**



**उपक्रम**

भारतातील कोणत्याही एका राष्ट्रीय पक्षाचा इतिहास लिहा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ६. न्यायमंडळाची भूमिका

या पाठात आपण न्यायमंडळाची संरचना व कार्ये अभ्यासणार आहोत. लोकशाहीत संसदीय अथवा अध्यक्षीय, प्रजासत्ताक अथवा संविधानिक राजेशाहीत, न्यायमंडळ ही शासनाच्या इतर दोन विभागांपासून स्वतंत्र असते व त्यासाठी संविधानिक व कायदेशीर तरतुदी केलेल्या असतात. न्यायमंडळातील न्यायाधीश न्यायालयाचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी सतर्क असतात; परंतु याचा अर्थ न्यायमंडळावर नियंत्रण नसते असा नाही. न्यायमंडळाने त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन करू नये यासाठीही संविधानात व कायद्यात तरतुदी केलेल्या असतात.

## न्यायमंडळाचे स्वातंत्र्य

न्यायमंडळाला कोणते अधिकार दिले आहेत? न्यायमंडळाचे स्वातंत्र्य महत्त्वाचे का आहे? न्यायमंडळाचे प्राथमिक कार्य हे अभिनिर्णय (adjudication) हे आहे. न्यायमंडळ वाद मिटवण्यासाठी कायद्यानुसार निर्णय घेते व त्या निर्णयाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आदेश देते. अनेकदा या वादांमध्ये कार्यकारी मंडळ फिर्यादी अथवा प्रतिवादी असते. शासनाचे अधिकार विचारात घेता, नागरिक व शासन यांच्यातील वाद हा असमान पक्षातील वाद असतो. शासन त्यांच्याकडील अधिकाराचा वापर त्यांना अनुकूल निर्णय मिळवण्यासाठी करू शकते. या ठिकाणी न्यायमंडळाच्या स्वातंत्र्याला महत्त्व येते. स्वतंत्र न्यायमंडळ त्यांच्या समोरील प्रत्येकाला समान वागणूक देते व कायद्यानुसार न्याय करते.

न्यायमंडळाचे स्वातंत्र्य ही एक आधुनिक संकल्पना आहे. राजेशाहीमध्ये न्यायमंडळाने राजाच्या आज्ञेनुसार कार्य करावे अशी राजाची इच्छा असे. लोकशाही जशी अधिकाधिक दृढ होत गेली तसे न्यायमंडळाचे कार्यकारी मंडळ व कायदे मंडळापासून स्वातंत्र्य ही कल्पनाही बळकट होत गेली.

न्यायमंडळाच्या स्वातंत्र्यासाठी संविधानात स्पष्ट तरतूद करणारा पहिला देश म्हणजे अमेरिका. अमेरिकेत सर्वोच्च न्यायालय व इतर कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक अध्यक्ष करतात, परंतु या नेमणुकांना सिनेटची मंजुरी आवश्यक असते. न्यायाधीश तहहयात पदावर राहतात. त्यांच्या इच्छेनुसार ते पदत्याग करू शकतात. न्यायाधीशांनी संविधानाचे अथवा कायद्याचे उल्लंघन केल्यास त्यांना पदच्युत करता येते. या प्रक्रियेला 'महाभियोग' (Impeachment) असे म्हणतात. न्यायाधीशांच्या पदच्युतीच्या प्रस्तावाला काँग्रेसची मान्यता आवश्यक असते.

भारतीय संविधानानेही न्यायमंडळाला स्वातंत्र्य दिले आहे. न्यायाधीशांनी कायद्याचे उल्लंघन केले आहे हे सिद्ध झाल्याखेरीज त्यांना पदच्युत करता येत नाही. न्यायाधीशांच्या पदच्युतीच्या प्रस्तावावर संसदेने मान्यता दिल्याखेरीज कार्यवाही करता येत नाही.



## भारतातील न्यायव्यवस्था

न्यायमंडळाची संरचना संविधानात नमूद केली आहे. सर्वोच्च न्यायालय हे भारतातील सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे व सरन्यायाधीश हे त्याचे प्रमुख आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या खालोखाल उच्च न्यायालये असतात. मुख्य न्यायाधीश त्याचे प्रमुख असतात. सामान्यतः प्रत्येक राज्याला स्वतंत्र उच्च



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

न्यायालय असते, परंतु काही ठिकाणी दोन-तीन राज्यांना मिळून एक उच्च न्यायालय आहे. या न्यायालयांना व न्यायाधीशांना संविधानिक संरक्षण असते. उच्च न्यायालयाच्या खाली प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हा न्यायालय असते. सर्वांत निम्न स्तरावर दुय्यम गुन्ह्यांशी संबंधित न्यायालये असतात. ज्या नागरिकांना या न्यायालयाचे निर्णय मान्य नसतात ते वरिष्ठ न्यायालयात पुनर्विचारासाठी अपील करू शकतात. उच्च न्यायालय इतर सर्व कनिष्ठ न्यायालयांवर नियंत्रण ठेवते. महानगरांमध्ये कौटुंबिक विवादांसाठी स्वतंत्र कुटुंब न्यायालये असतात.



सर्वोच्च न्यायालय
(फक्त एक)



उच्च न्यायालय
(प्रत्येक राज्यासाठी एक)



जिल्हा न्यायालय
(प्रत्येक जिल्ह्यासाठी एक)

सर्वोच्च व उच्च न्यायालयांतील न्यायाधीशांच्या नेमणुकांची प्रक्रिया संविधानात नमूद केली आहे. त्यांची नियुक्ती सरन्यायाधीशांच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती करतात. उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नियुक्तीवेळी त्या राज्याच्या राज्यपालांचा सल्लाही घेतला जातो. १९९० च्या दशकापर्यंत न्यायाधीशांच्या नेमणुका, सरकारच्या व सरन्यायाधीशांच्या सल्ल्याने, राष्ट्रपती करत असत. १९९० च्या दशकात सर्वोच्च न्यायालयाने या तरतुदीचा अर्थ लावताना असे म्हटले, की न्यायाधीशांच्या नियुक्त्यांमध्ये न्यायमंडळाची भूमिकाही महत्त्वाची असली पाहिजे. या निर्णयानुसार सर्वोच्च न्यायालयाने सरन्यायाधीश व इतर चार ज्येष्ठतम न्यायाधीशांचे एक मंडळ (collegium) स्थापन केले. हे मंडळ सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची नावे राष्ट्रपतींना सुचवतात. या प्रक्रियेमुळे न्यायाधीशांच्या नियुक्ती प्रक्रियेतील शासनाचा सहभाग कमी झाला.

वर उल्लेख केलेल्या न्यायालयांखेरीज काही विशिष्ट स्वरूपाचे वाद मिटवण्यासाठी केंद्र व राज्यशासन लवादांची नियुक्ती करतात. उदा., सशस्त्र सेना ट्रायब्युनल, आयकर अपील ट्रायब्युनल, राष्ट्रीय हरित लवाद इत्यादी. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या काही लवादांची उदा., महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, महाराष्ट्र महसूल लवाद इत्यादी. या लवादांना न्यायसदृश म्हणतात व त्यांच्या संचलनासाठी वेगळा कायदा आहे. या लवादांमध्ये निवृत्त न्यायाधीश व त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींची नियुक्ती केली जाते. उदा., सशस्त्र सेना ट्रायब्युनलमध्ये सशस्त्र सेना दलातील निवृत्त अधिकाऱ्यांचा तज्ज्ञ म्हणून समावेश केलेला असतो. हे सर्व लवाद, इतर न्यायालयांप्रमाणेच सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराखाली असतात.

### न्यायमंडळ व त्यांची कार्ये

लोकांमधील वाद मिटवणे हे न्यायमंडळाचे प्राथमिक कर्तव्य आहे. मग कोणत्याही प्रकारचे वाद न्यायालयात सोडवले जातात का? न्यायालये काय करतात? त्यांची कार्ये कोणती?

(i) प्रत्येक न्यायालय विशिष्ट क्षेत्राशी निगडित खटल्यांची सुनावणी करतात व ते सोडवतात. याला न्यायालयाचे अधिकारक्षेत्र असे म्हणतात. हे अधिकारक्षेत्र दोन प्रकारचे असते.

(अ) *मूळ अधिकारिता* : काही विशिष्ट बाबींशी निगडित खटले/दावे हे विशिष्ट न्यायालयातच प्रथम दाखल केले जातात. त्यालाच त्या न्यायालयाची मूळ अधिकारिता असे म्हणतात. उदा., सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

अधिकारक्षेत्रात, दोन घटक राज्यांतील विवाद, भारत सरकार विरुद्ध घटकराज्यातील वाद, राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीशी संबंधित विवाद येतात. या विवादांशी निगडित खटले फक्त सर्वोच्च न्यायालयातच दाखल होऊ शकतात. म्हणूनच याला सर्वोच्च न्यायालयाची मूळ अधिकारिता असे म्हणतात आणि असे अधिकार इतर कोणत्याही न्यायालयाला नाहीत.

(ब) *अपील अधिकारिता* : काही निवाड्यांविरोधातील अपील काही विशिष्ट न्यायालयातच दाखल केले जाते. त्यालाच त्या न्यायालयाचे अपील अधिकारिता असे म्हणतात. उदा., उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. यामध्ये अनेक विषयांसंबंधीचे अपील समाविष्ट आहेत. जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाविरुद्धचे अपील उच्च न्यायालयात केले जाते.

(ii) सर्वोच्च न्यायालयाला सल्लादायी अधिकारिता (Advisory jurisdiction) आहे. भारताच्या राष्ट्रपतींनी ज्याबाबत सल्ला मागितला असेल त्याबाबत सर्वोच्च न्यायालय सल्ला देते.

(iii) सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय इतर अनेक कार्ये करतात. त्यांतील एक महत्वाचे म्हणजे संविधानाचा व इतर कायद्यांचा अर्थ लावण्याचे कार्य. सर्व खटल्यांमध्ये न्यायालय हे पडताळून पाहते, की संबंधितांनी केलेली कृती ही संविधान अथवा कायद्यानुसार आहे किंवा नाही. या संदर्भात न्यायालय संविधानाचा अर्थ लावते. उदा., सर्वोच्च न्यायालयाने 'जगण्याचा अधिकार' म्हणजे केवळ जिवंत असणे असा नाही तर 'प्रदूषणमुक्त पर्यावरणात जगण्याचा अधिकार' असा लावला.

(iv) सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय आणखी एक महत्त्वाचे कार्य करतात. ते म्हणजे संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण. व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्यासाठी हे हक्क आवश्यक असतात. म्हणून त्यांना मूलभूत हक्क असे म्हणतात. संसदेने केलेल्या कायद्यानेही काही अधिकार भारतीय नागरिकांना दिले आहेत. त्या अधिकारांना 'कायदेशीर हक्क' असे म्हणतात.

भारतीय संविधानाने सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांना मूलभूत हक्क व कायदेशीर हक्कांच्या संरक्षणासाठी विशेष आदेश म्हणजेच 'रिटस्' (writs) जारी करण्याचा अधिकार दिला आहे. नागरिकांनी त्यांच्या हक्कांचे उल्लंघन झाल्याची तक्रार केल्यास असा आदेश दिला जातो. भारतीय संविधानात देहोपस्थिती, परमादेश, प्रतिषेध, अधिकारपृच्छा आणि प्राकर्षण हे पाच रिटस् दिले आहेत.

**भारतीय संविधानातील रिट्स (कलम 32(2))**

(१) देहोपस्थिती (Habeas Corpus) : यान्वये एखाद्या व्यक्तीची अटक ही कायदेशीर आहे की नाही ते तपासण्यासाठी न्यायालय शासकीय अधिकाऱ्यांना अथवा इतर व्यक्तींना अटक केलेल्या व्यक्तीस, न्यायालयात हजर करण्याचा आदेश देतात.

(२) परमादेश (Mandamus) : यानुसार न्यायालय शासकीय अधिकाऱ्यास अथवा शासकीय विभागास त्यांचे काम करण्याचा आदेश देतात.

(३) प्रतिषेध (Prohibition) : कनिष्ठ न्यायालयाकडून त्याच्या अधिकारक्षेत्राचे उल्लंघन



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

झाल्यास वरिष्ठ न्यायालय त्यांना तो खटला चालवण्यास मज्जाव करण्याचा आदेश देतात.

(४) अधिकारपृच्छा (Quo-warranto) : या आदेशाद्वारे सदर अधिकारपदावर राहण्याचा आपणांस अधिकार आहे का हा प्रश्न न्यायालय विचारते.

(५) प्राकर्षण (Certiorari) : या आदेशान्वये वरिष्ठ न्यायालय एखाद्या खटल्यासंबंधीची कागदपत्रे कनिष्ठ न्यायालकडून स्वतःकडे मागवू शकतात.

**न्यायालयीन सक्रियता (Judicial Activism) :** सामान्यतः न्यायालयात येणारे खटले हे बाधित व्यक्तींनी स्वतः केलेल्या तक्रारीच्या किंवा याचिकेच्या रूपात दाखल होतात, परंतु गेल्या काही दशकांत परिस्थिती बदलली आहे. भारतीय न्यायमंडळाने त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढवली आहे. उदा., सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयात कोणत्याही व्यक्तीला याचिका दाखल करण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे. त्या विषयाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निगडित नसलेली व्यक्ती ही याचिका दाखल करू शकते. अशा याचिकांना 'जनहित याचिका' म्हणतात. काही वेळा न्यायालयाने कोणतीही तक्रार अथवा याचिका दाखल नसताना स्वतः सार्वजनिक विषयाची दखल घेत दावा दाखल केला आहे.

**शोधा पाहू !**

जनहित याचिकेद्वारे दाखल केलेल्या काही याचिकांची उदाहरणे तुम्ही शोधा. यांतील एखाद्या याचिकेची वर्गात चर्चा करा.

न्यायालयाने घेतलेल्या या पुढाकाराला 'न्यायालयीन सक्रियता' असे म्हणतात. कार्यकारी मंडळ त्यांच्या अधिकाराचा वापर कसा करत आहे याकडे पूर्वी न्यायमंडळ विशिष्ट मर्यादेपलीकडे लक्ष देत नसे. उदा., एखाद्या राज्यात राष्ट्रपती राजवट घोषित केली, राज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून कोणाची नियुक्ती केली तर यांसारख्या गोष्टींमध्ये न्यायमंडळ हस्तक्षेप करत नसे, परंतु गेल्या काही वर्षांत न्यायालयीन सक्रियतेमुळे कार्यकारी मंडळाने घेतलेल्या अनेक निर्णयांचा कायदेशीरपणा न्यायमंडळ तपासत आहे. अनेक वेळा कार्यकारी मंडळाने निर्धारित कालावधीत कोणती आणि कशी कार्यवाही करावी यासाठीही न्यायालयाने निर्देश दिले आहेत.

न्यायालयीन सक्रियतेवर बरीच चर्चा झाली आहे. काही जणांच्या मते, कार्यकारी मंडळ त्यांची कामे यथायोग्य पद्धतीने करत नसल्यामुळे न्यायमंडळाला हस्तक्षेप करणे भाग पडते; तर काही जणांच्या मते, न्यायमंडळ त्यांच्या अधिकारांची सीमा पार करून कार्यकारी मंडळाच्या अधिकारक्षेत्रात हस्तक्षेप करत आहे.

**खालील उदाहरणांची चर्चा करा. ही न्यायालयीन सक्रियतेची उदाहरणे आहेत का?**

१. भारतीय क्रिकेट नियामक मंडळात सुधारणा : भारतीय क्रिकेटमधील भ्रष्टाचार, मॅच फिक्सींग व घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने लोढा समितीची स्थापना केली आणि त्या माध्यमातून क्रिकेट नियामक मंडळाचा कारभार सुधारण्याचा प्रयत्न केला.

२. सिनेमागृहामध्ये राष्ट्रगीत : २०१६ साली सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात म्हटले आहे, की : (i) भारतातील सर्व सिनेमागृहांमध्ये चित्रपट सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत वाजवले जावे व (ii) सिनेमागृहातील उपस्थित सर्वांनी उभे राहून राष्ट्रगीताला मानवंदना द्यावी.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

### न्यायालयीन पुनर्विलोकन

लिखित संविधान हा देशातील सर्वोच्च कायदा असतो. संसदेने तयार केलेल्या कायद्याचा दर्जा हा दुय्यम असतो. संसदेचे कायदे हे संविधानानुरूप असले पाहिजेत, परंतु ते जर संविधानानुरूप नसतील तर काय होईल? कायदे संविधानाशी सुसंगत नसतील तर संविधानातील तरतुदी आणि मूल्ये निरर्थक ठरतील. म्हणूनच संसदेचे कायदे हे संविधानानुसार आहेत की नाहीत हे तपासण्यासाठी एखादी संस्था असणे गरजेचे आहे. संविधानानुरूप नसलेले कायदे अवैध घोषित करून त्यांच्या कार्यवाहीस मनाई करण्याचा अधिकारही या संस्थेस असला पाहिजे. तरच संविधानाचे उल्लंघन करणारे कायदे संसद तयार करणार नाही. लिखित संविधान असलेल्या लोकशाही देशात हा अधिकार न्यायमंडळाला दिलेला आहे. न्यायालयीन पुनर्विलोकन म्हणजे संसदेने बनवलेला कायदा संविधानाशी सुसंगत आहे की नाही ते तपासून पाहणे आणि संविधानाशी सुसंगत नसलेला कायदा घटनाबाह्य घोषित करण्याचा न्यायमंडळाला असलेला अधिकार होय.

न्यायमंडळाला हा अधिकार का आहे? कायदा करण्याच्या प्रक्रियेत कार्यकारी मंडळ व संसद या दोन्हींचा सहभाग असतो. त्यामुळे कायद्याची तपासणी करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळ वा संसदेस देणे योग्य ठरणार नाही. या बाबतीत त्यांचे पूर्वग्रह असू शकतात. न्यायमंडळ कायदा करण्याच्या प्रक्रियेत सहभागी नसते, ते स्वतंत्र असते म्हणूनच हा अधिकार न्यायमंडळाला देण्यात आला आहे.

न्यायालयीन पुनर्विलोकनाची सुरुवात १८०३ मध्ये अमेरिकेत, मारबरी विरुद्ध मॅडीसन या खटल्यात झाली. या खटल्यात अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने प्रथमच काँग्रेसने केलेला कायदा घटनाबाह्य म्हणून घोषित केला. खरे पाहता, अमेरिकन संविधानात न्यायालयीन पुनर्विलोकनाच्या अधिकाराचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. परंतु तो सूचित (implied)



अमेरिकेचे सर्वोच्च न्यायालय

केलेला आहे. अमेरिकेत सर्वोच्च न्यायालयाच्या या पुनर्विलोकनाच्या अधिकाराला आजपर्यंत कोणीही आव्हान दिलेले नाही. कारण संविधानाचे श्रेष्ठत्व अबाधित राखण्यासाठी असा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला असणे गरजेचे आहे.

**मारबरी विरुद्ध मॅडीसन :** विल्यम मारबरी या अमेरिकन उद्योजकाची नियुक्ती अध्यक्ष जॉन ॲडम यांनी न्यायव्यवस्थेत केली. नंतर झालेल्या निवडणुकीत अध्यक्ष ॲडम पराभूत झाले. त्यानंतर सत्तेवर आलेल्या थॉमस जेफरसन या नवीन अध्यक्षांनी, नियुक्त्यांची कामे पाहणाऱ्या त्यांच्या मॅडीसन या मंत्र्याला मारबरी यांची नियुक्ती न करण्याचे आदेश दिले. मारबरी यांनी मॅडीसन यांच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला. मारबरी यांना नियुक्ती पत्र देण्याचे आदेश शासनाला द्यावेत अशी विनंती मारबरी यांनी न्यायालयाला केली. त्या वेळी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश असलेल्या जॉन मार्शल यांनी मारबरी यांची नियुक्ती कायदेशीर असल्याचे सांगून त्यांना नियुक्तीपत्र देण्याचा आदेश दिला. त्याचबरोबर ज्या कायद्याच्या आधारे मारबरी कनिष्ठ न्यायालयात न जाता थेट सर्वोच्च न्यायालयात गेले तो कायदाच न्यायालयाने घटनाबाह्य ठरवला.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

ज्या देशात अलिखित संविधान आहे, उदा., युनायटेड किंग्डम, त्या देशात न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार न्यायमंडळाला नसतो. कारण त्या देशात एकच कायदा सर्वोच्च नसतो म्हणून संसदेचे कायदे सर्वोच्च कायद्याशी सुसंगत आहेत की नाहीत ते तपासणे शक्य नसते.

भारतीय संविधानातही न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार स्पष्टपणे नमूद केलेला नाही, परंतु अमेरिकेप्रमाणेच हा अधिकार सूचित केलेला आहे. सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांमध्ये संसदेचे कायदे संविधानाशी सुसंगत नाहीत असे ठरवून त्यांना घटनाबाह्य घोषित केले आहे.

भारतीय संविधानासंदर्भात संविधान दुरुस्त्या या घटनाबाह्य ठरवता येतात का हा महत्त्वाचा मुद्दा आहे आणि हा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने केशवानंद भारती खटल्यातील निकालाने स्प्ष्ट केला आहे. या निकालात न्यायालयाने भारतीय संविधानाला 'मूळ संरचना' असल्याचे स्पष्ट केले. तसेच संसदेने केलेल्या संविधान दुरुस्त्या या मूळ संरचनेशी सुसंगत असल्या पाहिजेत व जर त्या संविधानानुरूप नसतील तर सर्वोच्च न्यायालय त्यांना घटनाबाह्य घोषित करू शकते. संविधान दुरुस्त्यांना घटनाबाह्य ठरवण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार आता सर्वमान्य झाला आहे.

**केशवानंद भारती खटला (१९७३) :** केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार खटल्यात (जो मूलभूत अधिकारांचा खटला म्हणून देखील ओळखला जातो.) संविधानाच्या चोविसाव्या घटना दुरुस्तीला आव्हान दिले गेले होते. या घटना दुरुस्तीने संसदेला मूलभूत हक्कांमध्ये संशोधन करण्याचा हक्क दिला गेला होता. संसदेला संविधानाच्या मूलभूत घटकांना तसेच मूलभूत तरतुदींमध्ये संशोधन करण्याचा अधिकार आहे का हे सर्वोच्च न्यायालयाला ठरवायचे होते. सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की संसदेला मूलभूत हक्कांसकट सर्व तरतुदींचे संशोधन करण्याचा अधिकार आहे, परंतु त्याला संविधानाची मूलभूत चौकट बदलता येणार नाही.

नागरिकांच्या दृष्टीने न्यायमंडळ हा शासनाचा सर्वांत महत्त्वाचा विभाग असतो. हा विभाग संविधानाचे व नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करतो. सामान्य माणूस न्याय मिळवण्यासाठी न्यायमंडळावर अवलंबून असतो. न्याय देण्यासाठी न्यायमंडळ सक्षम आहे ही भावनाच नागरिकांना सुरक्षित करते. तत्पर आणि नि:पक्ष न्यायावरच लोककल्याण अवलंबून असते.

**Please see the following websites for further information:**

**(1) Parliament and the Judiciary**

Parliament and the Judiciary: Parliament and the Judiciary (PRS Legislative Research Institute for Policy Research Studies , New Delhi) November 29, 2016

https://www.prsindia.org/sites/default/files/parliament_or_policy_pdfs/Parliament%20and%20Judiciary.pdf

**(2) Public Interest Litigation**

Supreme Court of India

Compilation of Guidelines To Be Followed For Entertaining Letters/Petitions Received In This Court As Public Interest Litigation.

https://www.sci.gov.in/pdf/Guidelines/pilguidelines.pdf



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



# स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. न्यायमंडळाच्या स्वातंत्र्यासाठी संविधानात स्पष्ट तरतूद करणारा पहिला देश म्हणजे ......... . (भारत, अमेरिका, युनायटेड किंग्डम, सोव्हिएट रशिया)

२. न्यायमंडळाचे प्राथमिक कार्य .......... आहे. (कायदा करणे, कार्यवाही करणे, अभिनिर्णय, नेमणुका करणे)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(i) लिखित राज्यघटना – भारत

(ii) न्यायालयीन पुनर्विलोकन – युनायटेड किंग्डम

(iii) स्वतंत्र न्यायमंडळ – अमेरिका


**(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयासंदर्भात दाखल केलेली याचिका–

२. न्यायाधीशांना बडतर्फ करण्याची प्रक्रिया–

३. विशिष्ट बाबींशी निगडित खटले विशिष्ट न्यायालयात दाखल करता येण्याचे अधिकारक्षेत्र–

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. अमेरिकेत न्यायाधीशांच्या नेमणुकीला सिनेटच्या संमतीची गरज नसते.

२. भारतात न्यायमंडळ स्वतंत्र आहे.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. न्यायमंडळ आणि कार्यकारी मंडळ

२. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय.

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

१. न्यायमंडळाची न्यायाधीशांच्या नेमणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका असणे आवश्यक आहे.

२. न्यायालयीन सक्रियता आजच्या काळात महत्त्वाची आहे.

**प्र.६ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

न्यायालयीन पुनर्विलोकन प्रक्रिया स्पष्ट करा.

(i) न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अर्थ

(ii) आवश्यकता

(iii) सुरुवात कधी आणि कोठे झाली?

(iv) भारतीय संदर्भ

**उपक्रम**

भारतातील न्यायालयीन सक्रियतेच्या उदाहरणांची यादी करा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# विभाग ३ : लोकप्रशासन

## प्रस्तावना




राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांची समान ध्येये आहेत. दोन्ही विषयांमध्ये समाजातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक बाबींचा अभ्यास होतो आणि या ज्ञानाचे समाज कल्याणासाठी उपयोजन केले जाते. राज्यशास्त्रात धोरणनिर्मिती केली जाते आणि लोकप्रशासनात धोरणाची अंमलबजावणी होते. केंद्र, घटक राज्ये व स्थानिक शासनसंस्थांच्या कारभारविषयक यंत्रणेस 'लोकप्रशासन' म्हणून ओळखले जाते.

मग लोकप्रशासन म्हणजे काय? लोकप्रशासनाबद्दल दोन दृष्टिकोन आहेत.

(i) एक म्हणजे सामान्य दृष्टिकोन. यामध्ये पुढील बाबींवर भर दिला जातो.

- कार्याचे नियोजन व रूपरेषा तयार करणे.
- निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी संघटनेची रचना करणे.
- कार्ये पूर्ण होण्यासाठी लोकांची नियुक्ती करणे.
- कार्ये योग्यरीत्या पूर्ण होण्यासाठी समन्वय साधणे.
- कार्यासाठी वित्त प्रदान करणे.

(ii) दुसरे म्हणजे विशेष दृष्टिकोन. यामध्ये अनेक विशेष कार्यांचा समावेश आहे. कायदा व



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

सुव्यवस्था राखणे, शिक्षणाची तरतूद करणे, सार्वजनिक आरोग्य राखणे, कृषी क्षेत्राला उत्तेजन, सामाजिक सुरक्षिततेची शाश्वती, इत्यादी. यांतील प्रत्येक कार्य विशेष आहे आणि त्यासाठी विशेष कौशल्याची आवश्यकता असते. उदा., सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी डॉक्टर, तर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची आवश्यकता असते. ही देखील लोकप्रशासनाचीच कार्ये आहेत.

या कार्यांचे प्रशासन (व्यवस्थापन) जेव्हा शासन करते, तेव्हा 'लोकप्रशासन' हा शब्दप्रयोग केला जातो. खासगी संस्था किंवा अशासकीय संघटनांच्या संदर्भात 'खासगी प्रशासन' किंवा 'व्यावसायिक प्रशासन' असे शब्दप्रयोग केले जातात. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी इत्यादी हे भारतातील लोकप्रशासनातील विविध कर्मचारी आहेत.

लोकप्रशासन या अभ्यासशाखेचा उदय अमेरिकेत झाला. वूड्रो विल्सन यांनी लोकप्रशासन विषयाच्या अभ्यासावर प्रथम भर दिला. शासनाने कसे कार्य करायचे आणि देशाचे प्रशासन कसे असावे याबद्दलचे भारतातील संदर्भ प्राचीन काळातही आहेत. उदा., कौटिल्याचे अर्थशास्त्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र तसेच मुघलांचे प्रशासन. ब्रिटिशांनी भारतीय नागरी सेवा सुरू केली व भारतीय प्रशासकीय व्यवस्था स्थापन झाली. स्वतंत्र भारतात भारतीय प्रशासकीय सेवा आणि राज्य प्रशासकीय सेवा आहेत.

आज शासनातील जटिलता वाढली आहे. प्रशासनाच्या सामान्य दृष्टिकोनापलीकडे जाऊन अनेक कार्ये हाती घेतली जातात. शासकीय कार्ये अभ्यासण्याच्या नवीन दृष्टिकोनाला सार्वजनिक धोरण (Public Policy) असे म्हटले जाते. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये लोकप्रशासन आणि सार्वजनिक धोरण यांमध्ये अनेक बदल झाले आहेत. विकासाच्या मुद्द्यावर भर दिला जात आहे. या नवीन दृष्टिकोनाला 'विकास प्रशासन' असे म्हणतात. विकास प्रशासनात देशाच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.

विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी विविध विकासात्मक प्रकल्प, कार्यक्रम व योजना यांवर भर दिलेला दिसून येतो.

या भागातील दोन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

**प्रकरण सात : लोकप्रशासन :** यामध्ये लोकप्रशासन विषयाचा परिचय दिलेला आहे. राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांच्यातील संबंध स्पष्ट केला आहे. लोकप्रशासनाच्या अभ्यासाची व्याप्ती आणि सार्वजनिक धोरण या संकल्पनेची ओळख दिलेली आहे.

**प्रकरण आठ : विकास प्रशासन :** पारंपरिक लोकप्रशासनात नियम, कायदे, पदसोपानरचना याची बांधिलकी दिसून येते. हा दृष्टिकोन चुकीचा नाही, पण कधी कधी यामुळे वेळेचा अपव्यय आणि अडथळे निर्माण होऊ शकतात. याला 'लाल फित' किंवा 'दफ्तर दिरंगाई' असे म्हणतात. सामाजिक बदल घडवण्यासाठी नवकल्पनांची गरज भासते. या दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात. भारतातील विकास प्रशासनाची अंमलबजावणी कशी होते, यावरही या प्रकरणात चर्चा करण्यात आली आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ७. लोकप्रशासन

या प्रकरणात आपण लोकप्रशासनाचा अर्थ, लोकप्रशासनाची उत्पत्ती, त्याची भूमिका, महत्त्व आणि व्याप्ती समजून घेणार आहोत. भारतातील प्रशासकीय व्यवस्थेचा अभ्यासही या प्रकरणात करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरुवात करूया. आपण राज्यशास्त्रात कशाचा अभ्यास करतो? प्रशासन म्हणजे काय? खासगी आणि सार्वजनिक प्रशासनात काय फरक आहे?

राज्यशास्त्रात राज्य आणि शासन यांचा अभ्यास केला जातो. स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणाचा अभ्यास केला जातो. समाज स्वतःचे प्रशासन कसे करते हेही अभ्यासले जाते. लोकप्रशासन हा राज्यशास्त्राचा एक भाग आहे. 'कृतिशील शासन' असे आपण ज्याला म्हणू यावर लोकप्रशासनाचा भर असतो. लोकशाही पद्धतींनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची गरज असते. हे कार्य शासनाचे कार्यकारी मंडळ करते, त्याला लोकप्रशासन असे म्हणतात.

शासनाच्या तीन शाखा आहेत : कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. शासनाच्या कार्यकारी मंडळाचे दोन प्रकार आहेत.

(अ) राजकीय कार्यकारी मंडळ : ज्यामध्ये निर्वाचित मंत्र्याचा समावेश असतो.

(ब) कायमस्वरूपी कार्यकारी मंडळ : नोकरशाही यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) इत्यादींनी आयोजलेल्या स्पर्धा परीक्षांमधून होते.

प्रशासन ही प्रक्रिया रोजच्या जीवनात सर्वत्र आढळते. प्रक्रिया म्हणून प्रशासन सार्वजनिक व खासगी दोन्ही संस्थांमध्ये दिसून येते. 'प्रशासन' या संज्ञेचा अर्थ विविध घडामोडींचे व्यवस्थापन. हे व्यवस्थापन सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रांमध्ये असू शकते. लोकप्रशासन या विषयात शासनाच्या क्रिया व प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.

### लोकप्रशासनाची व्याख्या

शासनाने तयार केलेली उद्‌दिष्टे पूर्ण करण्यासाठी मानवी व भौतिक संसाधनांचे संघटन व व्यवस्थापन म्हणजे लोकप्रशासन.

लोकप्रशासनाच्या काही व्याख्या :

**हर्बर्ट सायमन :** सामान्य मान्यतेनुसार लोकप्रशासन म्हणजे राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शासनांच्या कार्यकारी मंडळाची सर्व कार्ये.

**ड्वाईट वॉल्डो :** लोकप्रशासन म्हणजे राज्याच्या घडामोडींसाठी उपयोजन केलेली व्यवस्थापनाची कला आणि शास्त्र.

**ल्युथर ग्युलिक आणि लिंड्ल उर्विक :** लोकप्रशासन म्हणजे राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शासनांच्या कार्यकारी मंडळाची सर्व कार्ये.

### राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांच्यातील परस्परसंबंध

वरील चर्चेप्रमाणे, सार्वजनिक धोरण आणि कायदे कसे तयार केले जातात याबद्‌दलचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. या विषयात राजकीय पक्ष आणि इतर संघटना, इतर शासकीय संस्था, उदाहरणार्थ, संसद, निवडणूक आयोग इत्यादींचा अभ्यास केला जातो. लोकप्रशासन या सार्वजनिक धोरणांची व कायद्यांची अंमलबजावणी करते.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शासनाला अनेक विशेष कार्ये करावी लागतात. जसे, की कायदा व सुव्यवस्था राखणे, शिक्षणाची तरतूद करणे, सार्वजनिक आरोग्य राखणे, कृषी क्षेत्राला उत्तेजन देणे, सामाजिक सुरक्षितता राखणे, सामाजिक कल्याण, स्वच्छता, दळणवळणाची सुविधा इत्यादी प्रत्येक कार्य हे विशेष आहे. त्यासाठी तज्ज्ञता आवश्यक असते. उदाहरणार्थ, सार्वजनिक आरोग्यासाठी डॉक्टर, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशिक्षित पोलीस. शासन जेव्हा या कार्यांचे प्रशासन स्वतः करते किंवा शासकीय संस्थांमार्फत करते, तेव्हा ही कार्ये लोकप्रशासनाच्या व्याप्तीत समाविष्ट होतात. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी इत्यादी हे सर्व भारतातील लोकप्रशासनाचे घटक आहेत. शासनाच्या विविध योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत ते शासनाला मदत करतात. जेव्हा वरील काही कार्ये (उदा., शिक्षणाची तरतूद किंवा आरोग्य सेवा) ही खासगी संस्था किंवा अशासकीय संस्था या संस्थांकडून पूर्ण केल्या जातात, त्याला खासगी प्रशासन किंवा व्यावसायिक प्रशासन असे म्हणतात.

**सामान्यत: लोकप्रशासनात पुढील बाबींचा समावेश होतो.**

- शासनाची कार्ये : प्रामुख्याने कार्यकारी मंडळाची कार्ये
- सार्वजनिक घडामोडी आणि कार्यांचे व्यवस्थापन
- लोककल्याण आणि सार्वजनिक हित.

### लोकप्रशासनाची व्याप्ती

लोकप्रशासनाची व्याप्ती ही संक्षिप्त आणि व्यापक अशा दोन प्रकारच्या दृष्टिकोनातून बघता येते.

#### (i) संक्षिप्त दृष्टिकोन

या दृष्टिकोनात फक्त शासनाच्या कार्यकारी मंडळाच्या कार्यावर भर दिलेला दिसून येतो. ग्युलिक आणि उर्विक या दोघांनी POSDCORB या प्रसिद्ध संक्षेपामार्फत हा दृष्टिकोन मांडला. या दृष्टिकोनात लोकप्रशासनाच्या व्याप्तीमध्ये पुढील बाबींचा समावेश केलेला आहे.

**P-Planning (नियोजन) :** प्रशासनातील पहिला टप्पा हा नियोजनाचा असतो. ज्यामध्ये व्यापक आराखडा किंवा रूपरेषा तयार केली जाते. ती राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक या तिन्ही स्तरांवर होते उदा., नीती आयोगाने 'बॉटम-अप ॲप्रोच'चा अवलंब केला आहे. ज्यामध्ये स्थानिक पातळीवर नियोजन आधी होते आणि नंतर वरील स्तरांवर नियोजन केले जाते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था :** नीती आयोग ही केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाने १ जानेवारी २०१५ रोजी स्थापन झालेली संस्था आहे. सार्वजनिक धोरणांविषयी मार्गदर्शन करणारी व सल्ला देणारी ही संस्था आहे. भारत सरकारचा 'विचार गट' (Think Tank) असे त्याला समजले जाते. दीर्घकालीन योजना, कार्यक्रम तयार करताना 'नीती आयोग' भारत सरकारला तसेच राज्य सरकारला आवश्यक ती तांत्रिक मदत करते.

**O-Organisation (संघटन) :** नियोजित उद्दिष्टे, ध्येय पूर्ण करण्यासाठी शासकीय संघटना, यंत्रणा तयार केली जाते ज्यामार्फत कार्याचे व्यवस्थापन व समन्वय साधला जातो. उदा., अखिल भारतीय सेवा, केंद्रीय, राज्य व स्थानिक सेवा.

**S-Staffing (कर्मचारी भरती) :** मानवी संसाधन हा प्रशासकीय व्यवस्थेचा कणा असतो. प्रशासकीय यंत्रणेमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कर्मचाऱ्यांची भरती केली जाते व त्यांना प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यांच्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे देखील महत्वाचे आहे. उदा., केंद्रीय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग यांच्यामार्फत केली जाणारी भरती.

**माहीत आहे का तुम्हांला?**

भारतातील केंद्रीय स्तरावरील भरती करणारी संस्था म्हणजे केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC). अखिल भारतीय सेवा आणि गट अ, गट ब केंद्रीय सेवा यासाठीच्या परीक्षा व नियुक्ती यांची जबाबदारी या संस्थेची आहे.


महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (MPSC) ही संस्था निर्माण केली आहे.

**D-Directing (मार्गदर्शन) :** प्रशासन हे एक अविरत कार्य आहे. त्यामुळे निर्णय घेणे आणि त्या निर्णयांना सामान्य व विशिष्ट आज्ञा, निर्देश यांच्याशी जोडणेही आवश्यक आहे.

**CO-Coordination (समन्वय) :** प्रशासन ही एक क्लिष्ट आणि परस्परसंबंधी प्रक्रिया आहे. त्याकरिता संघटनेचे विविध शाखा, विभाग, गट यांच्या कार्यामध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. कामामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी आणि संघर्ष टाळण्यासाठी समन्वयाची मदत होते.

**R-Reporting (अहवाल तयार करणे) :** प्रशासनात सुरू असलेले काम तसेच पूर्ण झालेली कामे याबद्दलचा अहवाल वरिष्ठांसमोर सादर करणे महत्वाचे आहे. त्यामुळे प्रशासनात उत्तरदायित्व आणि जबाबदारीची भावना निर्माण होते.

**B-Budgeting (अंदाजपत्रक) :** प्रत्येक कार्यामध्ये आर्थिक बाब महत्वाची भूमिका बजावते. त्यामुळे लेखापरीक्षण, हिशोब आणि त्यावरील नियंत्रण अंदाजपत्रकामार्फत ठेवले जाते.




**करून पहा.**

तुम्हांला तुमच्या महाविद्यालयात क्रिकेट सामना आयोजित करायचा आहे. विद्यार्थ्यांनी गट तयार करावेत. प्रत्येक गटाने पुढील कार्य करावे.

**गट अ :** कार्यक्रमाचे नियोजन-तारीख ठरवणे, स्थळ निश्चित करणे इत्यादी.

**गट ब :** सामन्यासाठी कोणी कोणती जबाबदारी घ्यायची हे निश्चित करणे. प्रत्येक कार्यासाठी छोट्या समित्या तयार करणे.

**गट क :** महाविद्यालयातील अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे. (शिक्षक, प्राचार्य, इतर कर्मचारी)

**गट ड :** या कार्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करणे.

### (ii) व्यापक दृष्टिकोन

लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात शासनाच्या तिन्ही शाखांच्या कार्यांचा समावेश होतो. फक्त कार्यकारी मंडळाच्या कार्यावर भर देणाऱ्या संक्षिप्त दृष्टिकोनापेक्षा व्यापक दृष्टिकोन वेगळा आहे. लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांचे कार्य व त्यांच्यातील परस्परसंबंध यांचा समावेश केला जातो. सहकारात्मक सांघिक प्रभाव म्हणून याकडे बघितले जाते. यामध्ये धोरण निर्मितीवर लक्ष दिले जाते. त्यामुळे एका व्यापक राजकीय प्रक्रियेचाच तो एक भाग होतो.

व्यापक स्वरूपामध्ये लोकप्रशासन हे खासगी संस्था व व्यक्ती यांच्याशी संवाद व सहयोग करते ज्यामुळे मूलभूत सुविधांचा योग्य पुरवठा करता येईल. यामध्ये शासनाच्या विशेष कार्यांचा समावेश केला जातो. उदा., संरक्षण, वित्त पुरवठा, शिक्षण, आरोग्य सेवा इत्यादी. याचा अर्थ लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात POSDCORB सारख्या प्रशासनाचे तंत्र तसेच इतर मूलभूत बाबींचा विचार केला जातो.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**उद्योगाचे सामाजिक उत्तरदायित्व (Corporate Social Responsibility) :**

कंपन्या आपल्या व्यवसायामध्ये सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणिवा सामावून घेण्याचा प्रयत्न करतात. CSR म्हणजे दानधर्म करणे नव्हे, तर तो समाज सुधारण्याचा एक प्रयत्न आहे. विकसनशील देशांमध्ये प्रदूषण रोखणे, आपत्ती शमन, स्वच्छ पाणी, शैक्षणिक कार्यक्रम इत्यादींचा CSR मध्ये समावेश केला जातो.

### लोकप्रशासनाचा विकास

प्राचीन काळापासून अनेक विचारवंतांनी प्रशासकीय विचार आणि व्यवहारामध्ये आपले योगदान दिले आहे. कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' हे प्राचीन भारतातील प्रशासनाविषयी आहे. ॲरिस्टॉटल यांचे 'पॉलिटिक्स' आणि मॅकियावेली यांचे 'द प्रिन्स' हे देखील प्रशासनासंदर्भातील ग्रंथ आहेत, पण लोकप्रशासनाच्या पद्धतशीर अभ्यासाचे श्रेय अठराव्या शतकातील जर्मनी व ऑस्ट्रिया येथील कॅमेरॅलिझमच्या (cameralism) प्रणालीला दिले जाते. या प्रणालीत शासकीय व्यवहाराच्या पद्धतशीर व्यवस्थापनावर भर दिलेला होता.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**कॅमेरॅलिझम :** सतराव्या व अठराव्या शतकातील 'शास्त्रांच्या' प्रणालीला कॅमेरॅलिझम असे संबोधतात. जर्मनी आणि ऑस्ट्रिया येथील सम्राटांच्या प्रशासकीय यंत्रणा सुधारण्यासाठीचे हे प्रयत्न. यातील महत्त्वाचे संदर्भ आजही लोकप्रशासनासाठी उपयुक्त आहेत.

लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म अमेरिकेत झाला. वूड्रो विल्सन यांनी पहिल्यांदा लोकप्रशासनाच्या अभ्यासाची गरज मांडली. 'लोकप्रशासनाचा अभ्यास' या त्यांच्या १८८७ सालच्या शोधनिबंधाने लोकप्रशासन शास्त्राचा पाया रचला. शासनाची कार्यक्षमता वाढवण्याची गरज आहे असे प्रतिपादन करणारे ते प्रथम राजकीय नेते होते. शासनाचा अविभाज्य भाग, पण सगळ्यांत कमी ज्याची चर्चा होते ते प्रशासन आहे असे त्यांनी मांडले.

आज प्रशासनाची व्याप्ती विस्तारली आहे आणि तुलनात्मक लोकप्रशासन, विकास प्रशासन, नव लोकप्रशासन, नव लोकव्यवस्थापन, सार्वजनिक धोरण आणि सुशासन या क्षेत्रांचा यात समावेश झाला आहे. लोकप्रशासनाच्या व्याप्तीत सार्वजनिक धोरण हे सर्वांत नवे क्षेत्र समाविष्ट झाले आहे. आधुनिक काळात लोकप्रशासन फक्त अंमलबजावणीपर्यंत मर्यादित नसून त्याचा भर धोरण निर्मितीवरही आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**सार्वजनिक धोरण**

वाढता परस्पर संपर्क, तंत्रज्ञानातील शोध, जागतिकीकरण आणि त्यामुळे उद्‌भवणारी आव्हाने यामुळे आज शासनव्यवस्था गुंतागुंतीची झाली आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रामध्ये शासन आज कार्यांच्या सामान्य प्रशासनापलीकडे जाऊन अनेक कार्ये करते. आज शासन प्रामुख्याने जनकल्याणासाठी सार्वजनिक धोरण निर्मिती व अंमलबजावणी यांकडे लक्ष देत आहे. शासनव्यवस्था समजून घेणाऱ्या या नव्या दृष्टिकोनाला सार्वजनिक धोरण असे म्हणतात.

भारतात ग्रामीण क्षेत्रात वीज उपलब्धता ही मोठी समस्या आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये वीजपुरवठा करणे हे सरकारचे कार्य आहे. यासाठी भारत सरकारने 'राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना' तयार केली. भारतात वीज नसलेल्या क्षेत्रांमध्ये वीजपुरवठा करण्यासाठीचे हे सार्वजनिक धोरण आहे. सार्वजनिक धोरणाचे दुसरे उदाहरण म्हणजे 'आयुशमान भारत'. कोणालाही आर्थिक अडचण न होता सर्वांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी हे या योजनेचे उद्‌दिष्ट आहे.

सार्वजनिक धोरण हे तीन टप्प्यांतून समजून घेता येईल.

(i) **धोरणांची निवड :** नागरिकांच्या हितासंबंधीचे विविध प्रश्न असतात. त्या प्रश्नांची प्राधान्यक्रमाने निवड मंत्री, राजकारणी, संसद सदस्य, नोकरशाह किंवा इतर अधिकारी करतात. त्यानंतर हे प्रश्न कसे सोडवायचे याबद्‌दलच्या विविध पर्यायांची चर्चा होते. उदा., शहरात पाणीपुरवठा कसा करायचा किंवा मलेरिया विरोधी कार्यक्रम कसे राबवायचे या चर्चेच्या आधारे एखादी योजना किंवा कार्यक्रम निश्चित केला जातो.

(ii) **धोरणांची निष्पत्ती :** या टप्प्यात प्रत्यक्ष धोरण अंमलबजावणी होते, ज्यामधून धोरणाची निष्पत्ती दिसून येते.

(iii) **धोरणाचा परिणाम :** तिसऱ्या टप्प्यात धोरणाचा परिणाम समजून घेतला जातो. यामध्ये धोरणाचे मूल्यांकन होते. धोरणाची उद्‌दिष्ट्ये आणि धोरणाचे परिणाम तपासले जातात.

खालील उदाहरणातून आपण सार्वजनिक धोरण निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी समजून घेऊ. कचरा व्यवस्थापन आणि कचऱ्याचा विनियोग या क्षेत्रामध्ये तुमच्या भागातील स्थानिक शासनाला समस्या भेडसावतात. स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य यांबद्‌दल गंभीर समस्या आहेत. लोकांचे प्रतिनिधी (महानगरपालिका, ग्रामपंचायत इत्यादी), शासकीय अधिकारी (वॉर्ड अधिकारी) आणि स्थानिक रहिवासी यांच्यात चर्चा होते आणि कचऱ्याच्या विनियोगासंदर्भात सार्वजनिक धोरण निश्चिती होते.

समजा, कचरा निर्मितीच्याच ठिकाणी विभागला गेला आणि तो त्या विभागलेल्या अवस्थेत गोळा करून त्यावर प्रक्रिया करण्याचे ठरवले तर मग या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या पद्‌धतीचे नियोजन करावे लागेल. ही झाली धोरणाची निवड.

दुसरा टप्पा म्हणजे धोरणाची अंमलबजावणी म्हणजेच धोरणाची निष्पत्ती. या निर्णयाच्या अंमलबजावणीत शासकीय तसेच अशासकीय संस्थांचा सहभाग घेता येतो.

तिसरा टप्पा आहे धोरणाचा परिणाम. ज्यामध्ये अपेक्षेप्रमाणे परिणाम झाला का हे तपासले जाते. हा मूल्यांकनाचा टप्पा आहे.

अंमलबजावणीतील समस्या समजून घेऊन पुढील काळात त्या दुरुस्त करता येतात.

**करून पहा.**

तुमच्या परिसरात कचरा व्यवस्थापन कसे होते हे शोधा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**भारतातील प्रशासकीय प्रणाली :** ब्रिटिशांनी आपल्या काळात निर्माण केलेल्या संस्था आणि आराखडा याचा प्रभाव भारताच्या प्रशासनावर दिसतो. ब्रिटिशांच्याही आधी भारतात संरचित प्रशासकीय व्यवस्था अस्तित्वात होती. सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळातील प्रशासनासंबंधी कौटिल्याच्या अर्थशास्त्रात संदर्भ आढळतात. गुप्त राजवंश, मुघल राजघराणे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासकीय प्रणालीतील योगदान महत्त्वाचे आहे. ब्रिटिशांनी केंद्राकर्षित प्रशासकीय व्यवस्था भारतात आणली. याची अंमलबजावणी अनेक महत्त्वाच्या कायद्यातून करण्यात आली आहे. उदा., भारत सरकार कायदा १९०९, भारत सरकार कायदा १९१९ आणि भारत सरकार कायदा १९३५.

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता ही ती मूल्ये आहेत.

भारतातील प्रशासनाची सामान्य रूपरेषा समजून घेऊया.

भारतीय प्रशासन दोन स्तरांवर समजून घ्यायला हवे.

१. भारताची संघराज्य शासनव्यवस्था ज्यामध्ये त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना दिसते – राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तर.

२. शासनाच्या तीन शाखा : कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचा कार्यकारी मंडळात समावेश होतो. हे मंत्री विविध मंत्रालय व विभाग सांभाळतात.

कायदेमंडळाचे (केंद्रात संसद आणि राज्यात विधिमंडळ) कार्य हे कायदे तयार करणे आणि कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे आहे. कायद्यांचा अर्थ लावणे आणि न्यायदान करणे हे न्यायमंडळाचे कार्य आहे.



लाल बहादुर शास्त्री
राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसूरी

स्वातंत्र्यानंतर भारताने आपण राज्यांचा संघ आहोत असे जाहीर करून संघराज्य शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. भारताने संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारताच्या संविधानात दिलेल्या व्यापक मूल्यांवर व उद्दिष्टांवर भारताची प्रशासकीय व्यवस्था अवलंबून आहे. राजकारणी, मंत्री, नोकरशाह आणि प्रशासन प्रक्रियेत सहभागी असलेल्या सगळ्यांना ध्येय, दिशा दाखवण्याचे काम ही मूल्ये करतात.

**भारतातील प्रशासकीय संरचना**

राष्ट्रीय (केंद्र सरकार)
↓
प्रादेशिक/राज्य (राज्य शासन)
↓
स्थानिक शासन
↙ ↘

शहर प्रशासन
↓
महानगरपालिका/ नगरपालिका/नगरपरिषद/ कटक मंडळ

ग्रामीण प्रशासन
↓
जिल्हा : जिल्हा परिषद
↓
ब्लॉक/गट : पंचायत समिती
↓
गाव : ग्रामपंचायत



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



मंत्रालय, मुंबई

## प्रशासन कार्य कसे करते?

(i) राष्ट्रीय पातळीवर केंद्र सरकारची कार्ये ही विविध मंत्रालयांमार्फत (विभाग/खाते) होतात. उदा., कृषी मंत्रालय, आरोग्य, गृह, संरक्षण इत्यादी. मंत्रालयात प्रत्येक खात्यासाठी मंत्री असतात. मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली नोकरशाह किंवा प्रशासकीय यंत्रणा असते. मंत्रालयांव्यतिरिक्त निवडणूक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, मागासवर्गांसाठीचे राष्ट्रीय आयोग, नीती आयोग इत्यादी संस्था आहेत. यासाठीही प्रशासकीय अधिकारी किंवा नोकरशाह यांची आवश्यकता असते.

(ii) राज्य स्तरावर देखील विविध मंत्रालये आणि आयोग शासनाचे काम करतात. केंद्र सरकारप्रमाणेच राज्याचे मंत्रालयही मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली असते आणि या स्तरावर देखील नोकरशाहांची आवश्यकता असते.

(iii) स्थानिक स्तरावर दोन प्रकारचे प्रशासन आहे. शहर आणि ग्रामीण प्रशासन. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी सर्वोच्च पदावर असतात. मोठ्या शहरांमध्ये महापालिका आयुक्त हे महानगरपालिकेचे नेतृत्व करतात. ग्रामीण भागांमध्ये तालुका स्तरावर तहसीलदार हे प्रशासक असतात.

(iv) राजकीय नेतृत्व आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यात जवळचे संबंध आहेत. केंद्र आणि राज्य स्तरावर मंत्रालये व विभाग मंत्र्याच्या नेतृत्वाखाली असतात. स्थानिक स्तरावर देखील राजकीय नेते व प्रशासकीय यंत्रणा यांची जवळीक असते. उदा., ग्रामीण भागात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती किंवा ग्रामपंचायतीचे सरपंच हे प्रशासनाच्या सतत संपर्कात असतात. शहरी भागात महानगरपालिका व नगरपालिकेत निर्वाचित सदस्य प्रशासनाच्या संपर्कात असतात.

(v) प्रशासनातील प्रत्येक स्तरातील अधिकाऱ्यांची भरती ही शासनाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षांमधून होते. केंद्र सरकारच्या पातळीवर केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) आणि कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission) या दोन संस्था परीक्षा आयोजित करतात. राज्य स्तरावर या परीक्षा राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जातात.

(vi) नोकरशाह हे राजकीय तटस्थतेच्या सिद्धान्तांचे पालन करतात. त्यांची बांधिलकी ही संविधानाशी आहे. राजकीय पक्षाशी नाही.

पुढील प्रकरणांमध्ये आपण विकास प्रशासनाबाबत अधिक माहिती घेणार आहोत.

**करून पहा :** तुमच्या घर/शाळा/महाविद्यालयाजवळील कोणत्याही सरकारी कार्यालयाला भेट द्या. जसे, की पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद, महानगरपालिका इत्यादी. तेथे चालणाऱ्या कामाचे निरीक्षण करा. कार्यालयीन कर्मचाऱ्यांशी संवाद साधा. तुम्हांला आलेल्या अनुभवांवर वर्गात चर्चा करा व त्यावर माहिती लिहा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्थानिक प्रशासन व्यवस्था

### जिल्हा प्रशासन (ग्रामीण)

**राजकीय**
- जिल्हा परिषद अध्यक्ष
  - ↓ पंचायत समिती सभापती
    - ↓ ग्रामपंचायत सरपंच

**प्रशासकीय (विकासात्मक)**
- मुख्य कार्यकारी अधिकारी
  - ↓ गट विकास अधिकारी (BDO)
    - ↓ ग्रामसेवक (ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून कार्य)

**प्रशासकीय**
- जिल्हाधिकारी महसूल प्रशासन कायदा व सुव्यवस्था भूधारण
  - ↓ तहसीलदार/तलाठी

**न्यायमंडळ**
- जिल्हा न्यायालय

### जिल्हा प्रशासन (शहरी)

**राजकीय**

**महानगरपालिका**
**महापौर**
(लोकसंख्या ३ लाख ते अधिक)

**नगरपालिका**
(पालिकेचा अध्यक्ष)

**कटक मंडळ**
(प्रशासक म्हणून सेनादलाचा अधिकारी)

**प्रशासकीय**

**महापालिका आयुक्त**

**जिल्हाधिकारी**
महसूल, प्रशासन, कायदा, व सुव्यवस्था, भूधारण

**Please see the following websites for further information:**

**The Study of Administration: Woodrow Wilson**
Source: Political Science Quarterly, Vol. 2, No. 2 (Jun., 1887), pp. 197-222
Published by: The Academy of Political Science
Stable URL: Quarterly.http://www.jstor.org
Volume II. June, 1887. Number2. Political Science Quarterly.
http://www.iupui.edu/~spea1/V502/Orosz/Units/Sections/u1s5/Woodrow_Wilson_Study_of_Administration_1887_jstor.pdf



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. प्रशासकीय व्यवस्थेचा .......... हा कणा असतो.
(भौतिक संसाधन, मानवी संसाधन, नैसर्गिक संसाधन, भौगोलिक संसाधन)

२. POSDCORB हा संक्षेप ग्युलिक आणि .......... यांनी मांडला.
(वूड्रो विल्सन, हर्बट सायमन, उर्विक, ड्वाईट वाल्डो)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(i) कौटिल्य – अर्थशास्त्र
(ii) ॲरिस्टॉटल– द पॉलिटिक्स
(iii) मॅकियाव्हेली – रिपब्लिक

**(क) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. अठराव्या शतकातील जर्मनी व ऑस्ट्रिया येथील शासकीय व्यवहाराच्या पद्धतशीर व्यवस्थापनांची प्रणाली –

२. कंपन्यांनी सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणिवा सामावून घेण्याचा केलेला प्रयत्न –

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. प्रशासनातील पहिला टप्पा हा कर्मचारी भरतीचा असतो.

२. लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म भारतात झाला.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. खासगी प्रशासन व लोकप्रशासन

२. ग्रामीण प्रशासन व शहरी प्रशासन

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**


१. प्रशासनाचे कार्य कसे चालते ते स्पष्ट करा.

२. सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे स्पष्ट करा.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

लोकप्रशासनाची व्याख्या लिहून त्याची पुढील मुद्द्यांच्या आधारे व्याप्ती स्पष्ट करा.
(i) संक्षिप्त दृष्टिकोन (ii) व्यापक दृष्टिकोन

**प्र.६ दिलेल्या चित्राचे निरीक्षण करून त्याविषयी थोडक्यात लिहा.**




**उपक्रम**

भारत सरकारच्या गृहमंत्रालयाचा अलीकडचा वार्षिक अहवाल पहा. त्यातील ठळक कार्यांची नोंद करा.

✲✲✲



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ८. विकास प्रशासन

या प्रकरणात आपण विकास प्रशासनाची चर्चा करणार आहोत. विकास प्रशासनाची उत्पत्ती, अर्थ, व्याप्ती आणि भारतातील विकास प्रशासनाची चर्चा करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरुवात करूया. विकास म्हणजे काय? विकास प्रशासनाची गरज काय आहे? विकास प्रशासनाचा अर्थ आणि महत्त्व काय?

विकास ही एक गुंतागुंतीची संकल्पना आहे. सर्वसामान्य अर्थाने विकास म्हणजे विस्तार, बदल, वाढ किंवा सुधारणा. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाताना झालेली सुधारणा किंवा बदल म्हणजे विकास. हा बदल, ही सुधारणा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये दिसून येते. सामान्य लोक आपले आयुष्य अधिक चांगल्या प्रकारे जगू शकतील याच्याशी निगडित ही सुधारणा आहे. आधीच्या प्रकरणात आपण लोकप्रशासनाचा अभ्यास केला जे कृतिशील सरकारशी निगडित आहे. लोकप्रशासनात कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ या सरकारच्या तिन्ही शाखांच्या कार्यांवर आपण लक्ष केंद्रित केले. जेव्हा लोकप्रशासन विस्तार किंवा विकासासाठी कृतिशील सरकारचा अभ्यास करते तेव्हा ते विकास प्रशासन बनते.

## उत्पत्ती आणि अर्थ

तुम्ही कल्याणकारी राज्य या संकल्पनेविषयी वाचले असेल. एखादे राज्य जेव्हा नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक हिताचा पुरस्कार करण्यासाठी पुढाकार घेते, त्या राज्याला 'कल्याणकारी राज्य' असे म्हणतात. असे राज्य नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देते. उदा., अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला विकासाच्या संकल्पनेत कल्याणकारी राज्याला महत्त्व दिले गेले. याचा परिणाम पारंपरिक लोकप्रशासनावर झाला. शासनाच्या नियमित कार्यांपलीकडे जाऊन आता एकत्रित, संघटित आणि संचलित शासकीय कृतींतून बदल घडवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका या खंडांतील अनेक देश स्वतंत्र झाले. या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासमोर राष्ट्र उभारणीचे मोठे आव्हान होते. त्यांना शासनाने नेहमीचेच प्रशासकीय कार्य करावे असे वाटत नव्हते. विकासाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी हे देश उत्सुक होते. या देशांमधील समाज हा गुंतागुतीचा आणि विभिन्न होता आणि या देशातील अर्थव्यवस्था स्थिर होण्यासाठी झगडत होत्या. विकसित देशांनी या देशांच्या विकासासाठी केलेली मदतयोजना पुरेशी ठरली नाही. या देशांनी नवीन दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक होते. तसे झाले तरच सामाजिक असमानता, दारिद्र्य इत्यादी समस्या, त्याची आव्हाने पेलणे शक्य होणार होते. या जाणिवेतून 'विकास प्रशासन' या संकल्पनेचा उदय झाला.

या देशांतील विकास आणि बदलाचे प्रमुख स्रोत, तेथील सरकार होते. या नवीन राज्यांतील सामाजिक-राजकीय परिस्थितीमुळे विकासाच्या संकल्पनेची परिभाषा निश्चित करणे आणि पुनर्रचना करणे आवश्यक झाले. विकासाचा संपूर्णपणे नव्याने विचार झाला. विकास म्हणजे फक्त आर्थिक वाढ नाही तर सामाजिक बदल, राजकीय विकास आणि सांस्कृतिक सुधारणा देखील आहे, असा विचार मांडला गेला. त्याप्रमाणे या देशातील सरकारांनी अनेक महत्वाची कार्ये हाती घेतली - केंद्रीय आर्थिक नियोजन, विकास कार्यक्रम आणि प्रकल्पाची आखणी व अंमलबजावणी, औद्योगिक विकासाचे व्यवस्थापन आणि नागरिकांच्या मूलभूत गरजांची



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पूर्तता, आर्थिक संधी देणे व इतर सामाजिक कल्याण कार्यक्रमांतून हे प्रयत्न झाले. नियोजित बदल आणि लोकसहभाग यांतून अनेक विकसनशील देशांनी विकास साधण्याचा प्रयत्न केला. यामुळे अभ्यासाचा विषय म्हणून आणि विकास साधण्याचा मार्ग म्हणून विकास प्रशासनाचे महत्त्व वाढले.

**व्याख्या**

**एडवर्ड वेडनर :** ''एखाद्या संघटनेने अधिकृतपणे निश्चित केलेली प्रगतिशील राजकीय, आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठीची प्रक्रिया.''

**मेर्ल फेअरसोल :** यांच्या मते, ''विकास प्रशासन म्हणजे नावीन्यपूर्ण मूल्यांचे वाहक, आधुनिकता आणि औद्योगिकीकरणाची सुरुवात करण्यासाठी विकसनशील देशांनी अवलंबलेली नवीन कार्यपद्धती.''

पारंपरिक लोकप्रशासनात नियम आणि पदसोपानरचना एकमेकांशी जोडले गेले आहेत. हा दृष्टिकोन चुकीचा नाही, पण कधीकधी यामुळे वेळेचा अपव्यय होतो आणि अडथळे निर्माण होऊ शकतात. याला 'लाल फित' किंवा 'दफ्तर दिरंगाई' असे म्हणतात. समाजात बदल घडवण्यासाठी नावीन्यपूर्ण नियोजनाची आवश्यकता असते. बदल आणि विस्तार यांवर आधारित या दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात.

विकास प्रशासनामुळे झालेले बदल समजून घेण्यासाठी पारंपरिक लोकप्रशासन समजून घेणे गरजेचे आहे. पारंपरिक लोकप्रशासनात पुढील बाबींचा समावेश दिसून येतो.

**माहीत आहे का तुम्हांला?**



शासकीय प्रशासनात जेव्हा नियम, कायदे, प्रक्रिया यांमुळे अनावश्यक दिरंगाई होते, तेव्हा त्याला 'लाल फित' किंवा 'दफ्तर दिरंगाई' असे म्हणतात.

- दफ्तर दिरंगाई याबाबत तुम्हांला आलेल्या विविध अनुभवांवर चर्चा करा.

(i) शासकीय यंत्रणेचे संघटन : यामध्ये शासनाची रचना, विविध विभाग, मंत्रालये आणि त्यांच्याशी निगडित संघटनांचा समावेश होतो. उदा., मंत्रालयाची रचना ज्यामध्ये सचिव आणि इतर अधिकारी, यूपीएससी सारखी विविध मंडळे, निवडणूक आयोगासारखे इतर आयोग इत्यादींचा समावेश होतो.

(ii) विविध कार्यांचे व्यवस्थापन : विविध विभागांमधील नेतृत्व, नियोजन आणि समन्वय यावर लक्ष दिले जाते. उदा., नीती आयोग.

(iii) सेवक वर्ग प्रशासन : यामध्ये भरतीची प्रक्रिया, प्रशिक्षण व इतर संलग्न कार्यांचा समावेश होतो. उदा., केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा राज्य लोकसेवा आयोग यांच्यामार्फत भारतात भरती कशी होते, त्यांचे प्रशिक्षण, पदोन्नती, वेतन इत्यादी विषयांचे व्यवस्थापन.

(iv) आर्थिक प्रशासन : अर्थसंकल्प निर्मिती प्रक्रिया, संसदेच्या आर्थिक समित्या आणि लेखापरीक्षण यांवर लक्ष केंद्रित केले जाते. उदा., संसद खर्चावर नियंत्रण कसे ठेवते, लोकलेखा समिती, अंदाज समिती इत्यादी.

(v) प्रशासकीय कायदा : संसदेने पारित केलेल्या कायद्यानुसार नियम तयार केले जातात. वाद सोडवण्यासाठी लवाद (tribunals) देखील आहेत. उदा., आयकरविषयक वाद सोडवण्यासाठीचे लवाद.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**शोधा पाहू?**

भारतीय प्रशासनातील अस्तित्वात असलेल्या कोणत्याही चार लवादांची नावे व त्यांचे कार्यक्षेत्र लिहा.

वर नमूद केलेली लोकप्रशासनाची पारंपरिक कार्ये ही विकसनशील देशांतील महत्त्वाची कार्ये आहेत, पण विकसनशील देशांमध्ये विकासासंदर्भात काही विशेष समस्या आहेत. या देशांनी वसाहतवाद अनुभवला आहे. ते स्वतः विकासाचा स्वतंत्र असा दृष्टिकोन तयार करण्याचा प्रयत्न करत आहेत. आर्थिक व सामाजिक न्याय आणि राजकीय आधुनिकीकरण यांवर आधारित हा दृष्टिकोन आहे. नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेणेही आवश्यक आहे. त्यामळे लोकप्रशासनाच्या पारंपरिक दृष्टिकोनात बदल करणे गरजेचे आहे. प्रशासनाच्या या प्रकारात प्रशासनाच्या माध्यमातून विकासाची उद्‌दिष्टे निश्चित करणे व ती साध्य करणे याबाबत प्रयत्न केला जातो.

भारतासारख्या विकसनशील देशातही लोकप्रशासन आणि सार्वजनिक धोरणाच्या दृष्टिकोनात काही बदल झाले आहेत. विकासाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित झाले आहे. यासाठी वापरण्यात आलेल्या रचनेला 'विकास प्रशासन' असे म्हणतात. सामाजिक-राजकीय आणि सामाजिक-आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करणारे हे प्रशासन आहे. विकासाचे उद्‌दिष्ट पूर्ण करणाऱ्या प्रकल्पांवर, कार्यक्रमांवर व योजनांवर भर दिला जातो.

विकास प्रशासनाचे दोन महत्त्वाचे पैलू आहेत.

(१) विकासाचे प्रशासन - विकासाची उद्‌दिष्टे निश्चित करणे हे प्रथम कार्य आहे आणि दुसरे कार्य, ही उद्‌दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करणे.

(२) प्रशासनाचा विकास - विकासाची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी प्रशासनाच्या प्रचलित व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज आहे.

**हे करून पहा.**

तुम्ही राहत असलेल्या भागातील समस्यांचा शोध घेऊन त्या समस्यांचे निराकरण कसे करता येईल आणि तुमच्या भागाचा विकास कसा साधता येईल यावर चर्चा करून उपाय लिहा.

## विकास प्रशासन

विकास प्रशासनाची प्रमुख वैशिष्ट्ये

(i) **बदलाभिमुख** - पारंपरिक प्रशासनात स्थिरता आणि जैसे थे स्थिती असण्यावर भर होता. विकास प्रशासनात बदल करण्याचा आणि विकासात्मक उद्‌दिष्टांकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न होतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आशिया व आफ्रिकेत जेव्हा विविध राष्ट्रे स्वतंत्र झाली तेव्हा विकासाच्या प्रक्रियेला उत्तेजन देणे हे शासनासमोरील सर्वांत महत्त्वाचे व मोठे कार्य होते. शासनाची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अशा सर्व क्षेत्रांमध्ये सुधारणा करण्याची इच्छा होती. या इच्छांची पूर्तता होण्यासाठी परिवर्तन, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि विकास यांवर शासनाने लक्ष देणे आवश्यक होते.

स्वातंत्र्योत्तर भारतात शासनासमोरील मोठे आव्हान दारिद्र्य, उपासमार आणि आर्थिक मागासलेपणा हे होते. त्यामुळे शासनाने फक्त अर्थव्यवस्थेच्या पारंपरिक क्षेत्राकडे म्हणजेच कृषी क्षेत्राकडे लक्ष न देता हेतुपुरस्सर औद्योगिकीकरण, धरण बांधणी, जलविद्युत प्रकल्पांची उभारणी अशा सार्वजनिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली व विकास करण्याचा प्रयत्न केला. पंडित नेहरूंनी या प्रकल्पांना 'आधुनिक भारताची मंदिरे' असे संबोधले आहे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

भारतीय औद्योगिकीकरणाची उदाहरणे



भाक्रा-नांगल धरण



भिलाई पोलाद प्रकल्प

(ii) **उत्पादनाभिमुख** – विकास प्रशासनाचे उद्दिष्ट हे निष्पत्ती आणि परिणाम साध्य करणे आहे व त्यासाठी कामाचे मूल्यमापन करायचे नियम तयार केले आहेत. हे नियम साधारणतः संख्यात्मक स्वरूपाचे असतात. जर विकास प्रशासनाचे उद्दिष्ट बदल घडवणे हे असेल तर तो बदल घडवण्यासाठी काही लक्ष्य (ध्येय) ठरवणे आवश्यक आहे. यामुळे प्रशासकीय विभाग अपेक्षित ध्येय गाठू शकतात. या ध्येयावर भर दिल्यास प्रशासन अपेक्षित बदल साध्य करू शकतात. उदा., जेव्हा शासन ठरवते की अर्थव्यवस्था वाढीचा दर प्रतिवर्षी ८ ते १०% असावा, तेव्हा वाजवी आणि साध्य करता येण्याजोगी उद्दिष्ट्ये सरकार ध्येय म्हणून समोर ठेवते.

(iii) **लोकसहभाग** – विकास ही सामाजिक व आर्थिक बदलांची प्रक्रिया आहे. त्यामुळे लोकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. जर विकासाची प्रक्रिया तळागाळातील लोकांशी जोडलेली नसेल तर ती अस्तित्वात येणे कठीण आहे. त्यामुळे नियोजन, अंमलबजावणी आणि मूल्यमापन या प्रक्रियांमध्ये लोकांचा सहभाग आवश्यक आहे.

भारतासारख्या बहुविध देशांमध्ये लोकसहभाग आवश्यक आहे. विविध प्रदेशांतील लोकांच्या गरजा, आवश्यकता, निवड या वेगवेगळ्या असतात. भारत सरकारने १९५२ मध्ये सामूहिक विकास कार्यक्रम आणि १९५३ मध्ये राष्ट्रीय विस्तार सेवा सुरू केल्या. याचे उद्दिष्ट ग्रामीण व दूरस्थ क्षेत्रांमध्ये विकास करण्याचा आहे. या कार्यक्रमांमुळे ग्रामीण भागावर शासनाने लक्ष केंद्रित केले आणि ७३ व्या व ७४ व्या संविधानात्मक घटनादुरुस्तीने ग्रामीण भागातील लोकांचा सहभाग वाढवण्यात आला.

**माहीत आहे का तुम्हांला?**

१९९२ च्या ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायती राजसंस्थांना घटनात्मक दर्जा दिला. तळागाळातील लोकशाही यंत्रणेच्या विकासामध्ये हा कायदा महत्त्वाचा आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीने नगरपालिकांना घटनात्मक दर्जा दिला. शहरी शासनव्यवस्था दृढ करण्यासाठी या कायद्याची मदत झाली.

(iv) **सार्वजनिक बांधिलकी** – नोकरशाह, प्रशासकीय अधिकारी यांची बांधिलकी, सहभाग आणि काळजीची अपेक्षा विकास प्रशासन करते. विकासाच्या वाटेत,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आहेत, आव्हाने आहेत, त्यामुळे नोकरशाहांना विकासात्मक उद्‌दिष्टे गाठण्यासाठी आपुलकी, बांधिलकी आणि राष्ट्रीय कार्याबद्‌दल उत्साह असणे अपेक्षित आहे.

**भारतातील विकास प्रशासन**

विकास प्रशासन हे बदलाभिमुख आहे. हे जैसे थे स्थितीच्या विरोधातील आहे. प्रत्येक विकास कार्य हे उद्‌दिष्ट पूर्ण करण्यासाठी आहे. उदा., आर्थिक विकासाचे उद्‌दिष्ट लोकांचे जीवनमान सुधारणे आहे. यामध्ये दरडोई उत्पन्न वाढवणे, साक्षरतेचा स्तर वाढवणे, आयुर्मान उंचावणे आणि दारिद्र्य कमी करणे इत्यादींचा समावेश आहे. ही उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी नियोजन, संघटन आणि संसाधनांचा योग्य वापर आवश्यक आहे. नियोजनामुळे उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी लागणारी संसाधने तयार करणे व लक्ष्य ठरवून कामे वेळेत पूर्ण करण्यास मदत होते.

**चर्चा करा.**

भारतातील दारिद्र्य निर्मूलनाच्या विविध उपायांवर चर्चा करा.

स्वतंत्र भारताची सुरुवात एक नव्याने स्वतंत्र झालेल्या गरीब आणि अविकसित देश म्हणून झाली. आपले मुख्य उद्‌दिष्ट भूतकाळातील प्रतिष्ठा आणि समृद्‌धी मिळवणे हे होते. वसाहतवादामुळे भारताचे शोषण झाले होते आणि भारत त्यातून सावरण्याचा प्रयत्न करत होता. भारताने विकास आराखड्यासाठी काही महत्वाचे निर्णय घेण्याची गरज होती, ज्याचा एक राष्ट्र म्हणून अवलंब करण्यात येईल.

**स्वातंत्र्य काळापासून भारताची विकासाची उद्‌दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.**

(i) **अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण :** औद्योगिकीकरणावर लक्ष केंद्रित केले गेले. औद्योगिकीकरणामुळे रोजगार उपलब्ध झाला. त्यामुळे मानवी संसाधनाचा जास्तीत जास्त वापर होऊन रोजगाराची संधी उपलब्ध होणार होती. यातून अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होणे अपेक्षित होते.

(ii) **जमीन सुधारणा :** भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा जमिनीची मालकी ही फक्त काही जमीनदारांकडे होती. ही समस्या सोडवण्यासाठी जमीन सुधारणा करण्यात आल्या.

(iii) **कृषीक्षेत्र :** कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी उच्च उत्पादन बियाणांच्या (संकरित बियाणे) वापरावर भर दिला गेला. ज्यामुळे मागासलेल्या भागांमधील आणि ग्रामीण क्षेत्रांतील दारिद्र्य कमी करण्यासाठी याचा उपयोग होईल.

(iv) **आत्मनिर्भरता :** भारत हा वसाहतवादापासून मुक्त झाला होता. त्यामुळे परकीय प्रभावापासून त्याला दूर राहायचे होते. औद्योगिक विकासासाठी भारताने परकीय मदत स्वीकारली. पण परकीय भांडवलावर भारताला अवलंबून राहायचे नव्हते.

(v) **सामाजिक न्यायावर आधारित समाजवादी आकृतिबंध :** कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेवर आधारित समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. यामागे उत्पन्न आणि संपत्ती यांतील असमानता कमी करण्याचे उद्‌दिष्ट होते. नागरिकांना सर्व कल्याणकारी सुविधा पुरवण्याचे कार्य शासनाने हाती घेतले. या धोरणात नियोजन महत्त्वाचे होते. त्यासाठी भारताने योजना आयोगाची स्थापना केली, ज्याची उद्‌दिष्टे पुढीलप्रमाणे होती - देशातील साधन संसाधनांचा वापर करून लोकांचे जीवनमान सुधारणे, त्याचबरोबर उत्पादन वाढवणे आणि सामाजिक कार्यामध्ये रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

### नीति आयोग

देशातील सर्वोच्च नियोजन यंत्रणा म्हणून नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली. पंचवार्षिक योजनांमार्फत दीर्घकालीन आणि अल्पकालीन विकासाची ध्येये ठरवण्यात आली. पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी, सिंचन, वीज पुरवठा, औद्योगिकीकरण, दारिद्र्य निर्मूलन, खाद्य उत्पादन, पोषण, सामाजिक सुरक्षा इत्यादी विषयांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.


१९९० च्या दशकात भारताने उदारीकरणाचे नवे आर्थिक धोरण स्वीकारले. या नव्या व्यवस्थेत नियोजनाचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता होती. २०१४ साली नियोजन आयोगाच्या जागी 'नीति आयोगा'ची स्थापना करण्यात आली. या आयोगाच्या स्थापनेद्वारे भारताने योजनांच्या केंद्रीकरणाकडून योजनांच्या विकेंद्रीकरणाकडे वाटचाल सुरू केली. तळागाळापासून, गावांतून, गटांतून, जिल्ह्यांतून योजना करून, राज्यपातळीवर एकसंध योजना तयार करण्याचा मानस नीति आयोगाचा आहे. राज्यपातळीवरील योजनांचा राष्ट्रीय योजनेमध्ये विचार केला जाईल आणि याद्वारे संपूर्ण देशाचा विकास साधला जाईल.



नीति आयोग – कार्यालय

**शोधा पाहू.**

नीति आयोग ( National Institution for Transforming India (NITI) याचे अध्यक्ष व सदस्य कोण आहेत ते शोधा.



यशदा (YASHADA) : यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे ही प्रशासकीय प्रशिक्षण देणारी संस्था आहे. याचे दोन विभाग आहेत : प्रशासकीय प्रशिक्षण संस्था आणि राज्य ग्रामविकास संस्था.

### विकास कार्यक्रम

विकास प्रशासन संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी विकासाचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून विशिष्ट योजना आणि कार्यक्रम तयार करणे आवश्यक असते.

भारत सरकारने विकास प्रशासनांतर्गत तयार केलेले काही कार्यक्रम पुढीलप्रमाणे –

(i) १९५२ : सामूहिक विकास कार्यक्रम – ग्रामीण क्षेत्रांचा सर्वांगीण विकास आणि लोकसहभागाचा पुरस्कार करण्यासाठीचा कार्यक्रम.

(ii) १९६६–६७ : हरीत क्रांती – कृषी उत्पादन वाढवण्यासाठीचा कार्यक्रम.

(iii) १९७५ : जलप्रदाय क्षेत्र विकास कार्यक्रम – सिंचन क्षमतेचा योग्य उपयोग करण्यासाठी.

(iv) १९७५ : वीस कलमी कार्यक्रम : दारिद्र्य निर्मूलन आणि जीवनमान उंचावण्याचे उद्दिष्ट.

(v) १९८० : एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम ग्रामीण भागातील दारिद्र्य कमी करण्यासाठीचा सर्वांगीण कार्यक्रम.

(vi) १९८९ : जवाहर रोजगार योजना – ग्रामीण बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठीची योजना.

(vii) १९९५ : माध्यान्ह भोजन योजना – प्राथमिक



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

शाळेतील विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी, विद्यार्थी पटसंख्या वाढवण्यासाठी योजना व गळती थांबवणे आणि उपस्थिती वाढवणे.

(viii) २००० : प्रधानमंत्री ग्राम सडक योजना – सर्व गावांना जवळील पक्क्या रस्त्यांशी जोडण्यासाठी.

(ix) २००५ : जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनर्निर्माण योजना – शहरातील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी.

(x) २००५ : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) : हा एक भारतीय कायदा आहे आणि सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या कायद्याने 'रोजगाराच्या हक्काची' हमी दिलेली आहे.

(xi) २००९ : आधार – युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडियाची निर्मिती ज्याचे उद्दिष्ट भारतातील प्रत्येक रहिवाशाला एक (युनिक आयडेंटिफिकेशन) अद्‌वितीय ओळख क्रमांक देणे हा आहे. हे एक संविधानिक प्राधिकरण आहे – टारगेटेड डिलीव्हरी ऑफ फायनान्शिअल अँड अदर सबसिडीज बेनीफिट्स अँड सर्व्हिसेस ॲक्ट २०१६ म्हणजेच आधार कायदा होय.




(xii) २०१४ : प्रधानमंत्री जन धन योजना – भारतातील सर्व कुटुंबांना आर्थिक सेवा पुरवणे आणि त्यांचे आर्थिक समावेशन करण्याचे उद्दिष्ट.

(xiii) २०१४ : स्वच्छ भारत अभियान – महात्मा गांधींचे स्वच्छ आणि निरोगी भारताचे स्वप्न पूर्ण करण्याचे उद्दिष्ट.

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

(xiv) उडाण योजना : मुलींना उच्च तांत्रिक शिक्षणामध्ये प्रोत्साहन हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विद्यार्थिनींचे सक्षमीकरण करणे आणि त्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, हाही उद्देश यामागे आहे.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ :** शाळाबाह्य व्यक्ती, दिव्यांग, कलाकार, खेळाडू, गृहिणी, कामगार, अतिप्रगत विद्यार्थी इत्यादी शाळेच्या नियमित प्रवाहापासून दूर असलेल्या घटकांना नियमित शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासनाने २०१७ साली महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाची स्थापना केली.

सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना या योजनांनी व कार्यक्रमांनी मदत करण्याचा प्रयत्न केला आहे. असे कार्यक्रम नोकरशाह व नागरिक दोघांच्याही सक्रिय सहभागामुळेच यशस्वी होतात. आज प्रशासकीय प्रक्रियेत नागरिक सक्रिय सहभाग घेताना दिसून येतात. याचे एक कारण म्हणजे माहिती तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे निर्माण झालेली जागृती होय.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**Please see the following websites for further information:**

**An Overview of the Sustainable Development Goals**

NITI Aayog (National Institution for Transforming India), Government of India
http://www.niti.gov.in/content/overview-sustainable-development-goals




## स्वाध्याय

**प्र.१ दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक हिताचा पुरस्कार करण्यासाठी पुढाकार घेणारे राज्य –

२. प्रशासकीय कामकाजातील दिरंगाई –

**प्र.२ पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. बदल आणि विस्तार यांवर आधारित दृष्टिकोनाला विकास प्रशासन म्हणतात.

२. स्वातंत्र्योत्तर भारतात शासनाने हेतुपुरस्सर सार्वजनिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक केली.

३. ७३ व्या घटनादुरुस्तीने नगरपालिकांना घटनात्मक दर्जा दिला.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

पारंपरिक लोकप्रशासन व विकास प्रशासन.

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पारंपरिक लोकप्रशासनात समाविष्ट असणाऱ्या कोणत्याही चार क्षेत्रांची चर्चा करा.

२. नीति आयोगाची थोडक्यात माहिती लिहा.

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

विकास प्रशासनात लोकसहभाग आवश्यक आहे.

**उपक्रम**

कोणत्याही एका विकास कार्यक्रमाचा विस्तृतपणे अभ्यास करा. त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे झाली त्यावर वर्गात चर्चा करा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# विभाग ४ : आंतरराष्ट्रीय संबंध

## प्रस्तावना




तुम्ही वर्तमानपत्रात वाचले असेल, की भारताचे प्रधानमंत्री अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची अथवा रशियाच्या अध्यक्षांची भेट घेत आहेत. परदेशी उच्च पदस्थांच्या भारत-भेटीबद्दल देखील बातमी वाचली असेल. हे म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंध होय, परंतु या सर्व दूरवर घडणाऱ्या गोष्टी वाटतात. तुम्हांला असेही वाटेल, की या सगळ्याचा तुमच्या वैयक्तिक जीवनाशी काहीही संबंध नाही, पण परत एकदा विचार करा.

जेव्हा भारतातील पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत वाढ होते तेव्हा तुम्हांला प्रश्न पडतो, की पेट्रोलची किंमत का वाढते? वर्तमानपत्रे तुम्हांला सांगतील की पश्चिम आशिया भागातील तणाव हे त्याचे कारण आहे. आपण पेट्रोलियम पदार्थ आयात करतो आणि ज्या भागात उत्पादन केले जाते त्या भागात संघर्ष सुरू असतील तर त्याचा परिणाम पुरवठ्यावर होतो. परिणामतः पेट्रोलची किंमत वाढते. कदाचित, काश्मिर सीमेवर तुमच्या ओळखीतील भारतीय लष्करातील जवानाने त्याचे प्राण पणाला लावले असतील. या अशा बातम्या म्हणजे फार दूरवर घडणाऱ्या घटना नव्हेत. यांचा तुमच्या दैनंदिन जीवनाशी संबंध आहे. हा सर्व आंतरराष्ट्रीय संबंधांचाच भाग आहे.

### इतिहास आणि भूगोल

आंतरराष्ट्रीय संबंध समजून घेण्यासाठी इतिहास आणि भूगोल महत्वाचे आहेत. जगाच्या नकाशाकडे पहा. जगाचा नकाशा तुम्हांला देशांची भौगोलिक स्थाने दाखवेल. जगाच्या नकाशावर भारत कुठे आहे आणि त्याची शेजारील राष्ट्रे कोणती आहेत याची माहिती तुम्हांला नकाशाद्वारे मिळेल. तसेच, तुम्हांला



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

युरोपातील देश, अमेरिका, चीन, रशिया यांची भौगोलिक स्थाने देखील समजतील. इतिहास म्हणजे केवळ घटनांचा कालगणनाक्रम नव्हे तर इतिहास आपल्याला जगात विविध ठिकाणी घडलेल्या घटना समजून घ्यायला मदत करतो. युद्ध, राजनय, तह, करार इत्यादींचा अभ्यास म्हणजे देखील इतिहास. हे सर्व आंतरराष्ट्रीय संबंधांचा भाग आहेत.

**आंतरराष्ट्रीय संबंधांचा आशय :**

आंतरराष्ट्रीय संबंध स्वतंत्र विषय म्हणून केव्हापासून अभ्यासला गेला ? पहिल्या जागतिक महायुद्धाने खूप मोठ्या प्रमाणावर विध्वंस पाहिला. भविष्यकालीन संघर्ष टाळायची आवश्यकता निर्माण झाली आहे याची जाणीव लोकांना वाटू लागली. युद्धात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या स्मरणार्थ युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ वेल्स (सध्याचे ॲबरिस्ट्विथ युनिव्हर्सिटी, युनायटेड किंग्डम) यांनी १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांवर अभ्यास सुरू केला. सुरुवातीच्या काळात युद्धे कशी टाळावीत आणि शांतता प्रस्थापन या विषयांवरच लक्ष केंद्रित केले गेले. नंतर मात्र, संरक्षण समस्यांपलीकडे केंद्र विस्तारून राजकीय, आर्थिक, सामाजिक-सांस्कृतिक समस्यांचा अंतर्भाव करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय संबंध ज्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे द्यायचा प्रयत्न करते, ते म्हणजे राष्ट्र जे करतात तसे ते का करतात? या प्रश्नाचे उत्तर असे, की देश त्यांच्या हितसंबंधांची जपणूक होईल असे निर्णय घेतात. ते त्यांच्या राष्ट्रीय हिताची जपणूक करतात. देशाचे परराष्ट्रीय धोरण त्यांच्या राष्ट्रीय हितसंबंधावर अवलंबून असते.

या विभागात दुसरे महायुद्ध संपल्यानंतरच्या काळातील काही महत्त्वाच्या घटनांचे सर्वेक्षण पाहायला मिळेल. दुसऱ्या महायुद्धापासून देशांची धोरणे समजून घेण्याचा हेतू या मागे आहे. यात आपण शीतयुद्ध आणि अलिप्ततावाद यांसारख्या संकल्पना समजून घेणार आहोत. यात संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेवर देखील प्रकाश टाकला जाईल.

या भागातील दोन प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

**प्रकरण ९ :** १९४५ नंतरचे जग – I या प्रकरणात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीपासून ते १९५९ पर्यंतच्या घटनांचा समावेश आहे. शीतयुद्ध आणि त्याचबरोबर आशिया व आफ्रिका खंडातील वाढता प्रादेशिकतावाद हे या प्रकरणाचे केंद्र आहे.

**प्रकरण १० :** १९४५ नंतरचे जग – II या प्रकरणात १९५९ ते १९९१ पर्यंतच्या काळावर भाष्य केले आहे. १९६० च्या दशकात झालेल्या बदलांची माहिती घेतली आहे. अलिप्ततावादाची वाढ आणि शीतयुद्धाच्या काळात झालेल्या बदलांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. हे प्रकरण १९९१ च्या सोव्हिएट रशियाच्या विघटनापर्यंत थांबते. १९९१ नंतरच्या घटना इयत्ता बारावीच्या अभ्यासक्रमात घेतल्या आहेत.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# ९. १९४५ नंतरचे जग (I)

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर (१९१९) पासून दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीचा (१९३९) काळ हा आंतरराष्ट्रीय संबंधात बदलाचा काळ होता. या काळात जगात शांतता व सुव्यवस्था स्थापन करण्यासाठी राष्ट्रसंघाची निर्मिती केली गेली; परंतु युरोपमधील संघर्ष संपले नाहीत आणि जगाने पुन्हा एकदा युद्ध अनुभवले.

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अनेक बदल घडून आले. त्याचे आज देखील महत्त्व जाणवते. या बदलांनी महायुद्धोत्तर काळातील जागतिक व्यवस्थेचा पाया तयार केला. या काळात 'शीतयुद्धा'ची सुरुवात झाली. या प्रकरणात आपण १९४५ नंतरच्या घटनांचा आढावा घेणार आहोत.

## दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

दोन्ही युद्धांदरम्यान जे बदल सुरू झाले होते त्यांना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात निश्चित स्वरूप प्राप्त झाले. हे बदल खालीलप्रमाणे :

(i) **युरोपकेंद्रित राजकारणाचा शेवट :** एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकापर्यंतचा काळ हा युरोपकेंद्रित कालखंड मानला जातो. दुसऱ्या महायुद्धादरम्यान जर्मनी, फ्रान्स आणि इटली ही युरोपमधील महत्त्वाची राष्ट्रे पराभूत झाली होती. युनायटेड किंग्डम उद्ध्वस्त झाले होते. दुसरीकडे, अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या बड्या सत्ता म्हणून उदयास आल्या. युरोपीय सत्तांचे महत्त्व कमी झाल्यामुळे आता जग हे युरोपकेंद्रित राहिले नाही. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांचे महत्त्व वाढल्यामुळे युरोपीय राष्ट्रांचे महत्त्व कमी झाले.

(ii) **युरोपची विभागणी :** दुसऱ्या महायुद्धादरम्यान सोव्हिएट रशियाच्या सैन्याने पूर्व युरोपचा प्रदेश व्याप्त केला होता. पश्चिम युरोपवर अमेरिका, फ्रान्स व युनायटेड किंग्डम या पाश्चात्य राष्ट्रांनी ताबा मिळवला होता. जर्मनीच्या पराभवानंतर दोन्ही बाजूंना आपापल्या प्रदेशावर ताबा कायम ठेवायचा होता. म्हणूनच युद्ध संपले तेव्हा युरोपचे पूर्व आणि पश्चिम असे विभाजन झाले.

(iii) **विचारप्रणालीचे कार्य :** रशियातील १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीने आंतरराष्ट्रीय संबंधात विचारप्रणाली हा एक नवीन घटक आणला होता. या क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची साम्यवादी राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. सोव्हिएट रशियाच्या आधिपत्याखाली असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी विचारप्रणाली मान्य केली तर अमेरिकेच्या प्रभावाखाली असलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही व्यवस्था मान्य केली. आता युरोपच्या विभागणीला विचारप्रणालीचे एक नवीन अंग प्राप्त झाले होते.

(iv) **संयुक्त राष्ट्रांची स्थापना :** १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांची स्थापना ही एक महत्त्वाची घटना होती. शांतता व स्थैर्य राखण्यासाठी या आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती केली गेली होती. आता राष्ट्रसंघाच्या जागी संयुक्त राष्ट्रे हे कार्य करणार होते.

(v) **आशियाचा उदय :** या काळातील आणखी एक महत्त्वाचा प्रवाह म्हणजे आशिया व आफ्रिकेतील वसाहतवादविरोधी किंवा स्वातंत्र्याच्या लढ्यांचे यश. त्यातूनच पुढे आशिया व आफ्रिकेतील देश स्वतंत्र होऊ लागले.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**माहीत आहे का तुम्हांला?**

**संयुक्त राष्ट्रांच्या मुख्य शाखा :**

(i) **आमसभा :** आमसभा ही संयुक्त राष्ट्राची विचारविनिमय करणारी, धोरण निर्मिती करणारी, प्रातिनिधिक स्वरूपाची संघटना आहे. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेमध्ये सर्व सभासद राष्ट्रे प्रतिनिधी असतात.

(ii) **सुरक्षा परिषद :** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून सुरक्षा परिषदेची आहे. यामध्ये १५ सभासद राष्ट्रे असतात. (यांपैकी ५ कायम सदस्य राष्ट्रे आणि १० अस्थायी सदस्य राष्ट्रे आहेत.)

(iii) **आर्थिक आणि सामाजिक परिषद :** राष्ट्राराष्ट्रांत समन्वय साधणे, धोरणांचा आढावा घेणे, धोरणविषयक वैचारिक आदान-प्रदान, आर्थिक-सामाजिक व पर्यावरणीय समस्यांवर सूचना करणे, आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त विकासाच्या उद्‌दिष्टांची यशस्वी अंमलबजावणी करणे यासाठी मुख्यत: आर्थिक आणि सामाजिक परिषद जबाबदार आहे.

(iv) **विश्वस्त परिषद :** विश्वस्त परिषदेची स्थापना ११ विश्वस्त प्रदेशांवर आंतरराष्ट्रीय देखरेख ठेवण्यासाठी करण्यात आली. या विश्वस्त प्रदेशांना स्वशासनासाठी, सक्षम आणि स्वतंत्र होण्यासाठी विश्वस्त परिषदेने पुढाकार घेतला. १९९४ पर्यंत सर्व विश्वस्त प्रदेश स्वशासित आणि स्वतंत्र झाले. १ नोव्हेंबर १९९४ रोजी विश्वस्त परिषदेने आपले उद्‌दिष्ट साध्य करून, कामकाज संपुष्टात आणले.

(v) **आंतरराष्ट्रीय न्यायालय :** आंतरराष्ट्रीय न्यायालय ही संयुक्त राष्ट्राची न्यायालयीन शाखा आहे. त्याचे मुख्यालय पिस पॅलेस 'द हेग' (नेदरलँडस्) येथे आहे.

(vi) **सचिवालय :** सचिवालयात सरचिटणीस आणि कर्मचारी वर्ग दैनंदिन कामकाज पाहतात. सरचिटणीस हा संयुक्त राष्ट्रांच्या सचिवालयाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असतो. याची नेमणूक सुरक्षा परिषदेच्या शिफारशीवरून आमसभा पाच वर्षांसाठी करते.

**हे शोधा.**

(१) संयुक्त राष्ट्रांचे एकूण सभासद किती आहेत?
(२) सुरक्षा परिषदेचे कायम सदस्य देश कोणते आहेत?
(३) संयुक्त राष्ट्राचे मुख्य कार्यालय कोठे आहे?
(४) आतापर्यंत होऊन गेलेल्या सरचिटणिसांचे नाव व कालखंड यांची यादी करा.

**संयुक्त राष्ट्रांची भूमिका**

(i) **आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखणे :** १९४५ साली संयुक्त राष्ट्रे एका मध्यवर्ती ध्येयाने प्रेरित होऊन अस्तित्वात आली. ते ध्येय म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुव्यवस्था राखणे, संघर्षाला पायबंद घालणे, संघर्षात सहभागी झालेल्या राष्ट्रांना शांतता प्रस्थापनेत मदत करणे, शांततामय परिस्थिती निर्माण व वृद्‌धिंगत करणे.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

(ii) **मानवी हक्कांचे संरक्षण :** मानवी हक्कांचे संवर्धन आणि संरक्षण हा संयुक्त राष्ट्रांचा महत्वाचा उद्देश व मार्गदर्शक तत्व आहे. १९४८ साली संयुक्त राष्ट्राने मानवी हक्कांचा जाहीरनामा घोषित केला.

(iii) **मानवीय मदत पुरवणे :** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवतावादी स्वरूपाच्या आंतरराष्ट्रीय समस्यांच्या सोडवणुकीसाठी आतंरराष्ट्रीय सहकार्य साध्य करणे हा संयुक्त राष्ट्रांचा महत्वाचा उद्देश आहे. नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती काळात, मानवतावादी मदत कार्यात समन्वय साधण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदाय संयुक्त राष्ट्रांवर अवलंबून आहे.

(iv) **शाश्वत विकास संवर्धन :** विकासाची जागतिक संकल्पना काळानुरूप बदलली आहे. आर्थिक विकासाची संधी आणि समृद्धीचे जतन, व्यापक सामाजिक कल्याण आणि पर्यावरणाचे संरक्षण यांसारख्या शाश्वत विकासाच्या संवर्धनासाठी संयुक्त राष्ट्रे कटिबद्ध आहेत.

(v) **आंतरराष्ट्रीय कायद्याचे उन्नयन करणे :** आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास करणे व आदर राखणे हे संयुक्त राष्ट्रांचे महत्त्वाचे कार्य आहे. न्यायालय, लवाद, बहुस्तरीय करार व सुरक्षा परिषद यांमार्फत हे कार्य चालते.

**शोधा पाहू ?**

शांतता व सुरक्षा राखण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची शांतिसेना महत्वाचे कार्य करते. भारताने संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेत भाग घेऊन कोणत्या देशांत सशस्त्र सेना पाठवली ?



**माहीत आहे का तुम्हांला ?**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट यांनी 'United Nations' हे नाव दिले. दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान, १ जानेवारी १९४२ च्या संयुक्त राष्ट्राच्या जाहीरनाम्यात हे नाव पहिल्यांदा वापरले गेले. १९४५ साली सॅनफ्रान्सिस्को मध्ये ५० प्रतिनिधी राष्ट्रांची आंतरराष्ट्रीय संघटना संबंधीची परिषद झाली. त्यामध्ये संयुक्त राष्ट्राची सनद तयार करण्यात आली. भारत हा संयुक्त राष्ट्रांचा संस्थापक सदस्य होता. भारताने ऑक्टोबर १९४५ मध्ये सदस्यत्व घेतले.

### शीतयुद्ध

युरोपच्या पूर्व-पश्चिम विभागणीने अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान तणाव निर्माण झाला. या तणावातूनच पुढे शीतयुद्धाची सुरुवात झाली. अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान या संबंधांचे वर्णन करताना शीतयुद्ध हा शब्दप्रयोग वापरला जातो. या संघर्षाचे अनेक पैलू आहेत.

(i) **राजकीय :** आपल्या ताब्यात असलेल्या प्रदेशावर राजकीय प्रभाव ठेवण्यासाठी केलेले प्रयत्न हा पहिला पैलू होता. सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली पूर्व जर्मनी, पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया आणि अल्बानिया हे देश होते, तर नेदरलँड, डेन्मार्क, बेल्जियम, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, ग्रीस आणि युनायटेड किंग्डम



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

हे अमेरिकेच्या प्रभावाखाली होते. अमेरिका व सोव्हिएट रशियादरम्यान संघर्ष होऊ नये म्हणून फिनलँडवर तटस्थता लादली गेली.

(ii) **विचारप्रणाली :** सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखाली पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी व्यवस्था स्वीकारली व साम्यवादी सरकारे स्थापन केली. पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी अमेरिकेच्या प्रभावाखाली भांडवलशाही व्यवस्था स्वीकारली व तेथे लोकशाही सरकारे स्थापन केली गेली.


(iii) **आर्थिक :** साम्यवादी सरकारे असलेल्या पूर्व युरोपीय राष्ट्रांनी साम्यवादी अर्थव्यवस्था स्वीकारली. याचाच अर्थ तिथे सरकारी उद्योगधंद्यांना महत्वाचे स्थान असणार होते, तर लोकशाही व्यवस्था असलेल्या पश्चिम युरोपीय राष्ट्रांनी भांडवलशाही अर्थव्यवस्था अमलात आणली. या राष्ट्रांमध्ये खासगी उद्योगधंद्यांना महत्त्व असणार होते.

(iv) **सुरक्षा :** राष्ट्रांची सुरक्षा राखण्यासाठी युरोपमध्ये लष्करी गट तयार केले गेले. पश्चिम युरोपला सोव्हिएट रशिया व पूर्व युरोप पासून असलेल्या धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी १९४९ मध्ये उत्तर अटलांटिक लष्करी गटाची (The North Atlantic Treaty Organisation-NATO) निर्मिती केली गेली. तसेच पश्चिम युरोपीय व



**माहीत आहे का तुम्हांला?**

**बर्लिनची विभागणी :** दुसरे महायुद्ध संपले तेव्हा पूर्व जर्मनीवर सोव्हिएट रशियाचा तर पश्चिम जर्मनीवर अमेरिका, युनायटेड किंग्डम आणि फ्रान्सचा ताबा होता. याला जर्मनीचे विभाजन म्हणतात. जर्मनीची राजधानी असलेल्या बर्लिन शहराची देखील पूर्व आणि पश्चिम अशी विभागणी झाली होती. पूर्व बर्लिनवर सोव्हिएट रशियाची सत्ता होती, तर पश्चिम बर्लिनवर अमेरिका, युनायटेड किंग्डम व फ्रान्सची सत्ता होती. बर्लिन शहर हे पूर्व जर्मनीच्या प्रदेशात आहे. त्यामुळे पश्चिम बर्लिनचा प्रदेश सर्व बाजूंनी पूर्व जर्मनीने व्याप्त केला आहे.




बर्लिनचे भौगोलिक स्थान दाखवणारा नकाशा



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

अमेरिकेपासूनच्या संभाव्य धोक्यांना सामोरे जाण्यासाठी १९५५ मध्ये वॉर्सा करार केला गेला.

अमेरिका व सोव्हिएट रशिया दरम्यान प्रत्यक्ष युद्ध नसले तरी सतत तणाव होते. या परिस्थितीचे वर्णन करताना 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग वापरला जातो. त्यात तणाव आहेत, परंतु प्रत्यक्ष युद्ध नाही. मात्र दोन्ही प्रतिस्पर्धी संभाव्य युद्धाच्या तयारीत होते.


आता आपण १९४५ नंतरच्या महत्वाच्या घटना आणि प्रवाहांचा अभ्यास करणार आहोत.

**शीतयुद्धाचे कालखंड**

**कालखंड १९४५ ते १९४९-५० (सुरुवातीचा काळ) :** या सुरुवातीच्या काळात शीतयुद्धाला निश्चित स्वरूप प्राप्त होते. या काळात राजकीय, विचारप्रणाली, आर्थिक व लष्करी पैलूंवर युरोपची विभागणी केली गेली. त्यात राजकीय पैलू हा युरोपच्या विभाजनाचा होता; विचारप्रणाली ही राष्ट्रांच्या ध्येयांबाबत आणि आकांक्षांबाबत होती; आर्थिक विभाजन अर्थव्यवस्थेबाबत होते आणि लष्करी घटक हा लष्करी गटांबाबत होता. या दोन गटांतील विभागणीला पूर्व-पश्चिम विभागणी असेही म्हटले जाते. सोव्हिएट रशिया आणि पूर्व युरोपचा उल्लेख पूर्व म्हणून तर अमेरिका आणि पश्चिम युरोपीयन राष्ट्रांचा उल्लेख पश्चिम म्हणून केला जातो.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

**पोलादी पडदा :** ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री विन्स्टन चर्चिल यांनी १९४६ मध्ये अमेरिकेत फुल्टन येथील वेस्टमिनिस्टर महाविद्यालयातील भाषणात युरोपमधील परिस्थितीचे वर्णन केले. ते म्हणाले, ''बाल्टिकमधील स्टेटीनपासून ॲड्रिॲटिकमधील ट्रिस्टपर्यंत युरोप खंडात एक पोलादी पडदा पडला आहे.'' हे भाषण युरोपची पूर्व-पश्चिम विभागणी दर्शवणारे पहिले वक्तव्य होते.





दुसऱ्या महायुद्धानंतरचे युरोपचे विभाजन



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



लष्करी गट : नाटो आणि वॉर्सा करार

**शोधा पाहू !**
नाटोची सभासद राष्ट्रे कोणती आहेत ?

याच दरम्यान आशियात काही महत्त्वाच्या घटना घडल्या.

(i) १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. आशियातील वसाहतवादाविरोधी चळवळीचे हे यश होते.

(ii) १९४९ मध्ये माओ झेडाँग यांच्या नेतृत्वाखाली चीन कम्युनिस्ट राष्ट्र झाले. १९५० मध्ये चीनने सोव्हिएट रशियाबरोबर लष्करी करार केला.

**कालखंड १९४९-५० ते १९५९ (आशियामधील शीतयुद्ध) :** चीनमध्ये साम्यवादी सरकार आल्यानंतर आशियात बदल होऊ लागले. १९५० मध्ये कोरियात युद्ध सुरू झाले. उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केल्याने युद्ध सुरू झाले. दक्षिण कोरियाने संयुक्त राष्ट्रांकडे मदत मागितली. संयुक्त राष्ट्रांनी दक्षिण कोरियाच्या संरक्षणाकरिता सैन्य पाठवले. कोरियन युद्ध १९५० पासून १९५३ पर्यंत चालले आणि कोरियाची उत्तर व दक्षिण अशी विभागणी होऊन युद्ध थांबले.

**शोधा पाहू !**
कोरियन युद्धात भारताने सहभाग घेतला होता का? भारताचा सहभाग कशा स्वरूपात होता ?

आशियात अनेक लष्करी गट तयार झाले. हे गट पुढीलप्रमाणे :

— ANZUS (1952) : ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, अमेरिका

— SEATO (South East Asia Treaty Organisation) (1954) : थायलंड,



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

फिलीपाईन्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फ्रान्स, युनायटेड किंग्डम, अमेरिका

- CENTO (Central Treaty Organisation) (1955) : तुर्कस्तान, इराक (१९५८ मध्ये सदस्यत्व सोडले), इराण (१९७९ मध्ये सदस्यत्व सोडले), पाकिस्तान
- सोव्हिएट रशिया आणि चीन सुरक्षा करार (१९५०)
- युरोपमध्ये वॉर्सा करारामुळे (१९५५) वॉर्सा गट निर्माण झाला. त्यात अल्बानिया (१९६८ मध्ये सदस्यत्व सोडले), बल्गेरिया, चेकोस्लोव्हाकिया, पूर्व जर्मनी, हंगेरी, पोलंड आणि रूमानिया

१९५० च्या दशकात सोव्हिएट रशियात देखील बदल झाले. १९५३ मध्ये जोसेफ स्टॅलिनच्या मृत्यूनंतर निकिता क्रुश्चेव्ह सत्तेवर आले. क्रुश्चेव्ह यांनी सोव्हिएट रशियाच्या धोरणात बदल घडवून आणले. त्यांनी 'शांततामय सहजीवना'च्या धोरणाची संकल्पना मांडली. सोव्हिएट साम्यवादी व्यवस्था आणि अमेरिकन भांडवलशाही व्यवस्था या दोन्हींना शांततेत नांदावे लागेल असे ते सांगत होते. सहजीवनाला पर्याय नव्हता. कारण जर दोघांमध्ये आण्विक युद्ध झाले तर ते संहारक असेल, याची जाणीव त्यांना होती.

या कालखंडातील आणखी एक प्रवाह हा आशिया व आफ्रिकेतील प्रादेशिकतावाद हा होता. १९४७ मध्ये भारताने पहिली आशियाई परिषद घेतली. आशियातील स्वातंत्र्यलढ्याचे नेते या परिषदेत सहभागी झाले होते. आशियातील २५ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी त्यात भाग घेतला. या परिषदेची पुढील उद्दिष्टे होती. (i) आशियातील सामान्य जनतेच्या समान प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी हे नेते एका व्यासपीठावर आले होते. (ii) आशियाई देशातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक समस्यांवर लक्ष वेधण्याची गरज होती. (iii) एकमेकांशी परस्पर संबंध प्रस्थापित करून संपर्क आणि सामंजस्य वाढवणे. ही परिषद म्हणजे आशियाई प्रादेशिकतावादाची सुरुवात मानली जाते.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**प्रादेशिकतावाद म्हणजे काय?**

एखाद्या भौगोलिक क्षेत्रातील राष्ट्र प्रादेशिक संघटना तयार करतात. आपले राष्ट्रहित एकत्रितपणे साध्य करण्यासाठी हे गट तयार केले जातात. हे गट स्वतःची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. प्रादेशिक पातळीवरील या सहकार्याला प्रादेशिकतावाद म्हणतात. भौगोलिक जवळीक जशी महत्वाची असते तसेच काही निश्चित कार्यासाठी देखील गट तयार होतात. त्यामध्ये दळणवळण, ऊर्जा, आरोग्य यांसारखी कार्य असू शकतात. प्रादेशिकतावादाची सुरुवात आपापसातील राजकीय संवादातून होते. या संवादातून एखादी संघटना तयार होऊ शकते. युरोपियन युनियन (EU), ASEAN (Association of South East Asian Nations) किंवा सार्क (South Asian Association for Regional Cooperation, SAARC) ही काही उदाहरणे आहेत.

या परिषदेनंतर १९५५ मध्ये इंडोनेशियात बांडुंग येथे परिषद घेतली गेली. प्रादेशिकतावादाला अधिक व्यापक करण्यासाठी आफ्रिकेला समाविष्ट करून बांडुंग येथे पहिली आशियाई-आफ्रिकी परिषद घेतली गेली. बर्मा (आता म्यानमार), सीलोन (आता श्रीलंका), भारत, इंडोनेशिया आणि पाकिस्तान यांनी




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

पुरस्कृत केलेल्या या परिषदेत यांच्या व्यतिरिक्त इतर २४ राष्ट्रे सहभागी होती.



आशियाई परिषदेचे ठिकाण, दिल्ली



आशियाई परिषदेत पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी आणि खान अब्दुल गफार खान

या परिषदेचे मुख्य हेतू पुढीलप्रमाणे होते–

(i) सद्‌भावना व सहकार्याला प्रोत्साहन देणे.

(ii) आशिया व आफ्रिकेतील जनतेच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्नांची चर्चा करणे.

(iii) आशिया आणि आफ्रिकेचे जागतिक स्थान काय आहे हे पाहून जागतिक शांततेसाठी काय प्रयत्न करता येईल ते बघणे.

बांडुंग परिषद ही ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाची होती. आशिया व आफ्रिकेत प्रादेशिकतावाद पसरवण्याची त्याने कामगिरी केली होती.



आफ्रो–आशियाई परिषदेचे ठिकाण, बांडुंग

प्रादेशिकतावादाने पश्चिम युरोपमध्ये वेगळे स्वरूप घेतले. तेथे आर्थिक सहकार्य हा प्रादेशिकतावादाचा पाया होता. १९५१ मध्ये युरोपीय कोळसा व पोलाद समूहाच्या निर्मितीपासून त्याची सुरुवात होते.

युरोपीय राष्ट्रांना आर्थिक व राजकीय व्यवस्था आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी युरोपियन युनियनची निर्मिती झाली. युरोपियन संसद आणि युरोपियन कम्युनिटीची निर्मिती करून प्रादेशिक एकात्मतेच्या दिशेने युरोपियन राष्ट्रांनी पावले उचलली.

**माहीत आहे का तुम्हांला?**

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये जेव्हा राज्याचे प्रमुख अथवा शासनाचे प्रमुख त्यांच्या देशातील समस्यांवर चर्चा करण्यासाठी भेटतात तेव्हा अशा भेटीसाठी 'शिखर परिषद' हा शब्दप्रयोग वापरला जातो.

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर आणि सोव्हिएट रशियाचे प्रधानमंत्री निकिता क्रुश्चेव्ह यांची १९५९ मध्ये कॅम्प डेव्हिड येथे भेट झाली. अमेरिका व सोव्हिएट रशिया यांमधील हा संवादाचा पहिलाच



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



कॅम्प डेव्हिड (१९५९) येथे राष्ट्राध्यक्ष ड्वाईट आयसेनहॉवर आणि प्रधानमंत्री निकीता क्रुश्चेव्ह

प्रामाणिक प्रयत्न होता. म्हणूनच शीतयुद्धाच्या इतिहासात ही भेट महत्त्वाची होती.

१९५९ नंतर काय बदल झाले हे आपण पुढच्या प्रकरणात पाहू.

**Please see the following websites for further information:**

**(1) World After World War II**

COEP History Club COEP (College of Engineering Pune) History Club arranged the last lecture of its eighth lecture series on the topic of "World After World War II". https://www.youtube.com/results?search_query=shrikant+paranjpeThe World after World War II (in Marathi)

**(2) UN Peacekeeping**

UN Peacekeeping is the largest and most visible representation of the United Nations. It is a collective investment in global peace, security, and stability.
https://peacekeeping.un.org/en/india

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. १९४९ मध्ये .......... यांच्या नेतृत्वाखाली चीन कम्युनिस्ट राष्ट्र झाले.
(क्रुश्चेव्ह, माओ झेडाँग, जोसेफ स्टॅलिन, हो चि मिन्ह)

२. शांततामय सहजीवनाची संकल्पना .......... यांनी मांडली.
(आयसेनहॉवर, जोसेफ स्टॅलिन, क्रुश्चेव्ह, जवाहरलाल नेहरू)

**(ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. युरोपीय सत्तांच्या वर्चस्वाचा काळ–


२. अमेरिका–सोव्हिएट रशिया दरम्यान तणाव–

**(क) गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया, फ्रान्स

२. इटली, पोलंड, स्पेन, ग्रीस

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**






Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**(ब) दुसऱ्या महायुद्धानंतरचे युरोपचे विभाजन या नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पूर्व युरोपातील सोव्हिएट रशियाच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.

२. पश्चिम युरोपातील अमेरिकेच्या प्रभावाखालील दोन देशांची नावे लिहा.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. बोल्शेविक क्रांतीनंतर सोव्हिएट रशियाची भांडवलशाही राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.

२. बांडुंग परिषदेने आशिया खंडात शीतयुद्ध आणले.

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. प्रादेशिकतावाद ही संकल्पना स्पष्ट करा.

२. संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेबाबत चर्चा करा.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

शीतयुद्धाचे पैलू विशद करा.

(अ) राजकीय (ब) विचारप्रणाली

(क) आर्थिक (ड) सुरक्षा

**उपक्रम**

जगातील विविध प्रादेशिक संघटनांची यादी करा.

***




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

# १०. १९४५ नंतरचे जग (II)

मागील प्रकरणात आपण १९४५ नंतर झालेले बदल अभ्यासले. युरोपात शीतयुद्धाला कशी सुरुवात झाली व आशिया खंडातील बदल पाहिले. आता आपण १९५९ नंतर झालेले बदल अभ्यासू.




## कालखंड १९५९ ते १९६२ (शीतयुद्धातील बदलांचा काळ)

कॅम्प डेव्हिड शिखर परिषदेनंतर शीतयुद्धात एका नव्या युगाला सुरुवात झाली. या भेटीमुळे शीतयुद्धातील दोन विरोधकांमध्ये एकमेकांबद्दल सद्भावना निर्माण होणे अपेक्षित होते, परंतु अमेरिका व सोव्हिएट रशिया या देशांमध्ये तणाव उत्तरोत्तर वाढतच गेला. १९६१ मध्ये सोव्हिएट रशियाने बर्लिनची भिंत उभारायला सुरुवात केली. या भिंतीमुळे पश्चिम बर्लिन हे शहर उर्वरित देशांपासून अक्षरशः तुटले. लोक पूर्व आणि पश्चिम बर्लिनमधून प्रवास करू शकत नव्हते. कुटुंबे आणि मित्रपरिवार एकमेकांपासून विलग झाले.



बर्लिनची भिंत

१९६२ मध्ये क्युबा क्षेपणास्त्र पेचप्रसंग उद्भवला. ही घटना शीतयुद्धाच्या काळातील सर्वांत महत्त्वाच्या घटनांपैकी एक होती. सोव्हिएट रशियाने क्युबामध्ये क्षेपणास्त्र तैनात केली. ज्यामुळे अमेरिकेला थेट धोका निर्माण झाला. उत्तरादाखल अमेरिकेने क्युबाची सागरी नाकेबंदी केली. शीतयुद्धातील प्रतिस्पर्धी अशा प्रकारे प्रथमच एकमेकांसमोर उभे ठाकले. १९४५ नंतर पहिल्यांदाच अमेरिका आणि सोव्हिएट रशियाचे नौदल समोरासमोर आले आणि युद्धाची शक्यता बळावली. असे युद्ध झालेच तर ते अणुयुद्ध ठरेल, ही भीती निर्माण झाली होती. त्यामुळे या दोन देशांवर तणाव कमी करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. सोव्हिएट रशियाने क्युबातून क्षेपणास्त्र काढून घेतल्यावर परिस्थिती निवळायला सुरुवात झाली.

**सागरी नाकेबंदी म्हणजे काय?**

सागरी नाकेबंदी म्हणजे जहाजांना बंदरात अथवा देशात प्रवेश करण्यास रोखणे. हे नौदलाच्या साहाय्याने केले जाते. अमेरिकेच्या नौदलाने क्युबा या बेटाच्या भोवताली नाकेबंदी केली; जेणेकरून कोणतेही आक्षेपार्ह शस्त्र क्युबात जाणार नाही.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

१९६० च्या दशकात तिसऱ्या जगात अनेक महत्वाच्या घडामोडी घडल्या. १९६१ साली पहिली अलिप्ततावादी परिषद बेलग्रेड येथे भरवण्यात आली. अलिप्ततेची संकल्पना दोन महत्त्वाच्या तत्त्वांवर आधारलेली आहे : जागतिक घडामोडींबाबत स्वतंत्र दृष्टिकोन आणि शांततेचा दृष्टिकोन. म्हणूनच अलिप्ततावादी देशांनी शीतयुद्ध काळातील युतींपासून स्वतःला लांब ठेवले. कालानुरूप जेव्हा नवीन देश स्वतंत्र होऊन अलिप्ततावाद स्वीकारू लागले तेव्हा अलिप्ततावाद ही एक चळवळ म्हणून उभी राहिली. अलिप्तता म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणात राज्यांनी अक्रियाशील व तटस्थ राहावे असे नव्हे. उलटपक्षी, शांतता आणि विकासाचे संवर्धन करण्यासाठी राज्यांनी जागतिक घडामोडींत सहभाग नोंदवणे अपेक्षित आहे.

भारताचे जवाहरलाल नेहरू, इजिप्तचे गमाल अब्दुल नासेर, घानाचे क्वामे नक्रुमा, इंडोनेशियाचे सुकार्नो, युगोस्लाव्हियाचे जोसिफ ब्रॉझ टिटो हे अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक होते.



अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक (डावीकडून) पंडित जवाहरलाल नेहरू, क्वामे नक्रुमा, गमाल अब्दुल नासेर, सुकार्नो, जोसिफ टिटो

गेल्या ५० वर्षांत अलिप्ततावादी चळवळ वाढली. या चळवळीने विकसनशील देशांना आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देण्यास मदत केली. आज ही चळवळ अनेक आव्हानांना तोंड देत आहे. यामध्ये अतिसंहारक शस्त्रांचे निर्मूलन, दहशतवादाविरोधात लढा देणे, मानवी हक्कांचे रक्षण, संयुक्त राष्ट्रांना अधिक परिणामकारक करण्यासाठी प्रयत्नशील राहणे इत्यादींसारख्या आव्हानांचा समावेश होतो.

पहिल्या बेलग्रेड परिषदेपासून चळवळीच्या नियमितपणे शिखर बैठका होत असतात. बेलग्रेड येथे १९६१ साली २५ सदस्यांसोबत या चळवळीला सुरुवात झाली. आज सदस्यसंख्या १२० वर जाऊन पोहचली आहे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देशांसाठी एकत्रितपणे वापरली जाणारी संकल्पना म्हणजे **'तिसरे जग'**. यातील बरेचसे देश पूर्वी वसाहती होत्या. या देशांचे वर्णन विकसनशील, कमी विकसित किंवा किमान विकसित देश असे देखील केले जाते. याची महत्वाची कारणे म्हणजे औद्योगिकीकरणाचा हळुवार वेग, साक्षरतेचे प्रमाण कमी असणे आणि लोकसंख्येचे प्रमाण जास्त असणे. अशा अनेक देशांनी अलिप्ततावादी चळवळीत सहभाग घेतला. शीतयुद्धाच्या काळात, पाश्चिमात्य भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या देशांनी अमेरिकेसोबत युती केली. त्यांना 'पहिले जग' असे संबोधले गेले. पूर्वेकडील साम्यवादी अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांनी सोव्हिएट रशियासोबत युती केली यांना 'दुसरे जग' म्हटले गेले.

**शोधा पाहू !**

१९६१ पासून झालेल्या सर्व अलिप्ततावादी परिषदांची यादी करा. ही संमेलने कधी आणि कोठे झाली तसेच संमेलनात कोणते महत्वाचे विषय चर्चिले गेले, ते लिहा.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

**कोणत्या देशांना अलिप्ततावादी देश म्हणून मान्यता मिळू शकते?**

१९६१ सालच्या बेलग्रेड परिषदेत पुढील निकषांना मान्यता मिळाली.

(i) असा देश ज्याने वेगळ्या राजकीय व सामाजिक यंत्रणेसह राज्याच्या सहअस्तित्वावर आधारित स्वतंत्र धोरण अवलंबले असेल.

(ii) राष्ट्रीय स्वातंत्र्यचळवळींना पाठिंबा देणारा देश.

(iii) शीतयुद्धाच्या संदर्भात कोणत्याही बहुपक्षीय करारात सदस्य नसणारा देश.

(iv) महासत्तावादाशी निगडित कोणताही द्विपक्षीय लष्करी करार अथवा प्रादेशिक संरक्षण करार न केलेला देश.

(v) लष्करी तळ कोणत्याही विदेशी सत्तेच्या विशेषत: महासत्तेच्या प्रतिस्पर्धी देशांच्या हाती न देणारा देश.

## कालखंड १९६२ ते १९७२ (देतांतचा पाया)

क्युबातील क्षेपणास्त्र पेचप्रसंगाचा शीतयुद्धाच्या धुमश्चक्रीत प्रचंड परिणाम झाला. या पेचप्रसंगामुळे दोन अण्वस्त्रधारी राष्ट्रे समोरासमोर उभे ठाकण्याची शक्यता वाढली आणि तणाव कमी करण्याची गरज प्रकर्षाने भासू लागली. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनी द्विपक्षीय कराराद्वारे तणाव कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. दोन राष्ट्रांना एकमेकांशी थेट संवाद साधता आला यासाठी दूरध्वनीची 'हॉटलाईन' तयार करण्यात आली.

अण्वस्त्र कमी करण्यासाठी अनेक करार देखील केले गेले.

१९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएट रशियामधील साम्यवादी पक्षाचे जनरल सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव्ह मॉस्कोमध्ये भेटले. दोन्ही राष्ट्रांतील तणाव कमी करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात या महत्त्वाच्या भेटीने झाली. या भेटीदरम्यान आण्विक क्षेपणास्त्रांच्या संख्येवर मर्यादा घालण्यासाठी दोन्ही राष्ट्रांनी करार केले. १९७२ च्या मॉस्को शिखर संमेलनाने तणाव शिथिलन (देतांत) पर्वाला सुरुवात झाली. 'देतांत' म्हणजे ताणतणाव कमी करण्याची प्रक्रिया. अमेरिका व सोव्हिएट रशियाने परस्परांमधील ताण-तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले.



१९७२ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएट रशियामधील साम्यवादी पक्षाचे जनरल सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव्ह मॉस्कोमध्ये भेटले.

**शोधा पाहू ?**

भारत आणि पाकिस्तानातील नेत्यांमध्ये शिखर संमेलने गेल्या काही वर्षांत कधी झाली ते शोधा. कोणत्या नेत्यांनी यात सहभाग नोंदवला होता? ही संमेलने कधी व कोठे झाली ?

या काळात घडलेली अजून एक महत्त्वाची घटना म्हणजे अमेरिका आणि चीन यांच्यातील सुधारलेले संबंध. १९४९ साली झालेल्या चिनी राज्यक्रांतीपासून अमेरिकेने चीनच्या साम्यवादी शासनाला मान्यता दिली नव्हती. १९७२ मध्ये अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी चीनला भेट दिली. चीनला भेट दिल्यामुळे १९७२ मध्ये अमेरिकेने चीनच्या साम्यवादी शासनाला मान्यता दिली. चीनने साम्यवाद स्वीकारल्यानंतर अमेरिकन अध्यक्षांमार्फत दिली गेलेली ही पहिलीच भेट होती.



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com



चेअरमन माओ झेडाँग आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन (१९७२)

## कालखंड १९७२ ते १९७९ (देतांतचे पर्व)

देतांत म्हणजे मैत्री नव्हे. ही केवळ ताण कमी करण्याची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेला हळूहळू सुरुवात झाली. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांनी तणाव कमी करण्यासाठी बरेच पुढाकार घेतले. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो :

(i) १९७३ साली पॅरिस येथे परिषद घेऊन व्हिएतनाम युद्ध थांबवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

(ii) १९७५ साली आयोजलेले 'अपोलो सोयुझ' संयुक्त अंतरिक्ष उड्डाण करण्यात आले.

(iii) पूर्व आणि पश्चिम युरोपियन देशांमधील तणाव कमी करण्यासाठी संरक्षण या विषयावर युरोपमध्ये हेलसिंकी परिषद (१९७५) घेण्यात आली. (अमेरिका आणि सोव्हिएट रशिया सोबतच एकूण ३५ युरोपियन राष्ट्रांनी या परिषदेत सहभाग नोंदवला होता.)

(iv) अरब-इस्राएल वाद सोडवण्यासाठी अमेरिकेने १९७८ मध्ये कॅम्प डेव्हिड येथे परिषद आयोजित केली. अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टर, इजिप्तचे अध्यक्ष अन्वर अल-सदात, आणि इस्राएलचे प्रधानमंत्री मेनॅकन बेगिन यांनी 'मध्य पूर्वेतील देशांसाठी शांततेच्या संरचनेवर' स्वाक्षरी केली. या परिषदेमार्फत इस्राएल आणि अरब जगातील तणाव कमी करण्याचे प्रयत्न करण्यात आले.




'अपोलो सोयुझ' संयुक्त उड्डाण साजरे करणारे पोस्टाचे तिकीट

या टप्प्यात इतरही अनेक महत्वाचे बदल पाहायला मिळाले. या बदलांना आर्थिक महत्त्व होते.

- १९७३ मध्ये अरब-इस्राएल युद्ध झाले. इस्राएलवर दबाव टाकण्यासाठी अरब राष्ट्रांनी तेलाचे उत्पादन कमी करण्याचे ठरवले. परिणामतः तेलाची किंमत अचानक वाढली. हे सर्व पेट्रोलियम निर्यातदार देशांची संघटना (OPEC) या संस्थेमार्फत करण्यात आले. यामुळे संपूर्ण जगातील तेलाच्या किमतीत वाढ झाली.
- अजून एक घटना म्हणजे अलिप्ततावादी देशांनी घेतलेला पुढाकार. अलिप्ततावादी गटाने 'नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थे'ची मागणी केली. गरीब देशांना जागतिक आर्थिक निर्णय प्रक्रियेत सहभाग घेता यावा हा या मागणीमागचा उद्देश होता; कारण या निर्णय प्रक्रियेवर कायम श्रीमंत देशांचे वर्चस्व राहिले आहे.

या टप्प्यात आंतरराष्ट्रीय संबंधात आर्थिक समस्यांना मिळणारे वाढते महत्त्व पाहायला मिळाले. एकीकडे, अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यातील राजकीय वाद निवळत होते. दुसरीकडे तिसरे जग मागण्या मांडताना अधिक सक्रिय झालेले पाहायला मिळत होते. याच टप्प्यात नवीन परिभाषा वापरायला सुरुवात झाली. जगाचे विभाजन करताना आता, ते



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

उत्तर-दक्षिण विभाजन असे रेखाटले गेले. उत्तर गोलार्धातील श्रीमंत देशांची गणती उत्तर विभाजनात केली गेली. (जसे, की सोव्हिएट रशिया, युरोप आणि उत्तर अमेरिका). दक्षिण गोलार्धातील गरीब देशांची गणती दक्षिण विभाजनात केली गेली. (आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील देश)

हा टप्पा आर्थिक परस्परावलंबनाचा देखील होता. येथे मुख्यतः आर्थिक समस्यांबाबतीत समन्वय साधला गेला. आर्थिक समन्वयासाठी संघटना निर्मितीचा टप्पा म्हणून याकडे आपणांस पाहता येऊ शकते. समन्वयाचा हेतू साध्य करण्यासाठी आर्थिक संघटनांनी व्यापारावर लक्ष केंद्रित केले. सीमा शुल्कांसारखे व्यापारी अडथळे काढून टाकण्याचा या मागील विचार होता. वस्तूंच्या अनिर्बंधित व्यापारामुळे लोकांमध्ये एकमेकांप्रति सद्भावना व समन्वयाची भावना जागृत होईल. 'मुक्त व्यापाराच्या' करारांना मान्यता देऊन हे केले गेले. या संघटनांना 'व्यापारी गट' असे देखील म्हटले जाते. उदा., दक्षिण-पूर्व आशियाई देशांची संघटना (ASEAN) आणि युरोपियन युनियन. या दोन्ही प्रादेशिक संघटनांनी 'मुक्त व्यापाराचे' करार केले आहेत. व्यापार गट म्हणून नाफ्टा (North American Free Trade Agreement-NAFTA) ची स्थापना करण्यात आली. यात कॅनडा, अमेरिका आणि मेक्सिको या देशांचा समावेश होता.

**व्यापार गट म्हणजे काय?**

जेव्हा राष्ट्र त्यांचे आर्थिक संबंध विशेष करारामार्फत जपतात तेव्हा व्यापारी गट निर्माण होतात. हे करार सामान्यतः व्यापारातील अडथळे कमी करणे अथवा काढून टाकणे यावर केंद्रित असतात. सर्वत्र आढळणारे व्यापारी अडथळे म्हणजे जकात (आयातीवरील कर) आणि कोटा (आयातीच्या प्रमाणावर निर्बंध).

याशिवाय अशा काही प्रादेशिक संघटना आहेत ज्यांची निर्मिती संवादाला उत्तेजन देण्याच्या आणि दृढ प्रादेशिक वातावरण निर्मितीसाठी करण्यात आली आहे. आर्थिक व व्यापारविषयक समन्वयाला उत्तेजन देण्यासाठी संघटनांची निर्मिती झाली आहे. उदा., दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना (SAARC), अमेरिकन स्टेट्स संघटना (OAS), आफ्रिकन युनियन (AU).

**दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना - सार्क (SAARC)**

दक्षिण आशियाई प्रादेशिक संघटनेची स्थापना १९८५ मध्ये झाली. सार्कमध्ये एकूण ८ सदस्यराष्ट्रे आहेत. अफगाणिस्तान, बांग्लादेश, भूटान, भारत, मालदीव, नेपाळ, पाकिस्तान आणि श्रीलंका. सार्कचे मुख्यालय काठमांडू येथे आहे.

सार्कची उद्दिष्टे :

(i) दक्षिण आशियातील लोकांचे कल्याण करणे आणि त्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचावणे.

(ii) त्या भागातील आर्थिक प्रगतीची गती वाढवणे, सामाजिक प्रगती व सांस्कृतिक विकास साधणे.

(iii) एकमेकांप्रति विश्वास वाढीस लागेल तसेच परस्परांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

(iv) आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक आणि वैज्ञानिक क्षेत्रांत सक्रिय सहयोग आणि परस्पर साहाय्याचे संवर्धन करणे तसेच इतर विकसनशील देशांसोबतचे सहकार्य दृढ करणे.

**कालखंड १९७९ ते १९८५-८६ (नवीन शीतयुद्ध)**

१९७९ मध्ये घडलेल्या दोन घटनांनी देतांतला



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

वेगळेच वळण दिले.

- इराणमध्ये क्रांती झाली आणि इराणच्या 'शाह'ची हकालपट्टी करण्यात आली. क्रांतिकारी इस्लामी नेता आयातोल्ला खोमेनी यांच्या नेतृत्वाखाली इराण इस्लामिक राज्य बनले. या नव्याने प्रस्थापित झालेल्या सरकारने अमेरिकेसोबत केलेले सर्व करार संपवले आणि शिवाय सेन्टो (CENTO) या लष्करी संघटनेमधून देखील बाहेर पडले.
- अफगाणिस्तानमध्ये, सोव्हिएट रशियाच्या मदतीने बाब्राक कारमाल यांनी राज्याचा प्रमुख म्हणून अफगाणिस्तानवर नियंत्रण मिळवले. अफगाणिस्तान हा समाजवादी देश म्हणून उदयाला आला ज्याचे सोव्हिएट रशियासोबत अतिशय घनिष्ठ लष्करी करार आहेत.

या घटनांमुळे देतांतचे पर्व संपुष्टात आले. त्यानंतर नव्याने सुरू झालेल्या युगाला 'नवीन शीतयुद्ध' असे संबोधले गेले; कारण शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोव्हिएट रशियामध्ये असलेले तणाव पुन्हा निर्माण झाले.

**कालखंड १९८५ ते १९९१ (गोर्बाचेव्ह यांचे युग)**


या टप्प्यात सोव्हिएट रशियाच्या धोरणात काही महत्वाचे बदल पाहायला मिळतात. सोव्हिएट रशियाचे नवीन नेते मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी देशाच्या धोरणात काही महत्वपूर्ण बदल केले. त्यांच्या पेरेस्त्रॉइका व ग्लासनोस्त या संकल्पनांमुळे व परराष्ट्र धोरणाच्या नवीन दृष्टीमुळे सोव्हिएट रशियाचा दृष्टिकोन बदलला. गोर्बाचेव्ह यांच्या नव्या परराष्ट्र धोरणाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :

(i) चीनसोबत संवाद (ii) शस्त्रनियंत्रण व निःशस्त्रीकरणावर लक्ष केंद्रित (iii) अफगाणिस्तानातून माघार (iv) भारतासोबतचे संबंध सुधारणे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

पेरेस्त्रॉइका म्हणजे पुनर्रचना. सोव्हिएट रशियाच्या प्रस्थापित राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना करणे. मुक्त निवडणुकांसारख्या लोकशाही पद्धतींची ओळख आणि सोव्हिएट रशियाच्या साम्यवादी पक्षाची मक्तेदारी संपुष्टात आणणे म्हणजे राजकीय बदल होय. आर्थिक बदल म्हणजे सोव्हिएट रशियाच्या अर्थव्यवस्थेवर असणारे केंद्राचे नियंत्रण संपवणे. अर्थव्यवस्थेचे विकेंद्रीकरण करणे. ग्लासनोस्त म्हणजे खुलेपणा. यामुळे सोव्हिएट रशियामधील लोकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळाले. लेखक आणि पत्रकारांना आता शासनाच्या धोरणांवर टीका करता येणार होती.

गोर्बाचेव्ह यांच्या नव्या धोरणाचा परिणाम देशाच्या अंतर्गत राजकारणात पाहायला मिळाला. लोकांना सरकारच्या धोरणांवर टीका करण्याचा अधिकार मिळाला होता. सोव्हिएट रशियाच्या साम्यवादी पक्षाचे नियंत्रण संपुष्टात आले.



मिखाईल गोर्बाचेव्ह : सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव आणि सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष

याच काळात पूर्व युरोपात काही महत्वाचे बदल झालेले दिसून येतात. सोव्हिएट रशियाच्या बदललेल्या धोरणांचा परिणाम पूर्व युरोपातील



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

देशांच्या राजकारणावर झाला. लोक अधिक राजकीय स्वातंत्र्याची मागणी करू लागले. १९८९ मध्ये पूर्व युरोपातील साम्यवादी सरकारांविरोधात जनउठाव करण्यात आले. पूर्व युरोपात झालेल्या या क्रांतीमुळे पोलंड, चेकोस्लोव्हाकिया, हंगेरी, रूमानिया, पूर्व जर्मनी आणि बल्गेरिया येथील साम्यवादी पक्षाची सत्ता संपुष्टात आली. नंतर या देशांमध्ये लोकशाही शासनपद्धती अस्तित्वात आली.

पूर्व युरोपातील बदलाचे वारे सोव्हिएट रशियामध्ये देखील शिरले. २५ डिसेंबर १९९१ रोजी गोर्बाचेव्ह यांनी सोव्हिएट रशियाचे अध्यक्ष म्हणून राजीनामा दिला. दुसऱ्या दिवशी 'सुप्रीम सोव्हिएत'ने (सोव्हिएट संसद) मतदानामार्फत सोव्हिएट रशियाचे देश म्हणून असणारे अस्तित्व संपवले. सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि नवीन देश अस्तित्वात आले.

**शोधा पाहू?**

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर निर्माण झालेल्या देशांची नावे शोधून यादी तयार करा.

जर्मनी हे एक राष्ट्र म्हणून निर्माण व्हावे यासाठी १९९० मध्ये पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकत्रीकरण झाले. चेकोस्लोव्हाकियाचे मात्र दोन देशांत विभाजन करण्यात आले : स्लोवाकिया आणि चेक रिपब्लिक. युगोस्लाव्हियाचे देखील सर्बिया, क्रोएशिया, बोस्निया आणि हर्झेगोविना, मॅसेडोनिया, स्लोवेनिया, कोसोओ आणि माँटेनिग्रो या देशांमध्ये विभाजन झाले. यामुळे आपल्याला आता युरोपमध्ये आणि पूर्वाश्रमीच्या सोव्हिएट रशियाच्या भागात अनेक नवीन देश पाहायला मिळतात.

शीतयुद्ध म्हणजे अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील संघर्षाची स्थिती होय. सोव्हिएट रशियाच्या

**स्वतंत्र राष्ट्राचे राष्ट्रकुल (Commonwealth of Independent States–CIS)(1991)**

१९९१ मध्ये सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर याची निर्मिती करण्यात आली होती. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर स्वतंत्र झालेले देश CIS चे सदस्य आहेत.

संस्थापक सदस्य : रशिया, युक्रेन आणि बेलारुस

त्यानंतरचे सहभागी झालेले सदस्य : आर्मेनिया, ॲझरबैजन, जॉर्जिया, कझाकस्तान, किरगिझस्तान, मॉल्डोव्हा, ताजिकिस्तान, तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान.

कार्य : बहुपक्षीय व आंतरराज्यीय स्तरावरून समान हिताच्या घडामोडींकडे पाहिले जाते. लष्कर, परराष्ट्रसंबंध आणि आर्थिक सहकार्याबाबतीत संरचना पुरवण्याचे काम केले जाते.


विघटनामुळे शीतयुद्धाचे पर्व संपले. १९९१ नंतरच्या जगाचे वर्णन करताना दोन नवीन शब्दप्रयोग वापरले गेले. 'सोव्हिएट रशियानंतरचे युग' आणि 'शीतयुद्धोत्तर युग'. या नवीन पर्वात चीन आणि भारत, ब्राझील, दक्षिण आफ्रिका यांसारख्या देशांचा उदय झालेला पाहायला मिळाला. जागतिक व्यापार संघटना (WTO), G-20, ब्रिक्स (BRICS – ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका) यांसारख्या संघटना जागतिक घडामोडींमध्ये महत्त्वाची भूमिका वठवू लागल्या.

हे व यांसारखे इतर बदल आपण पुढील इयत्तेत अभ्यासणार आहोत.




Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com




सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतरचे देश




आजचा पूर्व युरोप

**Please see the following websites for further information:**

(1) History and Evolution of Non-Aligned Movement, Ministry of External Affairs, Government of India, August 22, 2012
https://mea.gov.in/in-focus-article.htm?20349/History+and+Evolution+of+NonAligned+Movement

(2) India and United Nations Peacekeeping Operations January 26, 2014 By Lt Gen Satish Nambiar (Retd) Ministry of External Affairs, Government of India
https://mea.gov.in/articles-in-indian-media.htm?dtl/22776/India+and+United+Nations+Peacekeeping+Operations



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. १९६२ मध्ये .......... क्षेपणास्त्र पेचप्रसंग उदभवला.
(अमेरिका, क्युबा, रशिया, चीन)

२. अरब इस्राएल वाद सोडवण्यासाठी अमेरिकेने १९७८ .......... येथे परिषद आयोजित केली.
(कॅम्प डेव्हिड, हेल्सिंकी, पॅरिस, जिनीव्हा)

**(ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.**


(i) इराण – आयातोल्ला खोमेनी
(ii) अफगाणिस्तान – बाब्राक कारमाल
(iii) सोव्हिएट रशिया – रिचर्ड निक्सन

**(क) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा**

१. जहाजांना बंदरात अथवा देशात प्रवेश करण्यास रोखणे –

२. सोव्हिएट रशियाच्या प्रस्थापित राजकीय व आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना –

**प्र.२ (अ) पुढील संकल्पनाचित्र पूर्ण करा.**




**(ब) आजचा पूर्व युरोप या नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतरच्या कोणत्याही चार देशांची नावे लिहा.

२. हंगेरीच्या शेजारील दोन राष्ट्रांची नावे लिहा.

**प्र.३ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. अलिप्ततावादी देशांनी नाफ्टाची (NAFTA) मागणी केली.

२. पं.जवाहरलाल नेहरू हे आसियान चे संस्थापक होते.

**प्र.४ सहसंबंध स्पष्ट करा.**

शीतयुद्ध आणि अलिप्ततावादी चळवळ

**प्र.५ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नवीन शीतयुद्धाची संकल्पना स्पष्ट करा.

२. व्यापारगट म्हणजे काय?

**प्र.६ आपले मत नोंदवा.**

शीतयुद्ध काळात भारताने महत्वाची भूमिका बजावली.

**प्र.७ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

देतांत पर्व विशद करा.
(अ) अर्थ (ब) तणाव कमी करण्यासाठी महासत्तांनी केलेले प्रयत्न

**उपक्रम**

सार्कच्या सर्व शिखर परिषदांची यादी तयार करा.

***



Downloaded from https:// www.studiestoday.com

Downloaded from https:// www.studiestoday.com











महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

राज्यशास्त्र इ. ११ वी (मराठी माध्यम)

₹ ६८.००

Downloaded from https:// www.studiestoday.com